**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 261/2007.**

श्री रेखचंद कृष्णाजी बोबडे
रा. द्वारा श्री मनोज वाडीवाले, नंदगीर रोड,
पाचपावली नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
व्यवस्थापक,
दि वर्धा डिस्ट्रीक्ट सेंट्रल को. ऑप. बॅक लि. वर्धा
ता. जि. वर्धा

2) जन माहिती अधिकारी
सचिव,
तळेगाव वि. का. सेवा सह. संस्था मर्या.
तळेगाव ता. आष्टी जि. वर्धा ...... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ती यांनी दिनांक 29/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दि. 1.8.2007 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 27.7.2006 रोजी माहिती अधिकारी तथा सचिव तळेगाव वि. का. सेवा सह. सोसायटी यांचेकडे माहिती मिळणेसाठी अर्ज केला होता. अर्जदाराने कर्ज

मिळण्यासाठी अर्ज केलेला होता. कर्ज त्यांना नाकारण्यात आलेले होते व त्याबाबतची माहिती त्यांनी मागितलेली आहे. सदरच्या अर्जाप्रमाणे दि. 2.8.2006 रोजी माहिती पुरवण्यात आली आहे. सदरच्या माहिती मध्ये भुविकास बॅकेचे थकीत कर्ज असल्यामुळे एकच शेत दोन बॅकेत गहाण करता येत नाही त्यामुळे नव्याने कर्ज वाटप करता येत नाही असे सांगितले. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून दि. 5.10.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भातील निर्णय दि. 18.1.2007 रोजी देण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयामध्ये आपले शेत ही तळेगाव वि. का. सेवा संस्था अंतर्गत येत असून यापूर्वी सेवा सहकारी संस्था तळेगाव (शा.अ.) माहितीच्या अधिकारा अंतर्गत माहिती साठी अर्ज केला होता. त्याचे सविस्तर उत्तर संस्था सचिवानी दिलेले आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी तथा सचिव तळेगाव वि. का. सेवा सहकारी संस्था मर्या. यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली आहे. प्रथम अपीलात सुध्दा विहीत मुदतीत निर्णय दिलेला आहे. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस असे आढळुन आले की अपीलकर्ता यांना कर्ज मिळण्याकरीता आयोगाकडून आदेशाची अपेक्षा आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षीत आहे. माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारे कारवाई करा म्हणून आदेश देणे हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षीत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. वास्तविक अपीलकर्ता यांना माहिती मिळाल्यानंतर हया माहितीच्या आधारे त्यांनी पुन्हा वरिष्ठ अधिका–याकडे अर्ज करुन त्याबाबतचे स्पष्ट अभिप्राय घ्यावयास पाहिजे होते व त्याप्रमाणे त्यांना त्यांच्या कर्ज मिळण्याच्या बाबतीतची कारवाई करता आली असती.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 1.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 142/2007.**

श्री हिरामण शंकर शिरसाट
रा. उमा निवास, सावजी ले आउट,
ता. खामगाव, जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
दि झोनल मॅनेजर,
युनायटेड वेस्टर्न बॅंक, जलगाव, ता. जि. जलगाव

2) जन माहिती अधिकारी
मॅनेजर,
दि युनायटेड वेस्टर्न बॅंक, खामगाव शाखा
ता. खामगाव जि. बुलढाणा ...... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक 31/11/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांना मागितलेली माहिती पूर्वीच त्यांना दिलेली आहे व त्याबद्यलचा खुलासा हा उत्तरवादी यांनी दाखल केलेला आहे परंतु पूर्वीची युनायटेड वेस्टर्न बॅंक ही खाजगी क्षेत्रातील बॅंक होती परंतु ती केंद्रीय बॅकींग रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे गठीत

झाली होती म्हणून व आता ऑक्टोबर 2006 पासून इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बॅंक ऑफ इंडिया नी घेतलेली असल्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत सदरचे अपील येत नाही. आय. डी. बी. आय. ही बॅंक केंद्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम असल्यामुळे केंद्रीय माहितीच्या कक्षेत येते त्यामुळे सदरचे अपील हे अधिकारीतेच्या अभावी खारीज करण्यास पात्र आहे असा त्यांनी खुलासा केलेला आहे. सदरच्या खुलाशा प्रमाणे आय. डी. बी. आय. ही बॅंक केंद्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम असल्यामुळे केंद्रीय माहिती आयोगाच्या कक्षेत येते व त्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) पूर्वीची युनायटेड वेस्टर्न बॅंक व आता आय. डी. बी. आय. बॅंक ही केंद्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम असल्यामुळे केंद्रीय माहिती आयोगाच्या कक्षेत येत असल्यामुळे व राज्य माहिती आयोगास अधिकारीता नसल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता यास मिळालेल्या माहिती नुसार समाधान झालेले नसल्यास त्यांनी केंद्रीय माहिती आयोगाकडे अपील सादर करावे.
3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 1.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 109/2007.**

श्री रामदास तेजरामजी भोयर
मु.पा. कोहळी ता. कळमेश्वर
जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी
मुख्याध्यापिका,
कुसुमताई कन्या विद्यालय, मोहपा
ता. कळमेश्वर जि. नागपूर. ...... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक 3/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये जिल्हा माहिती आयुक्त (विभागीय) क्वाटेज क्र. 8 रविभवन, नागपूर म्हणून अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक 11.6.2007 रोजी ठेवण्यात आली होती त्या दिवशी अपीलकर्ता व उत्तरवादी हजर होते. परंतु आयोगाची बैठक पुणे येथे असल्यामुळे पुढील तारीख 2.8.2007 देण्यात आली होती. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराप्रमाणे माहिती मागितली होती असे त्यांचे अपील मेमोमध्ये दिसून येते. परंतु अपील मेमाबरोबर त्यांनी मुळ माहितीचा अर्ज दाखल केलेला नाही. वास्तविक दि. 11.5.2007 ही तारीख कागदपत्रे दाखल करण्याकरीता दिलेली होती. अपील मेमोमध्ये त्यांनी असे सांगितले आहे की त्यांनी मागितलेली माहिती

माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली नाही. परंतु त्यांचे दि. 1.12.2006 च्या अर्जास दि. 20.12.2006 रोजी (प्राप्त दि. 26.12.2006) माहिती कां देता येणार नाही याबद्यलचे कारणा सहित त्यांना उत्तर देण्यात आलेले दिसून येते. सदरच्या उत्तरामध्ये प्रथम अपील संस्थेचे सचिवाकडे किंवा शिक्षणाधिका–याकडे 30 दिवसात दाखल करावे असे त्यांचे निदर्शनास आणले असतांनासुध्दा तरीसुध्दा संस्थेच्या सचिवाकडे किंवा शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे त्यांनी प्रथम अपील हे दाखल न करता ते जिल्हा माहिती आयुक्त म्हणून आयोगाच्या कार्यालयात दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना माहिती मिळणेचा अधिकार आहे याबद्यलची माहिती आहे परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचे पालन काटेकार करुन न्याय मिळवून घेणे त्यांना मान्य दिसत नाही. प्रथम अपील कोणत्या प्राधिकरणाकडे दाखल करावे हे त्यांना कळविलेले असून सुध्दा त्यांनी प्रथम अपील हे जिल्हा माहिती आयुक्त म्हणून राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात दाखल केले आहे. अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांना माहिती करुन दिली असतांना सुध्दा चुक झाली असे ते म्हणतात त्यावरुन त्यांनी मुद्याम संस्थेच्या सचिवाकडे किंवा शिक्षणाधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करण्याचे टाळले आहे हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. व सदरच्या निष्कर्षास उत्तरवादी यांनी दाखल केलेला खुलासा हा बळकटी देतो. अपीलकर्ता यांना मुख्याध्यापक म्हणून निलंबित केलेले आहे हे त्यांच्या अपील मेमोवरुन दिसून येते व त्यांची चौकशी सुरु आहे हे उत्तरवादीच्या खुलाशावरुन दिसून येते व त्यामुळे त्यांनी प्रथम अपील संस्थेच्या सचिवाकडे दाखल करण्याचे टाळलेले दिसते. अपीलकर्ता यांनी अशाच प्रकारे मुख्याध्यापक रेखडे विद्यालय पिंपळा किनखेडे तालुका कळमेश्वर, मुख्याध्यापक कृष्णराव वानखेडे विद्यालय काहळी, मुख्याध्यापक न्यु इंग्लिश स्कुल मोहपा यांचेकडे माहिती मिळणेसाठी अर्ज केलेले दिसून येतात. आज त्यांचे अपील क्र.

110/2007, अपील क्र. 111/2007, व अपील क्र. 112/2007 हे आयोगाकडे सुनावणीस आहे.

4. उत्तरवादी यांनी अपीलकर्ता यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (एच) प्रमाणे माहिती दिल्यास चौकशीमध्ये अडथळा येवू शकतो म्हणून माहिती देता येत नाही असे त्यांनी विहीत मुदतीत दि. 20.12.2006 रोजी कळविलेले आहे. तसेच खुलासा दाखल करतांना अपीलार्थी हे स्वतः मुख्याध्यापक पदावर माहिती विचारलेल्या कालावधीत होते. व म्हणून मागितलेल्या माहिती विषयी सविस्तर माहिती त्यांना अगोदरच आहे. व म्हणून मागितलेली माहिती देण्याची गरज वाटत नाही. तसेच ही जनहित याचिका नसून स्वहित याचिका दिसून येते असाही खुलासा केलेला आहे.

5. असे असले तरी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे सचिव, मोहपा शिक्षण मंडळ, मोहपा यांचेकडे दाखल करणे संयुक्तीक होईल व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील त्यांना करण्यात येईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांचे दि. 20.12.2006 चे निर्णया विरुध्द प्रथम अपील हे सचिव शिक्षण मंडळ मोहपा यांचेकडे दाखल करावे. अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 2.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 110/2007.**

श्री रामदास तेजरामजी भोयर
मु.पा. कोहळी ता. कळमेश्वर
जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी
मुख्याध्यापक,
रेखडे विद्यालय, पिपळा (किनखेडे)
ता. कळमेश्वर जि. नागपूर. ...... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक 3/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये जिल्हा माहिती आयुक्त (विभागीय) नागपूर विभाग नागपूर म्हणून राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी उत्तरवादी यांचे कडे दि. 30.11.2006 रोजी माहिती मिळणेसाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जाची प्रत अपीलकर्ता यांनी दाखल केलेली नाही. अपील मेमोमध्ये उल्लख नाही. मात्र दि. 28.12.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरात अर्जाच्या तारखेचा उल्लेख दिसून येतो. माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराबाबत रेखडे विद्यालय पिपळा या संस्थेचे सचिवाकडे किंवा शिक्षणाधिकारी

यांचेकडे प्रथम अपील दाखल करता येईल असे कळविले असतानासुध्दा अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे जिल्हा माहिती आयुक्त (विभागीय) नागपूर विभाग नागपूर म्हणून प्रथम अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांना त्याबाबत विचारले असता त्यांनी चुक झाली असे म्हटले परंतु माहिती अधिकाराच्या उत्तरातून असे दिसून येते की ते निलंबित मुख्याध्यापक असून त्यांची विभागीय चौकशी सुरु असल्यामुळे त्यांनी मागितलेली माहिती त्याच चौकशीसी संबंधित असल्यामुळे देता येत नाही असे दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे रेखडे विद्यालय पिपळा या संस्थेच्या सचिवाकडे प्रथम अपील दाखल करावयास पाहिजे होते व त्यांच्या निर्णया विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचे पालन करावयास पाहिजे होते. त्यामुळे सदरचे माहिती अधिकारी यांचे 28.12.2006 चे निर्णया विरुध्द अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सचिव मोहपा शिक्षण मंडळ यांचेकडे दाखल करणे संयुक्तिक होईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 19 (1) अन्वये प्रथम अपील हे सचिव शिक्षण मंडळ मोहपा यांचेकडे दाखल करावे. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 2.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

क. रामाआ / वि.क्षे. /      / 07

राज्य माहिती आयोग नागपूर.

दिनांक 2.8.2007

श्री चित्रशेखर ज्ञानोदय गावंडे
रा. कुंजबिहारी, दाजीबा गावंडे यांचे घराजवळ
एकोरी वार्ड, एकोरी मंदिराच्या मागे, चंद्रपूर
जि. चंद्रपूर 442402 (महा.)

विषय :– आपले अपीलीय अधिकारी यांना केलेले दि. 30.7.07 चे अपील.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी आपण अपीलीय अधिकारी, राज्य माहिती आयोग नागपूर यांना केलेल्या दि. 30.7.2007 च्या अपीलाच्या अनुषंगाने, सुनावणीसाठी राज्य माहिती आयोग कार्यालय रविभवन रुम नं. 17 येथे दि. 22.8.2007 रोजी (बुधवार) 11.00 वाजता हजर राहण्याबाबत आपणास कळविण्यात येत आहे.

( वि. सु. बर्डेकर )
अपीलीय अधिकारी राज्य
माहिती आयोग रविभवन 17 खोली क्र.
सिव्हील लाईन्स, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 112/2007.**

श्री रामदास तेजरामजी भोयर
मु.पा. कोहळी ता. कळमेश्वर
जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी
मुख्याध्यापक,
न्यु इंग्लीश हायस्कुल मोहपा
ता. कळमेश्वर जि. नागपूर. ...... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक 6/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये जिल्हा माहिती आयुक्त (विभागीय) नागपूर विभाग नागपूर म्हणून द्वितीय अपीला ऐवजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराच्या अर्जाची प्रत दाखल केलेली नाही. परंतु उत्तरवादी यांचे दि. 2.12.2006 चे उत्तरावरुन अपीलकर्ता यांनी दि. 1.12.2006 रोजी अर्ज केलेला दिसून येतो. अर्जाचे उत्तर विहीत मुदतीत दिलेले दिसून येते. परंतु सदरच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे जिल्हा माहिती आयुक्त विभागीय म्हणून राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दाखल केलेले आहे.

3. उत्तरवादी यांनी विहीत मुदतीत उत्तर दिलेले असून सदरच्या उत्तराच्या विरुध्द सचिव मोहपा शिक्षण मंडळ यांचेकडे प्रथम अपील दाखल करावे असे निदर्शनास आणून

सुध्दा संस्थेच्या सचिवाकडे अपील दाखल न करता त्यांनी सदरचे अपील हे दाखल केलेले आहे. सदरचे अपील दाखल करतांना सुध्दा माहितीचा अधिकर अधिनियम 2005 च्या कोणत्याही तरतुदींचे पालन केले गेलेले दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव मोहपा शिक्षण मंडळ यांचेकडे प्रथम अपील दाखल करुन निर्णय घेणे संयुक्तिक होईल. प्रथम अपीलीच्या निर्णया नंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील त्यांना सादर करता येईल.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव शिक्षण मंडळ मोहपा यांचेकडे प्रथम अपील दाखल करावे.

2) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 2.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 273/2007.**

श्री गोपाल बालाजी झाडे
मु. 8, पुरोहित लेआऊट अंबाझारी
नागपूर 440033 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (प्रशासन) दुग्धव्यवसाय विकास विभाग,
महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, वरळी, सी फेस,
मुंबई 400018

2) जन माहिती अधिकारी तथा
जन संपर्क अधिकारी
दुग्ध व्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य
वरळी, मुंबई 18. ...... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक 26/4/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी यांनी महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिवेशन सुरु असल्यामुळे उपस्थित राहता येत नाही असे पत्र दि. 19.7.2007 रोजी पाठवून मुदतवाढ मागितली होती परंतु प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी नागपूर यांनी त्यांना प्रतिनिधी म्हणून पाठवून सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये कागदपत्रे दाखल केलेली आहे.

2. अपिलकर्ता यांनी दि. 10.1.2007 रोजी माहिती मिळणसाठी अर्ज केला होता. माहिती मिळण्याच्या अर्जामध्ये 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे राज्य जन माहिती अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी यांनी दि. 5.2.2007 रोजी अपीलकर्ता यांना उपआयुक्त (प्रशासन) दुग्ध व्यवसाय विकास यांनी दि. 1 मार्च 2007 रोजी पाठविलेली माहिती ही जशीच्या तशी पुरविलेली आहे. उपआयुक्त (प्रशासन) यांच्या पत्रामध्ये मुद्या क. 1 ची माहिती दिलेली आहे व मुद्या क. 2,3,4 याबाबतची माहिती शासन स्तरावरुन घ्यावी असे कळविलेले आहे. परंतु पूर्वीच अपीलकर्ता यांनी 27.2.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 3.4.2007 रोजी ठेवण्यात आली होती व तसे 13 मार्च 2007 च्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले. परंतु अपीलकर्ता हे सुनावणीस उपस्थित राहिले नाही म्हणून दि. 11.1.2007 रोजी त्यांना कळविले की सदरच्या अपीलाची सुनावणीची आवश्यकता आहे काय व आपणास जी माहिती प्राप्त झाली आहे त्याबाबत आपण समाधानी आहात काय तसे कळवावे. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 27.4.2007 रोजी सदरचे द्वितीय अपील सादर केले आहे.

3. सदरच्या अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस मिळालेल्या माहितीच्या बद्यल अपीलकर्ता समाधानी नाहीत याबद्यल त्यांना विचारले असता त्यांनी सांगितले की मुद्या क. 1 मध्ये आयुक्त कार्यालयाने मान्यता देवून शासनास शिफारस करणे व त्याप्रमाणे शासनाने आरोप ठेवून विभागीय चौकशी नेमणे या बाबी कोणत्या नियमात बसतात त्या माहितीची प्रमाणीत छायाप्रत उपलब्ध करुन द्यावी व त्याप्रमाणे अपीलकर्ता यास मुद्या क. 1 प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली. मुद्या क. 2,3,4 याबद्यलची माहिती शासन स्तरावरुन घेण्यात यावी याबद्यल अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की जन माहिती अधिकारी तथा जन संपर्क अधिकारी दुग्ध व्यवसास विकास यांनीच ती उपलब्ध करुन द्यावी.

अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जामध्ये किंवा प्रथम अपीलाच्या अर्जामध्ये प्रादेशिक दुग्ध शाळा विकास अधिकारी नागपूर यांनी शासकीय दुध योजनेच्या 90–91 मधील कामकाजाच्या लेखा अंकेक्षणातील त्रुटींबाबत आक्षेपानुसार अस्तित्वात नसलेल्या शासन निर्णयासह चुकीच्या बाबींवर आधारीत शासनाचे नुकसान झाल्याचे खात्यास कळविले त्यानुसार खात्याने चौकशी नेमली वगैरे अशाप्रकारे त्यांचे मत व्यक्त केले असून त्या अस्तित्वात नसलेल्या शासन निर्णयाच्या बद्यल त्यांना उत्तर अपेक्षीत होते परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (ज) मधील माहिती व माहितीचा अधिकार या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे कोणत्याही प्रकारचे मत (अभिप्राय) किंवा अस्तित्वात नसलेल्या नियमाबाबत मत विचारले असलयास तसे नकारार्थी उत्तर अपेक्षीत नाही. सार्वजनिक प्राधिकरणाकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षीत आहे व त्याप्रमाणे माहिती अधिकारी यांनी त्यांना मुद्या क्र. 1 प्रमाणे उत्तर दिलेले आहे. मुद्या क्र. 2,3,4 च्या बाबत अपीलकर्ता यांनी दिलेल्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक होईल.

<u>**नि र्ण य**</u>

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांचे 10.1.2006 च्या अर्जामधील मुद्या क्र. 2,3,4 मध्ये मागितलेली माहिती ही माहिती अधिकारी यांनी शासनाकडून घेवून निर्णय मिळाल्यापासून 1 महिन्यात उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 3.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 274 / 2007.**

श्री गोपाल बालाजी झाडे
मु. 8, पुरोहित लेआऊट अंबाझारी
नागपूर 440033 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (प्रशासन) दुग्धव्यवसाय विकास विभाग,
महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, वरळी, सी फेस,
मुंबई 400018

2) जन माहिती अधिकारी तथा
जन संपर्क अधिकारी
दुग्ध व्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य
वरळी, मुंबई 18. ...... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 7 / 5 / 2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी यांनी महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिवेशन सुरु असल्यामुळे उपस्थित राहता येणार नाही मुदतवाढ मिळण्याचा अर्ज दिलेला आहे तरी सुध्दा त्यांनी प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी नागपूर यांना प्रतिनिधी म्हणून पाठवून सदरच्या अपीलाच्या संदर्भात कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 27.9.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी यांचेकडे 4 मुद्यांवर माहिती मिळणेसाठी अर्ज केला होता. माहिती त्यांना उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांनी दि. 6.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. त्यानंतर दि. 8.12.2006 रोजी त्यांना मुद्या क्र. 2 आणि 4 बाबत माहिती उपलब्ध करुन दिली होती व मुद्या क्र. 1 आणि 3 ची माहिती ही औरंगाबाद कार्यालयाकडून मागितलेली असून ती उपलब्ध झाल्यावर पुरविण्यात येईल असे कळविले होते. उपआयुक्त (प्रशासन) यांचेकडून माहिती उशिरा प्राप्त झाल्याने अर्जदारास माहिती देण्यास उशिर झालेला आहे असेही कळविलेले आहे. या दरम्यानच्या काळात दि. 19.12. 2006 रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती परंतु ती सुनावणी दि. 21.11.2006 रोजी घेण्यात येवून तसेच दि. 20.2.2007 रोजी सुध्दा सुनावणी घेण्यात आली त्याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की औरंगाबाद कार्यालयातून माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे सुनावणी घेण्यास कारण नाही. 27.12.2006 रोजी सुनावणी घेवून माहिती देण्याचे आदेश देण्यात आले होते. त्याप्रमाणे संपूर्ण माहिती ही दि. 25.4.2007 रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमधून अपीलकर्ता हे त्रुटी आहेत असे दाखवून माहितीची अपेक्षा करीत आहेत असे दिसते. नियम अस्तित्वात नसतांना निर्णय घेतला ते नियम उपलब्ध करुन द्या अशी नकारार्थी माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. परंतु माहितीच्या अधिकारामध्ये अशा प्रमाणे नियमामधील त्रुटीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. जे नियम उपलब्ध असतील त्याच्या प्रती उपलब्ध करुन देता येतात व त्यामुळे त्यांना माहिती मिळालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. मिळालेल्या माहितीवरुन व नियमावरुन त्यांच्यावर जो अन्याय झालेला असेल त्या अन्यायाबाबत त्यांना योग्य त्या संबंधित अधिका—याकडे स्वतंत्र अर्ज करुन न्याय मागवून घेता येईल.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 3.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 275/2007.**

श्री गोपाल बालाजी झाडे
मु. 8, पुरोहित लेआऊट अंबाझारी
नागपूर 440033 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (प्रशासन) दुग्धव्यवसाय विकास विभाग,
महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, वरळी, सी फेस,
मुंबई 400018

2) जन माहिती अधिकारी तथा
प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी,
सिव्हील लाईन्स, नागपूर ...... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 26/4/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विधान मंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु असल्यामुळे उपस्थित राहता येणार नाही असे कळविले आहे.

2. अपिलकर्ता यांनी दि. 10.1.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी नागपूर यांचेकडे एकुण 9 मुद्यांवर माहिती मिळणसाठी अर्ज

केला होता. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 19.1.2007 रोजी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी मागणी केलेली कागदपत्रे/माहिती ही विभागीय चौकशीचे संबंधात असून खात्याने या कार्यालयास वेळोवेळी मागणी केलेल्या नुसार या कार्यालयाद्वारे गोपनिय पत्राद्वारे सादर केले असल्याने मागणी केलेली माहिती कारणमिमांसा उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविले आहे. सदरच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 7.2.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 20.3.2007 रोजी ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता सदरच्या सुनावणीस हजर नव्हते व त्यामुळे दि. 7 एप्रिल 2007 रोजी त्यांचे मिळालेल्या माहितीच्या बद्यल समाधानी आहात काय अशी त्यांना विचारणा करण्यात आली होती. त्यानंतर अपीलकर्ता यांना सदरचे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीसाठी माहिती अधिकारी तथा प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी यांनी खुलासा दाखल करुन प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी यांचे कार्यालयानी शासकीय दुध योजना नागपूर दि. 31.3.2000 अखेरची पडताळणी करुन चौकशी अहवालात दर्शविलेल्या 1990 च्या कामकाजाच्या बाबतच्या माहितीची तुलना करुन खात्यास दि. 29.8.2000 च्या पत्रान्वये कळविले पासून संदर्भात चौकशी प्रकरणी शासन स्तरावरुन अंतिमरित्या निर्णय/निकाल देण्यात आलेला नाही. अर्जदाराने मागितलेला पडताळणी अहवाल अर्जदारास दिला गेल्यास शासनाने जी विभागीय चौकशी पूर्ण करुन त्यावर शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे त्याचेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपलब्ध प्रकरण हे न्यायप्रविष्ट देखील आहे या सर्व बाबी विचारात घेवून गोपनिय पडताळणी अहवालाची प्रत ही अर्जदारास देण्यात आलेली नाही तसेच मुद्या क्र. 2 ते 9 अन्वये अर्जदारानी मागितलेली माहिती ही अभिप्रायाच्या स्वरुपात मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या

अन्वये अभिप्राय देणे हे अभिप्रत नसल्याने अर्जदाराना देण्यात आलेली नाही असे नमुद केले आहे. आता सुनावणीच्या वेळेस दि. 6.2.81 चा शासन निर्णय माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेला आहे. माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याविषयी जे कारण दिलेले आहे व खुलासा सादर केलेला आहे ते माहितीचा अधिकार अधिनियम 8 (ज) प्रमाणे योग्य माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद या मुद्यामध्ये येत असल्यामुळे संयुक्तीक आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे दि. 10.1.2007 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही विभागीय चौकशीच्या संदर्भात असल्यामुळे व विभागीय चौकशीचा निर्णय झालेला नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही हे माहिती अधिकाराचे सदरचे उत्तर कलम 8 (1) (ज) प्रमाणे असल्यामुळे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 3.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 281/2007.**

श्री मुकुंदराव प्रेमलाल सोनटेके
मु. कुंभारटोली (आंमगाव)
पो. त. आमगाव जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय
गोंदिया जि. गोंदिया

2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्यालय सहाय्यक,
तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय गोंदिया
जि. गोंदिया ...... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 14/8/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक तालुका निरीक्षक भूमि अभिलेख गोंदिया हजर.

2. अपिलकर्ता यांनी दि. 8.2.2006 रोजी तहसिल गोंदिया अंतर्गत प्लॉट नं. 1069 शिट नं. 61 अे (1) खसरे के 1974–75 मे फेरफार करनेवाले का नाम, पद एवं स्थाची

पत्ता देने की कृपा करे. (2) उसीप्रकार आखीव पत्रिका (5898) मे फेरफार करनेवाले का नाम, फेरफार एवं तारीख नुसार किंया एवं स्थायी पत्ता देने की कृपा करे. सदरच्या अर्जाप्रमाणे दि. 22.2.2006 रोजी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख गोंदिया यांनी अपीलकर्ता यांस सन 1974–75 मध्ये स.न.प.भू. गोंदिया यांनी सदरचे नाव कमी करुन श्रीमती सुरजीबाई जौ. कन्हैयालाल अगरवाल यांचे नावाने नोंद करण्यात आली. सुरजीबाई मयत झाल्यानंतर त्यांचे इच्छेप्रमाणे फेरफार क्र. 2859 दि. 26.11.92 ला स.न. प.भू.गोंदिया यांनी नोंद घेतली. व नायब तहसिलदार नझूल यांनी फेरफार प्रमाणित केली. तसेच फेरफार करणा–या अधिका–याचे स्थायी पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरची माहिती पुरविता येत नाही असे कळविले आहे असे दिसते. दि. 13.3.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील पी. एस. आंबेराव जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांचेकडे दाखल केले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी घेतली नसल्यामुळे परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की दि. 22.2.2006 चे पत्र हे त्यांना 10.7.2006 रोजी मिळाले व त्यांनी पुन्हा त्यामुळे दि. 20.7.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 27.7.2006 रोजी अपीलकर्ता यांस स्पष्टीकरण विचारले होते. अपीलकर्ता हे स्वतः ते त्या कार्यालयात गेले होते असे त्यांचे म्हणणे आहे व त्यांनी तोंडी स्पष्टीकरण दिले होते परंतु कोणतेही उत्तर न दिल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांचे प्रामुख्याने म्हणणे असे आहे की त्यांनी माहितीच्या अधिकाराचा अर्ज दि. 8.2.2006 रोजी केला व कोणतेही उत्तर न मिळाल्यामुळे दि. 13.3.2006 रोजी प्रथम अपील केले. दि. 22.2.2006 चे दिलेले जे उत्तर दिसत आहे ते त्यांना 10.7.2006 रोजी प्राप्त झालेले आहे. त्याबाबतचा लिफाफा त्यांचेकडे आहे. पोष्टाचे तिकीट आहे परंतु त्यावरील तारीख दिसत नाही मात्र बाजुला 10.7.2006 हे लिहिलेले आहे. यावर

माहिती अधिकारी यांना असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की 22.2.2006 चे पत्र 24.2.2006 रोजी निर्गमित केलेले आहे अशी त्यांचेकडे नोंद आहे. असे असले तरी सदरच्या अर्जामध्ये त्यांनी अपीलकर्ता यांनी विचारलेल्या माहिती बद्यल माहिती दिलेली असून फेरफार करणा–या अधिका–याचा स्थायी पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरची माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले आहे. सन 1974–75 चे फेरफाराचे कागद सुध्दा अपीलकर्ता यांनी दाखविले. त्यावर फेरफार करणा–याची सही आहे ती आज ओळखता येत नाही व फेरफाराची तारीख नाही. व त्यामुळे फेरफार करणा–या अधिका–याचे स्थायी पत्ता किंवा नावे उपलब्ध करुन देणे शक्य होईलच असे नाही. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घ्यावयास पाहिजे होती व सुनावणी घेवून अपीलकर्ता यांस जी माहिती त्यांनी मागितलेली होती ती पुरवण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे होता. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचे निश्चितच उल्लंघन केले आहे. आज सुध्दा सुनावणीची नोटिस त्यांना देवून ते हजर राहिलेले नाही व गैरहजर राहण्याची अनुमती सुध्दा त्यांनी घेतलेली नाही हा अधिक्षक भूमि अभिलेख यांचा बेजबाबदारपणा दिसतो. अशा या अधिक्षक भूमि अभिलेख यांच्या बद्यल उपसंचालक भूमि अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर यांनी दखल घेवून त्याबाबत त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यालयीन कार्यवाही करणे संयुक्ति होईल. जेणेकरुन व भविष्यात माहितीच्या अधिकाराखाली प्रथम अपीले व राज्य माहिती आयोगाकडे सुनावणीस उपस्थित राहण्याची समज मिळेल.

4. अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जातील फेरफार करणा–या अधिका–यांची नावे सन 1974–75 मध्ये जे अधिकारी असतील त्यांची नावे ज्या कार्यालयातून फेरफार झालेले असेल त्या कार्यालयातून उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. महसूल कार्यालयातून फेरफार झालेला असेल तर महसूल कार्यालयातून त्या

तारखेला असलेल्या कर्मचारी अधिका–याची नावे किंवा भूमि अभिलेख कार्यालयात फेरफार झाला असेल तर त्या कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांची नावे ही शक्य असल्यास उपलब्ध करुन दण्याचा प्रयत्न करणे आवश्यक राहिल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांचे अर्जात मागणी केल्याप्रमाणे सन 1974–75 या कालावधीत संबंधित शिट नं. 61 अे प्लॉट नं. 1069 च्या बाबतीत महसुल किंवा भूमि अभिलेख ज्या कोणत्या कार्यालयातील अधिका–यानी फेरफार मंजुर केला असतील त्या अधिका–याची व कर्मचा–याची नावे हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसात उपलब्ध करुन द्यावी व रजिस्टर पोष्टाने अपीलकर्ता यांस पाठवावी.

2) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या संदर्भात कोणतीही सुनावणी घेतली नाही व निर्णय दिलेला नाही तसेच राज्य माहिती आयोगाच्या पुढे गैरहजर राहिलेले असून अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्याने उपसंचालक भूमि अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर यांना योग्य ती कारवाई करण्यासाठी त्यांचेकडे पोष्टने निर्णय पाठविण्यात यावा.

3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 6.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 284/2007.**

श्री मुकेश गोविंदा वाघाडे
शास्त्रीनगर पालोरा रोड मु.पो.ता.आरमोरी
जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, आरमोरी
ता. आरमोरी जि. गडचिरोली

2) जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि पर्यवेक्षक, आरमोरी
ता. आरमोरी जि. गडचिरोली ...... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 13/7/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 20.3.2006 च्या तारखेचा कार्यालयात प्राप्त 28.3.2006 चा माहितीचा अर्ज माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी यांचेकडे दाखल केला होता. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये सहपत्र जोडून पाच मुद्यांवरची माहिती मागितलेली होती.

''1) तालुक्यातील कृषी सहाय्यक शासनाचे धोरणानुसार त्यांचे मुख्यालयी राहतात किंवा नाही राहत नसल्यास त्यांना घरभाडे भत्ता, आदिवासी भत्ता व इत ईतर भत्ते व सोयीसवलती देण्यात आल्या आहेत किंवा नाही.

2) तालुक्यास शासनाचे धारणानुसार लाभार्थ्याची शेतात मजगी व ईतर योजनेअंतर्गत माती टाकण्यात आली त्याबाबतचे सन 2003 ते 2004 व 2004 ते 2005 चे मस्टर सामाजिक ऑडिटचे दृष्टीने वाचन करण्यासाठी ग्रामपंचायतीना पुरविण्यात आले आहे काय. दोन्ही वर्षाचे (2003 ते 2004 व 2004 ते 2005) मस्टरची प्रत पुरविण्यात यावी व वाचन केल्याचा पुरावा देण्यात यावा.

3) शासकीय योजने अंतर्गत शासनाकडून तालुक्याला प्राप्त निधी (2003 ते 2004, 2004 ते 2005) मस्टरची प्रत पुरविण्यात यावी व वाचन केल्याचा पुरावा देण्यात यावा.

4) सन 2003 ते 2004 व 2004 ते 2005 या वर्षात शासनाच्या योजने अंतर्गत शेतकरी लाभार्थ्यांना दिलेल्या लाभार्थ्याची माहिती पुरविण्यात यावी.

5) शासनाच्या कृषी सप्तक व इतर योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या व स्वयंसेवी संस्थाच्या योजनेवर सन 2004 ते 2005 मध्ये योजना निहाय खर्चाची माहिती पुरविण्यात यावी.''

माहितीचा कालावधी सन 2003 ते 2004, 2004 ते 2005 आहे व माहिती स्वतः वैयक्तिक घेणार असे नमुद केले आहे.

3. ''सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये दि. 18.4.2006 रोजी मागितलेली माहिती काढण्याचे काम सुरु असून संपूर्ण माहिती काढण्याकरीता अजून 8 ते 10 दिवसाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. माहिती पूर्ण होताच आपणास पुरविण्यात येईल (जावक क्रमांक माहिती/270/06) हे पत्र दि. 19.4.2006 ला दुपारी 2.30 वाजता अपीलकर्ता यांना प्राप्त झालेले आहे दि. 27.4.2006 रोजी जावक क्रमांक/ ताकृअ/केंमाअ/चालन/315/06 प्रमाणे माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त शुल्क रुपये

13600/— चा भरणा करावा व माहितीची फी जमा केल्या नंतर 8 ते 10 दिवसानंतर पुरविण्यात येईल कारण माहिती पुष्कळ असल्यामुळे झेरॉक्सला वेळ लागेल'' असे कळविलेले आहे. व सदरच्या माहितीचा खर्चाचा भरणा दि. 6.5.2006 पूर्वी करावा असेही कळविण्यात आले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी खर्चाचे शुल्क न भरता दि. 3.5.2006 रोजी प्रथम अपील सादर केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 4.5.2006 रोजी अतिरिक्त शुल्क रु. 13600/— भरण्याबाबत कळविले असून फी जमा केल्यानंतर 8 ते 10 दिवसात माहिती देण्याबाबत कळविले. व दि. 5.5.2006 कार्यालयात कार्यालयीन वेळेत हजर राहावे असे अपीलकर्ता यास कळविले. त्यानंतर दि. 1.6.2006 रोजी पुन्हा पत्राने कळविले की दि. 5.6.2006 ला कार्यालयात हजर राहिले व तेव्हा दि. 5.5.2006 ला कार्यालयात कार्यालयीन वेळेवर हजर राहावे. परंतु अपीलकर्ता हे दि. 5.5.2006 रोजी हजर राहिले नाही व दि. 6.6.2006 चे पत्रानुसार दि. 3.5.2006 रोजी राज्य माहिती आयोग मुंबई यांचेकडे अपील दाखल केले असल्याने पुढील तारखांना अपील संदर्भात उपस्थित राहाणे आवश्यक वाटत नाही असे पत्र दिले. दि. 3.6.2006 रोजी सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ता यांनी मागवलेली माहिती ही विस्तृत व अतिशय व्यापक असल्यामुळे दि. 18.4.2006 रोजी तालुका कृषी अधिकारी आरमोरी यांनी त्यांना असे कळविले आहे त्याकरीता सदरची माहिती ही वेगवेगळया शाखांमधून संकलीत करण्यासाठी प्रभारी मंडळ कृषी अधिकारी आरमोरी श्री एफ. आर. टी. शहा व श्री डी. व्ही. डोंगरे रा. अ. आरमोरी यांना माहिती संकलित करुन पाठविण्यासाठी पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा उपविभागीय कृषी अधिकारी वडसा यांनीसुध्दा माहिती अधिकारी श्री बावनकर यांना अपीलकर्ता यांनी कळविलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून पत्राने कळविलेले दिसते. या सर्व पत्रव्यवहारावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी

मागितलेली माहिती ही विस्तृत व व्यापक असून दोन वर्षाच्या कालावधीतील आहे. सदरची माहिती पुरविण्याच्या दृष्टीने अपीलकर्ता यांनी प्रयत्न केलेले दिसून येत आहे. व त्यामुळे माहितीचा अंदाज आल्यावर त्यांनी खर्चाची माहिती कळविलेली दिसते यावरुन माहिती अधिकारी हे माहिती पुरविण्याची टाळाटाळ केली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. आता प्रश्न राहातो तो अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती प्रत्यक्ष पुरविण्याकरीता रु. 13600/– खर्च येईल असे कळविलेले आहे. त्याबाबत खर्चाचा भरणा केल्यानंतर याबाबत 8 ते 10 दिवसात माहिती देण्यात येईल असेही कळविलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी सदरच्या खर्चाचा भरणा केलेला नाही प्रथम अपीलामध्ये खर्चाच्या बाबत तक्रार उपस्थित केली होती पण प्रथम अपीलाच्या चौकशीस उपस्थित राहाणे त्यांनी नाकारलेले आहे व त्या प्रथम अपीलाचा निर्णय होण्यापूर्वीच द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. द्वितीय अपीलाच्या सुनावणीतसुध्दा माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा माहिती विहीत मुदतीत दिली नाही याबद्यलच सुरुवातीपासून त्यांनी सारखा भर दिलेला आहे. आपणास माहिती हवी आहे काय असे विचारले असता माहिती हवी आहे परंतु उत्तरवादीनी ती तयारच केली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे उत्तरवादींनी असे सांगितले की माहिती ही 5000 प्रतींमध्ये आहे. 5000 प्रतीचा झेरॉक्सचा खर्च हा भरल्याशिवाय प्रती तयार करणे योग्य नाही व म्हणून तयार केले नाही. मात्र अपीलकर्ता यांना हवी असलेल्या माहितीचे सर्व अभिलेख त्यांनी आयोगाच्या कार्यालयात आणलेले आहे त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती हवी असेल तर त्यांनी रु. 13600/– चा भरणा केल्यास त्यांना त्यानंतर माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांचे अपील त्यांनी खर्चाचा भरणा न केल्यामुळे फेटाळण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता यांना माहिती हवी असल्यास त्यांनी रु. 13600/- चा भरणा करावा व भरणा केल्याच्या नंतर 20 दिवसामध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 6.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 277/2007.**

श्री उदयभान दमडुजी मालाधारी
प्लॉट क्र. 44, रोड क्र. 10, विश्वकर्मानगर
मेडीकलच्या मागे, नागपूर 27. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
रेल्वे स्टेशन जवळ, नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
विभागीय वाहतुक अधिकारी
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
विभागीय कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर. ...... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7/2/2006 रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश 2002 च्या कलम 11 (3) अन्वये अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी माहिती मिळण्यासाठी अर्ज हा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश 2002 च्या अन्वये अर्ज केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जामध्ये त्यांनी चालक वाहकाच्या हजेरीबाबत माहिती मागितलेली आहे. सदरच्या अर्जाप्रमाणे विहीत मुदतीत

माहिती मिळाली नाही म्हणून पुन्हा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश 2002 च्या कलम 11 (1) प्रमाणे अपील दाखल केले. व वर नमुद केल्याप्रमाणे द्वितीय अपीलसुध्दा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश 2002 च्या कलम 11 (3) प्रमाणे अर्ज दाखल केला. अपीलकर्ता यांनी दाखल केलेला अर्ज, प्रथम अपील व द्वितीय अपील हे तिनही महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश 2002 प्रमाणे दाखल केलेले असल्यामुळे व सदरच्या अध्यादेशाचे रुपांतर हे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश 2002 मध्ये झालेले होते व महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश 2002 सुध्दा 11 ऑक्टोबर 2005 रोजी निरसीत झालेला असल्यामुळे व राज्य माहिती आयोग हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत गठीत झालेले असल्यामुळे राज्य माहिती आयोगास कोणत्याही प्रकारचा सदरचे अपीलाच्या संदर्भात निर्णय देण्याचा कोणताही अधिकार नाही. अपीलकर्ता यांना त्यांनी विचारलेली माहिती हवी असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत त्यांनी माहिती अधिकारी यांचेकडे नविन अर्ज करावा. अधिकारीते अभावी सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराचा अर्ज, प्रथम त्यावरील अपील, त्यावरील द्वितीय अपील हे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश 2002 च्या प्रमाणे दाखल केलेले असल्यामुळे व राज्य माहिती आयोग हा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अन्वये गठीत झालेला असल्यामुळे सदरच्या अपीलाचे कामकाज चालवण्याचा अधिकार आयोगास नाही व अधिकारीते अभावी सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता यांना माहिती हवी असल्यास त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6 प्रमाणे संबंधित माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 6.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 50/2007.**

श्री प्रमोद गणपतराव पिंगे
क्वार्टर नं. 35, टाईप 3, बिल्डींग नं. 3,
सरकारी वसाहत, रविनगर, नागपूर. ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर. ...... **गैरतक्रारदार**

<u>वि वे च न</u>

तक्रारदार यांनी दिनांक 21/3/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (3) प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रादार यांनी दि. 22.1.2007 रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जाप्रमाणे दि. 17.2.2007 रोजी त्याना माहिती उपलब्ध करुन देण्याचे उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु तक्रारदार यांनी ज्या माहितीच्या बद्यल छायांकित प्रती मागितलेल्या होत्या त्या छायांकित प्रतीच्या संदर्भामध्ये रु. 40 चा भरणा करणेसाठी त्यांना कळविले होते. त्याप्रमाणे त्यांनी रु. 40 चा भरणा केलेला आहे. परंतु माहितीच्या प्रती उपलब्ध करुन देतांना दोन झेरॉक्स प्रती हया साक्षांकित करुन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत त्यामुळे तक्रारदार यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार व नियम 2005 चा नियम 4 प्रमाणे प्रती छायांकित प्रती रु. 2 प्रमाणे उपलब्ध करुन द्यावयाचे असल्याने रु. 36 हे जास्त आकारलेले आहे अशी तक्रार केलेली आहे.

3. सदरच्या तक्रारीबद्यल गैरतक्रारदार यांना विचारले असता त्यांनी त्यांच्या पूर्वीच्या नियमाप्रमाणे छायांकित प्रती सांक्षांकित करुन देण्याकरीताच्या नियमाप्रमाणे सदरचे शुल्क आकारण्यात आलेले आहे अशी नियमाची प्रत दाखवून सांगितले. तसेच माहितीचा अधिकार नियम 2005 च्या नियम 4 मधील (अ) प्रमाणे पूर्वीच्या नियमानुसार नकल फी आकारता येते व त्याप्रमाणे आकारली आहे असे सांगितले. त्याकरीता त्यांना बोर्डाचे नियम दाखविले त्यावर तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की मी छायांकित सांक्षांकित करुन मागितलेली नाही व त्यामुळे दोन प्रती हया रु. 2 प्रमाणे रु. 4 हे आकारावयास पाहिजे होते व त्यामुळे त्यांना रु. 36 हे तर परत पाहिजे परंतु चुकीची आकारणी केल्यामुळे त्याबाबतचे नुकसान भरपाई पण त्यांना मिळावी.

4. गैरतक्रारदार यांनी जे सांक्षांकित करुन ज्या प्रती दिलेल्या आहेत त्या छायांकित प्रती आहेत. वास्तविक छायांगित प्रती हया सांक्षांकित करुन देणे योग्य नाही. सांक्षांकित प्रती प्रत्यक्ष द्यावयाचे असल्यास त्या नकल करुन साक्षांकित करुन देणे अभिप्रेत आहे. तसेच तक्रारदार यांनी सांक्षांकित प्रती मागितलेली नसल्यामुळे त्यांना रु. 36 हे परत करणे संयंक्तिक राहिल. व तक्रारदाराची जी तक्रार मनःस्तापाबद्यलची आहे त्याबद्यल मात्र कोणत्याही प्रकारची कारवाईची शक्यता नाही कारण माहिती अधिकारी यांनीसुध्दा त्यांच्या नियमाप्रमाणे फी आकारलेली आहे मात्र त्यांना संपूर्ण माहिती ही विनामुल्य देणे न्यायाचे हाईल व त्याप्रमाणे रु. 40 हे गैरतक्रारदार यांनी त्यांना परत करणे संयुक्तिक राहिल.

## <u>नि र्ण य</u>

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून तक्रारदार यांना रु. 40 हे गैरतक्रारदार यांना निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसात परत करावे.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 7.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 97/2007.**

श्री प्रमोद गणपतराव पिंगे
क्वार्टर नं. 35, टाईप 3, बिल्डींग नं. 3,
सरकारी वसाहत, रविनगर, नागपूर. ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर. ...... **गैरतक्रारदार**

<u>वि वे च न</u>

तक्रारदार यांनी दिनांक 9/4/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (3) प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रादार यांनी दि. 1 मार्च 2007 रोजी माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरची माहिती दि. 30.3.2007 रोजी गैरतक्रारदार यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु सदरची माहिती दिशाभुल करणारी आहे अशी तक्रारदार यांचे म्हणणे असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील न दाखल करता अधिनियमाच्या कलम 18 (1) चा आधार घेवून तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीमध्ये दिशाभूल करणारी माहिती व माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता आकारलेले शुल्क याबद्यलची तक्रार केलेली आहे.

3. तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी ज्या खाजगी भुखंड दंड आकारणीबद्यल माहिती विचारलेली आहे ती माहिती न देता नागपूर सुधार प्रन्यासचे

सर्वसाधारण धोरण ती माहिती देण्यात आली असून ती दिशाभूल करणारी आहे त्यावर तक्रारदार यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या भुखंडाच्या संदर्भात जी काही दंड आकारणी केलेली आहे ती त्यांना पुरविलेल्या माहितीच्या नागपूर सुधार प्रन्यासच्या नियमाप्रमाणे असल्यामुळे व तीच माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांना दिशाभूल करणाची माहिती दिली असे नाही. जे धारेण नागपूर सुधार प्रन्यासचे आहे व ज्या धोरणाप्रमाणे दंड आकारणी होत आहे तीच माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. याबाबत तक्रारदाराचे म्हणणे असे आहे की असे त्यांना करता येत नाही हे तक्रारदाराचे म्हणणे हे त्या धोरणाच्या गुणवत्तेबद्यल आहे व त्याबद्यल त्यांना स्वतंत्र तक्रार ही नागपूर सुधार प्रन्यासकडे दाखल करुन न्याय घेता येईल. ज्या धोरणाप्रमाणे दंड आकारण्यात येत आहे त्याच धोरणाची माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे माहिती दिशाभूल करणारी दिली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. पुन्हा मुद्या असा राहातो की उपलब्ध करुन दिलेली माहिती हयाबद्यल आकारलेले शुल्क हे वाजवी आहे काय. तक्रारकर्त्याचे म्हणणे असे आहे की ते अवाजवी आहे. व त्यांनी व्यक्तीशः माहिती घेतली असल्यामुळे रु. 18 हे त्यांना परत करण्यात यावे.

## <u>नि र्ण य</u>

1) तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती ही नागपूर सुधार प्रन्यासच्या सर्वसाधारण धारणाप्रमाणे असल्यामुळे ती दिशाभूल करणारी नाही परंतु माहिती उपलब्ध करुन देतांना रु. 20 शुल्क आकारणी केलेली आहे त्यापैकी रु. 18 त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसात परत करण्यात यावे.

3) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 7.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 285/2007.**

श्री प्रमोद मन्सारामजी गायधनी
मु.पो.ता. लाखनी, शेदरे किराणा दुकानाजवळ
सेलोटी रोड, जि. भंडारा 441804 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, भंडारा

2) जन माहिती अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (रोहयो) भंडारा ...... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 10/6/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 13.10.2005 रोजी माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी रोहयो यांचेकडे 5 सप्टेंबर 2005 ला मौजा कवलेवाडा येथील 33 मजुरांचे बयाणाची सत्यप्रत तसेच रोहयो सदस्य भरत खंडाईत यांचेवर पोलीस पाटील, सरपंच यांच्या बयाणाची सत्यप्रत व्यक्तीशः मागितली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 28 ऑक्टोबर 2005 रोजी उपजिल्हाधिकारी रोहयो भंडारा यांनी प्रस्तुत प्रकरणात चौकशीची

कारवाई सुरु असल्यामुळे या प्रकरणातील मागणी केलेले दस्ताऐवज उक्त अधिनियमाचे 7 (ज) तथा (त्र) अन्वयेच्या तरतुदीनुसार आपणास देता येत नाही असे कळवून अर्ज फेटाळण्यात आले होते. सदरच्या निर्णयाच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी दि. 2.3.3006 रोजी प्रथम अपील जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडे दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात येवून चौकशी सुरु असल्यामुळे अहवाल देता येणार नाही असे कळवावे व प्रकरण नस्तीबध्द करावे असा निर्णय घेतला होता. सदरच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते असे उपजिल्हाधिकारी यांनी सांगितले. व अपीलकर्ता स्वतः हजर असल्यामुळे कळविण्यात आले नव्हते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराचा अर्ज दि. 13.10.2005 रोजी दाखल केला असल्यामुळे व दि. 12.10.2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या प्रपत्रामध्येच तो दाखल केलेला असल्यामुळे सदरच्या अर्जास उत्तर देतांना महाराष्ट्राच्या अधिनियमाच्या कलमाचा उल्लेख केलेला दिसून येतो. असे जरी असले तरी प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस मात्र आज दाखल केलेल्या खुलाशामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (ज) चा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे या तांत्रिक बाबींचा विचार न करता माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे तपासून पाहता योग्य वाटते. कोणत्याही प्रकरणातील चौकशी सुरु असल्यास चौकशी संपेपर्यंत व त्या चौकशीचा निर्णय पूर्ण होईपर्यंत त्या संबंधातील माहिती ही प्रकट करण्यामुळे सदरच्या चौकशी प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण होवू शकतो व त्यामुळे अशा प्रकारे चौकशीच्या प्रक्रियेतील चौकशी सुरु असतांना मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत अपवाद हा माहितीचा अधिकार अधिनियम 8 (ज) प्रमाणे करण्यात आलेला आहे. आज माहिती अधिकारी यांनी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेल्या

खुलाशामध्ये सुध्दा '' मागितलेल्या माहिती संबंधाने चौकशी प्रकरणातील बयाणाच्या प्रती कार्यवाही सुरु असल्यामुळे देण्यात आलेल्या नाही. रोहयो अधिनियमानुसार चौकशी अहवाल आणि दोषारोपपत्रे सक्षम प्राधिकारी मा. विभागीय आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांना आवश्यक सहपत्रासह सादर करण्यात आली आहे. अंतिम निर्णय त्यांचे स्तरावर विचाराधीन आहे असे नमुद केले असल्यामुळे आज अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे संयुक्तीक होणार नाही मात्र संपूर्ण चौकशीचा निर्णय जाहीर झाल्यानंतर उपलब्ध करुन देण्यास हरकत घेता येणार नाही. त्यामुळे सदरचे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे माहितीच्या अर्जास दि. 28.10.2005 रोजी दिलेले उत्तर हे योग्य असल्यामुळे व आजही सदरच्या उत्तराप्रमाणे परिस्थिती कायम असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे फेटाळण्यात येत आहे.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 7.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 288 / 2007.**

श्री नारायण दाजीबा धकाते,
इंदिरा गांधी वार्ड, लहरी आश्रम जवळ,
भंडारा जि. भंडारा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, भंडारा
ता. जि. भंडारा

2) जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था तालुका भंडारा
जिल्हा भंडारा ...... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 29 / 1 / 2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 11.7.2006 रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था भंडारा यांचेकडे त्यांच्या गृहनिर्माण संस्थेमधील त्यांच्या प्लॉटच्या क्षेत्रफळाच्या व समोरच्या रस्त्याच्या रुंदीबाबत संदर्भामध्ये माहिती मागितलेली होती. परंतु विहीत मुदतीत माहिती

त्यांना न मिळाल्यामुळे त्यांनी दि. 11.10.2006 रोजी पुन्हा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे माहितीच्या अधिकाराचा अर्ज जोडपत्र 'अ' मध्ये केला. पुन्हा दि. 19.10. 2006 रोजी सहा. निबंधक सहकारी संस्था तालुका भंडारा यांचेकडे जोडपत्र 'अ' मध्ये केलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून पुन्हा दिनांक 2.12.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे परंतु त्याची प्रत अपीलाचे कागदपत्रात दाखल केलेले दिसून येत नाही. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक 30.12.2006 रोजी देण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. 29.1.2007 रोजी सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलामध्ये माहितीच्या अर्जाचा, प्रथम अपीलाचा व त्यांच्या निर्णयाच्या कोणत्याही प्रकारचा उल्लेख नाही.

3. अपीलकर्ता यांची मुळ तक्रार ही लेआउट क्र. 4 मधील शासनाच्या नियमानुसार 20 फुटाचा रोड न करता त्या लेआउटचा रस्ता 7 फुटचा असल्याने त्यावर शासनाच्या नियमानुसार कोणतीच कारवाई केली नाही तसेच जागेचे गैरकृषी मंजुरी घेतलेली नाही अशा प्रकारची आहे. याबाबत दि. 25.6.2005 रोजी अपीलकर्ता यांनी सदरच्या संस्थेच्या पासून गृहनिर्माण सभासदांना पत्राद्वारे वस्तुस्थिती विशद करुन तक्रार केलेली आहे. त्याच्या प्रतिलीपी मंत्र्यांपासून पासून नगर रचनाकार अधिकारी यांचे पर्यंत सर्व अधिका–याला दिलेल्या आहेत. माहितीच्या दिनांक 11.7.2006 च्या अर्जापुर्वी सुध्दा त्यानी सहा. निबंधक सहकारी संस्था तालुका भंडारा यांचेकडे तक्रार केलेली दिसून येते. सदरच्या तक्रारीप्रमाणे त्यांना दि. 17.6.2006 रोजी अध्यक्ष भंडारा गृह निर्माण सहकारी संस्था मर्या. भंडारा यांना उद्येशून कार्यवाहीकरीता दिलेल्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांनी दिलेली आहे. व त्यात त्यांच्या तक्रारीच्या बद्यल योग्य ते मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. तरी सुध्दा दि. 11.7.2006 रोजी माहिती अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक`

यांचेकड अर्ज केला व त्यांना विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही अशी त्यांची तक्रार आहे. वास्तविक माहितीचा अर्ज करण्यापूर्वी सुध्दा त्यांना या सर्व प्रकरणाची माहिती आहे. त्यांना वर नमुद केल्याप्रमाणे सहा. निबंधक सहकारी संस्था तालुका भंडारा यांनी मार्गदर्शन पण केलेले आहे. दिनांक 11.7.2006 रोजी केलेल्या पत्राच्या संदर्भात दि. 13. 7.2006 रोजी संस्थेकडून माहिती मागितलेली आहे असे कळवून सहा. निबंधक सहकारी संस्था तालुका भंडारा यांचेकडे सदरचा अर्ज हस्तांतर करुन माहिती उपलब्ध करणेस कळविलेले आहे. परंतु सदर उत्तराची प्रत ही अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलाच्या कामकाजाच्या करीता दाखल केलेली नाही व पुन्हा मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून तक्रार करीत आहे. सहा. निबंधक सहकारी तालुका भंडारा यांनी दि. 1.11.2006 रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना एक पत्र पाठविलेले दिसून येते. व त्या पत्रात सुध्दा संस्थेकडून माहिती मागितलेली आहे व ती मिळाली आहे त्या माहितीची छायांकित प्रत अपीलकर्ता यास माहितीस्तव जोडलेली आहे. परंतू ही माहिती सुध्दा अपीलकर्ता यांनी अपीलाच्या कामकाजात दाखल केलेले नाही. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 30.12.2006 रोजी देण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयामध्ये अर्जदाराला विहीत मुदतीत माहिती दिलेली असल्याची खात्री झाल्यामुळे सदरचे प्रथम अपील हे फेटाळण्यात आले असून त्या निर्णयाविरुध्द अपील हे मुख्य माहिती आयुक्त मुंबई यांचेकडे करावे असे कळविलेले आहे. त्यानंतर सुध्दा दिनांक

9.1.2007 च्या पत्राप्रमाणे राज्य माहिती आयोगाचे कार्यालय नागपूर येथे सुरु झाले असल्यामुळे नागपूर येथील कार्यालयात द्वितीय अपील सादर करावे असे कळविलेले दिसून येते. यावरुन माहिती अधिकाराचा अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी जिल्हा उपनिबंधक यांनी योग्य ते निर्णय दिलेले

आहेत. परंतु अपीलकर्ता यांची मुळ तक्रार ही भंडारा गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. भंडारा रजि. नं. 304 चे लेआउट क्र. 4 मध्ये 20 फुटाचा रोड करणेबाबत किंवा लेआउट क्र. 4 शासनाच्या नियमानुसार मंजुर करुन प्लॉटचे वितरणाच्या संदर्भामध्ये कारवाई करुन मिळावी अशी अपेक्षा आहे. व तसे त्यांनी द्वितीय अपीलाच्या मेमोमध्ये सुध्दा म्हटलेले आहे.

4. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अर्ज केलेल्या तारखेस जी माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन देणे अपेक्षीत आहे. कोणत्याही प्रकारची प्रशासकीय कारवाई आदेश देणे हे राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत येत नाही. त्यातही अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे किंवा अपेक्षा व्यक्त केलेली आहे ती सहकार खात्याच्या कक्षेत येत नाही. संस्थेकडून जी माहिती त्यांना अपेक्षीत आहे ती माहिती माहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. ती पुर्वीच त्यांना माहिती होती. माहितीच्या अधिकाराचा अर्ज करण्यापूर्वी सुध्दा त्याबाबतची स्पष्ट कल्पना सहा. निबंधक यांनी त्यांना दिलेली आहे हे वर नमुद केलेले आहे. व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमाप्रमाणे अपीलकर्ता यांची कोणतीही तक्रार शिल्लक राहिलेली नाही असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अपीलकर्ता व अपीलीय अधिकारी यांना माहितीच्या अधिकाराच्या पुर्वीसुध्दा माहिती असल्यामुळे व अपीलकर्ता यास दि. 25.6.2005 च्या संस्थेच्या अध्यक्षांना व संचालकांना उद्येशून केलेल्या अर्जामध्ये केलेली तक्रार हीच मागितलेली माहिती व माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय

अधिकारी यांनी योग्य ते माहिती विहीत मुदतीत कळविली असल्याने सदरचे अपील हे फेटाळण्यात येत आहे.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 8.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 290/2007, 291/2007, 293/2007, 292/2007.**

1) श्रीमती शामदेव रामदेव जयस्वाल,

2) श्री प्रकाश रामदेव जयस्वाल

3) श्री दिपक रामदेव जयस्वाल

4) श्री प्रकाश रामदेव जयस्वाल

जय बम्लेश्वरी राईस इंडस्ट्रीज

मनोहर चौक, रामदेव सदन गोंदिया

जिल्हा गोंदिया 441601 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
विद्युत भवन भंडारा जि. भंडारा

2) जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
ओ. आणि एम. विभाग रामनगर गोंदिया ...... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ते यांनी दिनांक 24/4/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे एकुण 4 द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या चारही अपीलांची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ते यांनी दि. 28.2.2006 रोजी दिनांक 1.1.2001 ते दि. 31.12.2005 या कालावधीतील 1) मिटर चेंज रिपोर्ट 2) इन्स्पेक्शन रिपोर्ट अशी माहिती स्पिड पोष्ट नी मागितलेली होती. परंतु सदरच्या चारही अर्जाच्या करीता कोणत्याही प्रकारचे उत्तर हे उत्तरवादी यांनी न दिल्यामुळे अपीलकर्ते यांनी प्रथम अपील दि. 29.3.2006 रोजी दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी घेतलेली दिसत नाही व त्यामुळे सदरचे द्वितीय अपील अपीलकर्ते यांनी दाखल केलेले आहेत.

3. अपीलकर्ते यांनी केलेल्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दि. 9.3.2006 रोजी कार्यकारी अभियंता ओ ॲन्ड एम डिव्हीजन एम. एस. ई. डी. सी. गोंदिया यांनी सहाय्यक अभियंता एम.एस.ई.डी.सी. गोंदिया (ग्रामीण) यांना पत्र देवून माहिती अर्जदाराला द्यावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि. 4.4.2006 रोजी कार्यकारी अभियंता यांनी अपीलकर्ता यास मिटर बदलाच्या बाबत दि. 1.1.2001 ते 31.12.2005 च्या कालावधीतील जय बम्लेश्वरी राईस इंडस्ट्रीज आमगाव रोड गोंदिया यांच्या वेगवेगळया चार विज जोडणीबद्यल व एन.एस.सी. रिपोर्ट फॉर आय.पी. कनेक्शन नं. 617 आणि 601 माहिती म्हणून पुरविली आहे असे दिसते. सदरच्या पत्राच्या प्रती मात्र अपीलकर्ता यांनी आज दाखल केलेले आहेत.

4. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना जी माहिती आता पर्यंत उपलब्ध करुन दिली आहे ती वाचता येत नाही अशा परिस्थितीत माहिती मिळाली नाही असेच म्हणावे लागते. परंतु त्यांना चारही अपीलाच्या संदर्भामध्ये मागितलेली माहिती ही हवी आहे व ती मिळाल्यास त्यांची काहीही तक्रार राहणार नाही.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता यांचे चारही अपीले मंजुर करण्यात येत आहे. अपीलकर्ते यांनी त्यांच्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जामध्ये ज्याप्रमाणे माहिती मागितलेली आहे त्याप्रमाणे माहिती त्यांना आज उपलब्ध करुन देण्यात यावी व उर्वरीत माहिती ही सात दिवसाच्या आंत देण्यात यावी.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 8.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 294/2007.**

1) श्री परशुराम नारायणराव बोंदरे
681, नविन सुभेदार लेआउट,
दत्तात्रय नगर, नागपूर 24. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री आर. एस. आमवजे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक भूमि अभिलेख
तहसील कार्यालय (शहर) पहीला माळा, नागपूर.

2) श्री नरेंद्र पाटील
जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क्र. 3,
प्रशासकीय इमारत क्र. 1,
सिव्हील लाईन नागपूर. ...... **उत्तरवादी**

## <u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 5/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 27.6.2006 रोजी सन 1976 ते 27.6.2006 पर्यंत नगर भू क्रमांक 185 मधील पोट हिस्स्याच्या करण्यात आलेल्या नोंदी 185/1,2,3,4,5,6,7,8,

185/1/1 या संबंधी नोंदीसाठी अर्जदारानी सादर केलेले दस्तऐवज कायम केलेल्या नोंदी मोजणी संबंधी केलेले अर्ज, सर्व 'क' प्रतीच्या सांक्षाकित प्रती, कार्यालयाच्या अभिप्रायाच्या नोंदी व इतर पत्रव्यवहाराची संपूर्ण नस्ती मालमत्ता पत्रिकेसह साक्षांकित प्रती मिळणबाबत माहिती प्रत्यक्ष घेणार असेही नमुद केले आहे. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने दि. 24.7.2006 रोजी नकल फी प्रती पृष्ठ रु. 15 प्रमाणे भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले आहे. त्यावर दि. 31.6.2006 रोजी अपीलकर्ता यानी माहिती अधिकारी याना पत्र दिले. पृष्ठ संख्याच्या बाबत विचारणा केली होती. त्यानंतर दि. 9.9.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदर प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 8.10.2006 रोजी नगर भूमापन अधिकारी क्र. 3 नागपूर यांनी कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या तारखेचे कार्यालयात येवून निरीक्षण करावे व सदर तारखेमध्ये पाहिजे असलेल्या दस्तऐवज मार्क करुन देवून म्हणजे सदर दस्तऐवजाचे एकुण किती शुल्क होते ते सागितले जाईल व मागितलेल्या नकलाची प्रत निर्गमीत करण्यात येईल. सदरचे पत्राप्रमाणे अपीलकर्ता हे कार्यालयात उपस्थित झाले. व त्यांनी दाखविलेल्या नस्तीमध्ये त्यांना हवी असलेली कागदपत्रे उपलब्ध नसल्याने दि. 30.10. 2006 ला निरीक्षणार्थ उपलब्ध होवू शकेल असे संबंधित कार्यालय प्रतिनिधी श्री इंगळे यांनी कळविले अशी 18.10.2006 ची नोंद आढळून येते. त्यानंतर पुन्हा दि. 11.12.2006 रोजी नगर भूमापन अधिकारी क्र. 3 अपीलकर्ता यांना कार्यालयात उपस्थित होवून संबंधित धारीकेची पाहाणी केली असून त्यातील कागदपत्रे पाहिजे असल्याचे या कार्यालयास तसेच अधीक्षक भूमि अभिलेख नागपूर याना समक्ष सांगितलेले आहे व त्यामुळे कार्यालयाकडे उपलब्ध माहिती शिवाय पाहिजे असलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नसल्याने ती पुरविता येणार नाही असे कळविले आहे. त्यावर दि. 18.12.2006 रोजी अपीलकर्ता यांनी नगर भूमापन अधिकारी क्र. 3 यांना त्यांच्या निदर्शनास आणले

की दि. 16.11.2006, 18.11.2006 व 30.11.2006 ला संबंधित प्रकरण धारिका उपलब्ध नव्हती. तसेच त्याना पाहिजे असलेल्या कागदपत्रासंबंधी आखीव पत्रिकेतील नोंदी पिवळया रंगाने रेखांकीत केली आहे तरी निर्देशीत नोंदी संबंधिचा अर्जदाराचा अर्ज इत्यादी माहिती त्यांना हवी आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 19.9.2006 व 7.10. 2006 रोजी अधीक्षक भूमी अभिलेख यांनी नगर भूमापन अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देणेबद्यल आदेश दिलेले आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील दि. 2.2.2007 रोजी दाखल केलेले आहेत. अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती ही सन 1976 ते दि. 27.6.2006 पावेतो असल्यामुळे अतिशय जुनी असून व्यापक प्रमाणात आहे. माहितीचा अर्ज आल्यानंतर त्यावर कारवाई केलेली दिसून येत आहे. माहिती देण्याचे टाळाटाळ होत आहे असे दिसून येत नाही. परंतु अपीलकर्ता यांना हवी असलेली माहिती व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती यातून हव्या असलेल्या माहितीचा नेमका अर्थबोध न झाल्यामुळे हे संपूर्ण पत्रव्यवहार झालेला दिसून येतो. ज्यावेळेस जुनी माहिती मागितली त्या त्या वेळेस चांगला उपाय म्हणून अभिलेख्याचे निरीक्षण देणे व त्यामुळे हव्या असलेल्या कागदपत्राची माहिती उपलब्ध करुन देणे. परंतु माहितीच्या बद्यल निश्चित आकलन नसल्यामुळे ज्या नस्त्या अपीलकर्ता यांना दाखविले आहेत त्यातून त्यांना हवी असलेली माहिती आढळून येत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. आता अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस नगर भूमापन क्र. 185 च्या संदर्भामध्ये वेळोवेळी ज्या नोंदी घेतल्या गेल्या असतील त्या नोंदी घेताना जे अर्ज घेतले गेले असतील त्या अर्जावर झालेली काही नोंदी घेईपर्यंतची सर्व कार्यवाहीची माहिती त्याना हवी आहे असे दिसते व तशा प्रकारची माहिती त्याना माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक हाईल. माहिती अधिकारी यांनीसुध्दा सांगितले की भुमापन क्र. 185 च्या संदर्भात जी काही माहिती त्यांचेकडे उपलब्ध आहे ती सर्व त्यांनी

अपीलकर्ता यांना दाखविलेले सुध्दा आहे व आजही आणलेली आहे. परंतु वर म्हटल्याप्रमाणे प्रत्यक्ष अपीलकर्ता यांनी त्यातील कागदपत्रे पाहून त्याना हवी असलेली माहिती जी नोंद करुन सांगितल्यास ती उपलब्ध करुन देता येईल. वेळोवेळी केलेल्या मोजणीच्या संदर्भामध्ये सुध्दा कागदपत्रे उपलब्ध असतील ती त्याना दाखविले व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक हाईल. तसेच त्यांना अपेक्षीत असलेली माहिती आज उपलब्ध नसेल तर त्या संबंधीचा शोध घेणे व तो उपलब्ध झाल्यास त्याना माहिती उपलब्ध करुन देणे हा एक मार्ग आहे व त्याप्रमाणे माहिती अधिकारी यांनी सदरच्या नस्तीचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देणे योग्य होईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत आहे.

2) भुमापन क्र. 185 च्या संदर्भात ज्या ज्या नोंदी 1976 पासून वेळोवेळी झालेल्या असतील त्या नोंदीकरीता आलेले अर्ज व त्यावर झालेली कार्यवाही त्या नस्त्याचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन द्यावी.

3) उपलब्ध असलेल्या नस्तीमध्ये अपीलकर्ता यांनी पुन्हा निरीक्षण करुन त्याना हवी असलेल्या कागदपत्राची माहिती देवून त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन घ्यावी. सदरचे कागदपत्र ही देतांना महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे छायांकित प्रत 2 रु. प्रती प्रमाणे आकारण्यात यावे. व प्रमाणित प्रत हवी असल्यास कार्यालयाने केलेल्या नियमाप्रमाणे फी ची आकारणी करावी. हा निर्णय मिळाल्यापासून 1 महिन्याच्या आंत त्याना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी.

4) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 9.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 278/2007.**

1) श्री डॉ. अभय शालीग्राम गजभिये
171, नझूल लेआउट बेझनबाग,
नागपूर 440004 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री श्रीकांत पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई 400032

2) जन माहिती अधिकारी तथा
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई 400032 ...... **उत्तरवादी**

## <u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 1/6/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 22.2.2007 रोजी मा. राज्यपालांचे उपसचिव यांचेकडे माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जामध्ये मुंबई नागरी सेवा नियम 1939 नियम 7 नोट 3 (बी) व शासन परिपत्रक दि. 1.11.2003 च्या बद्यल 8 प्रश्न उपस्थित करुन अभिप्राय मागितलेले आहेत. प्रश्न खालीलप्रमाणे –

A) Whether this GR dated 1.11.2003 issued by order and by name of Hon'ble Governor of Maharashtra is implemented in the State of Maharashtra ? Kindly confirm the validity of GR issue by name and order by Hon'ble Governor of Maharashtra and issue certified document to that effect.

B) Is there any dead line or time bound period prescribed to be implemented the GR dated 1.11.2003 or is their Constitutional provisions to adopt the GR from the date of issue? Please clarify and issue certified documents.

C) Whether the various Departments working under Maharashtra Government can ignore the binding directions issued by Government under the authority and name of Governor of Maharashtra?

D) By ignoring provisions of GR dated 1.11.2003 it is possible to permit for in-service candidates to be appointed by nomination through MPSC? Whether the provisions made to get blanked exemption for age relaxation under the authority of Bombay Civil Service Rule 1939 Rule 7 Note 3 (b) still exist today? If so, kindely provide certified document.

E) If nominations are made by MPSC ignoring or not amending the provisions of GR dated 1.11.2003 has violated duty bound instructions? Therefore the selections made thereafter is improper, unfair and illegal? Please clarify and issue necessary documents.

F) Whether the provisions made in GR dated 1.11.2003 has to be read synchronously with Recruitment Rules without incorporating in it? Please clarify and issue documents to that effect.

G) Whether the provisions made in GR dated 1.11.2003 is mandatory? If so provide certified documents.

H) Whether the advertisement issued by MPSC for nomination of in-service candidates by giving blanket age relaxation is illegal? Kindly clarify and issue documents to that effect.

I) Whether Hon'ble Supreme Court upheld the decisions of Hon'ble Governors orders? Please quote citations of Hon'ble Supreme Court or High Courts.

सदरच्या अर्जातील माहिती ही सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित असल्यामुळे मा. राज्यपालाच्या कार्यालयाने सदरचा अर्ज हा सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे हस्तांतर केला. दि. 14.3.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या अंतर्गत जी माहिती अभिलेखाच्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच्या प्रती उपलब्ध करता येतात. काही विशिष्ट मुद्दे उपस्थित करुन त्या वर भाष्य करणे किंवा स्पष्टिकरण करुन शंकासमाधान करणे हे माहितीचा अधिकार

अधिनियमाच्या तरतुंदीप्रमाणे अभिप्रेत नाही. विधीविषयक अभिमत मागणे हे तर अभिप्रत नाहीच नाही तरीसुध्दा सेवा विषयक बाबींसंबंधी करावयाच्या कार्यवाहीची माहिती व परिपत्रकाच्या संदर्भात ''दि. 1.11.2003 चे आदेश सेवा प्रवेश नियमात वयोमर्यादा विहीत करण्याबाबतचे आहे. सदर परिपत्रकातील सुचना विचारात घेवून सर्व मंत्रालयीन विभागानी सर्व पदाच्या सेवा प्रवेश नियमात उचित सुधारणा आवश्यकतेनुसार करणे आवश्यक आहे. पदभरती ही त्या त्या पदाच्या सेवा परिक्षा नियमातील तरतुदीनुसारच केले जाते. दि. 1.11.2003 चे आदेश विचारात घेवून सेवा प्रवेश नियमात सुधारणा होईपर्यंत प्रचलीत सेवा प्रवेश नियमातील वयोमर्यादा तरतुद कायम राहाते'' असे समक्रमांकाचे दि. 24.1.2007 चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे असे अपीलकर्ता यास कळविले आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 29.3.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय हा दि. 4 मे 2007 रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी आयोगकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये अभिप्रायात्मक प्रश्नाच्या स्वरुपात माहिती विचारलेली असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके, आदेश, नोंदवहया, संविधान, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल) कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधार सामुग्री इत्यादींचा समावेश होतो. तसेच (त्र) ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेले किंवा त्याच्या अंतर्गत असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे व त्यात काही (एक) एखादे काम,

दस्तऐवज, अभिलेखे याची पाहाणी करणे (दोन) दस्तऐवज किंवा अभिलेखाच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रति घेणे (तिन) सामुग्रीचे प्रमाणित नमुने घेणे (चार) डिस्ट्रेस, फ्लॉपी, टेप, व्हिडीयो कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही ईलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबत मुद्रित प्रती मार्फत माहिती मिळविली याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो. वरील संज्ञेच्या व्याख्येच्या प्रमाणे असे दिसून येईल की माहिती व माहितीचा अधिकार यामध्ये कोणत्याही प्रकारे माहिती अधिका—याने कोणत्याही प्रकरणात अभिप्राय व्यक्त करणे अपेक्षीत नाही. माहिती अधिकारी हा त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या अभिलेख्यांचा परिरक्षक असतो (कस्टोडियन असतो) व माहितीच्या अर्जाच्या तारखेस त्याच्या कब्जात अभिलेख्याच्या स्वरुपात असलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे एवढेच अपेक्षीत आहे. माहिती अधिकारी हा मागितलेल्या माहितीच्या संदर्भात निर्णय प्रक्रियेतील अधिकारी असेलच असे नाही व त्यामुळे कोणत्याही प्रकारे माहिती अधिका—याने अभिप्राय व्यक्त करणे हे अपेक्षीत नाही. तो त्याबाबतचा सक्ष्म अधिकारी नसतो. व त्यामुळे अपिलकर्ता यानी त्याच्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जात अभिप्रायात्मक प्रश्न विचारलेले असल्यामुळे त्यातील कोणत्याही प्रश्नाच्या उत्तरातून अभिप्राय देणे हे त्याच्या शक्तीच्या बाहेरचे आहे. त्यामुळे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यास दि. 14.3.2007 रोजी दिलेले उत्तर हे योग्य आहे. त्याचप्रमाणे सदरचे दिलेले उत्तर हे विहीत मुदतीत आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा दिलेला निर्णय हा योग्य आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात येत आहे.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 9.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 297/2007.**

1) श्री अशोक सुदामराव रंगारी
वैशाली नगर, खात रोड, अण्णाजी किराणा
दुकानासमोर भंडारा 441904 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद भंडारा जि. भंडारा

2) जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी, आरोग्य विभाग,
जिल्हा परिषद भंडारा. ...... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 25/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 7.6.2006 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे 4 मुद्यावर माहिती मागितलेली होती. सदरची माहिती टपालाद्वारे घेण्यात येईल असेही नमुद केले होते. त्या अनुषंगाने पुन्हा 25.7.2006 रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांनी अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले आहे. त्यानंतर दि. 9.8.2006 रोजी पत्रान्वये

रु. 16 चालानाद्वारे भरणा करण्याकरीता कळविले होते. अर्जदाराने दि. 14.9.2006 रोजी रु. 16 चा भरणा केला. माहिती अधिकारी यांनी 15.9.206 ला त्यांनी मागणी केल्याप्रमाणे माहितीच्या आठ प्रती त्यांना देण्यात आलेल्या होत्या. माहिती देण्यात आल्याची पोच पावती सोबत जोडली आहे. पुन्हा दि. 19.9.2006 ला मुख्य कार्यपालन अधिकारी यांचे नावाने एक साधा अर्ज दिला. दि. 21.9.2006 च्या पत्रान्वये दि. 26.9.2006 ला उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु अर्जदार उपस्थित राहिले नाही. पुन्हा अर्जदाराने दि. 28.9.2006 ला एक पत्र देवून उपस्थित राहण्यासाठी दुसरी तारीख देण्यात यावी अशी विनंती केली. त्याप्रमाणे त्यांनी दि. 18.10.2006 ला उपस्थित राहण्या बाबत पत्र दिले. दि. 18.10.2006 ला समक्ष उपस्थित झाले होते. अर्जदाराने दिनांक 3. 10.2006 रोजी मानवाधिकार आयोगाकडे अर्ज केला होता असे दिसून येते.

3. वस्तस्थिती अशी आहे की अर्जदाराची पत्नी स्वर्गीय मनिषा अशोक रंगारी या प्राथमिक आरोग्य केंद्र मोहदुला येथे कार्यरत होत्या. दि. 4.11.2004 रोजी त्यांचा मृत्यु झाला. निवृत्ती वेतन त्यांचे पती अशोक रंगारी यांचे नावाने मंजुर करण्यात आले. श्री अशोक रंगारी यांनी दि. 6.5.2006 ला पुनर्विवाह केला. दि. 19.10.2006 ला कोर्टाचे पालकत्व प्रमाणपत्र सादर केल्यामुळे त्यांची मुलगी कु. मिनल यांचे नावाने कुटुंब निवृत्ती वेतन दि. 20.2.2007 ला मंजुर करण्यात आले. शासकीय गट विम्याचे प्रकरण कोषागार कार्यालय भंडारा यांना 28.2.2007 ला सादर करण्यात आले. आक्षेपासह प्रकरण कोषागारानी परत केले. दि. 14.6.2007 ला सादर करण्यात आले.

4. वरील सर्व विवेचनावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी वारसापत्र व कोर्टाचे पालकत्व प्रमाणपत्र अर्ज करण्यापूर्वी सादर केलेले नव्हते व त्यामुळे विलंब झालेला आहे असे उत्तर दिलेले दिसून येते. निवृत्ती वेतनाच्या संदर्भात वारसापत्र दाखल करावे लागते याची कल्पना अपीलकर्ता यांना अपील करण्यापूर्वीच होती.

त्याकरीता अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणेच मे महिन्यामध्ये त्यांनी मुलीच्या कोर्टाच्या पालकत्व प्रमाणपत्राचा अर्ज केला होता तसेच तहसीलदार यांचेकडे सुध्दा अर्ज केला होता. याचा अर्थ निवृत्ती वेतनाचे संदर्भात वारसापत्राची आवश्यकता असते याची त्यांना कल्पना होती व तरीसुध्दा त्यानी दि. 7.7.2006 च्या माहितीच्या अर्जात निवृत्ती वेतन मंजुर करण्यास विलंब कां लागतो असे विचारलेले होते. व त्या अनुषंगाने 25.7.2006 चे पत्राप्रमाणे उत्तर देण्यात आलेले आहे. 25.7.2006 च्या पत्रामध्ये वारसाप्रमाणपत्र दाखल केल्या शिवाय निवृत्ती वेतन प्रकरण निकाली काढणे शक्य होणार नाही असे कळविले असतांनासुध्दा त्यानंतर वारसा प्रमाणपत्रा करीता अपीलकर्ता यानी अर्ज केला असता तर माहितीच्या अधिकारात त्याना माहिती मिळाली व त्यानंतरच कारवाई सुरु झाली असे म्हणता आले असते. अपीलकर्ता यांना दि. 20.4.2005 रोजी कुटुंब निवृत्ती वेतन मंजुर करण्यात आले होते परंतु ते त्यांच्या मुलीच्या नावाने हवे होते. व त्याकरीता त्यांनी अर्ज केला होता. परंतु पालकत्व किंवा वारसाप्रमाणपत्र सादर केलेले नव्हते. थोडक्यात अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक 7.7.2006 च्या अर्जाप्रमाणे दि. 25.7.2006 रोजी विहीत मुदतीत कुटुंब सेवा निवृत्ती वेतन प्रकरण व इतर अनुषंगीक आर्थिक लाभाचे प्रस्ताव वारसा प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे निकाली काढण्यात आलेले नाही हे विलंबाचे कारण दिलेले आहे. तसेच त्यांच्या दिनांक 9.8.2006 च्या अर्जाप्रमाणे त्याना दि. 15.9. 2006 रोजी माहिती विहीत मुदतीत देण्यात आलेली आहे त्याची पोच त्यानी दिलेली आहे व त्यामुळे त्यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता यांचे अपील त्यांना माहिती विहीत मुदतीत मिळाली असल्यामुळे फेटाळण्यात येत आहे.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 9.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 298/2007.**

1) श्री बाबुराव एम. खोब्रागडे
बजरंग नगर, गली नं. 7,
पो. भगवान नगर, नागपूर – 27 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर 2,
नागपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर 2,
नागपूर. ...... **उत्तरवादी**

## <u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 5/2/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व विभागीय सहकारी निबंधक सहकारी संस्था नागपूर हे हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 31.5.2005 रोजी महराष्ट्र माहितीचा अधिकारी अधिनियम 2002 प्रमाणे शिरसपेठ को. ऑप. हाउसिंग सोसायटी कडून 1) सदरच्या उपविधीची प्रमाणणीत प्रत 2) संस्थेच्या पदाधिका–यांची यादी 3) संस्थेच्या सन 81–82, 82–83, 83–84, 84–85, 85–86 व 2003 व 2004 वर्षाच्या ऑडिटची प्रत 4) नियम जे व आय

ची प्रत स्वतः उपस्थित राहून माहिती घेण्यात येईल असे नमुद केले. सदरच्या अर्जाप्रमाणे दि. 27.7.2005 रोजी अध्यक्ष/सचिव सीरसपेठ को–ऑप. हाउसिंग सोसायटी याना अपीलकर्ता यांना माहिती देण्याबद्यल पत्र उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर–2 यांना लिहिलेले दिसते व त्याची प्रत अपीलकर्ता याना दिलेली दिसते. पुन्हा दि. 7.7.2005 रोजी माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 7.2.3006 रोजी तांत्रिक बाबीवर देण्यात आलेला दिसतो. दि. 21.9.2005 रोजी अपीलकर्ता यांना जिल्हा उपनिबंधक यांनी अपीलाच्या संदर्भात कळविलेले दिसते. दि. 5.1.2006 रोजी पुन्हा प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. पुन्हा 15.4.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दिनांक 5.5.2006 रोजी पुन्हा एक स्मरणपत्र दिलेले दिसून येते परंतु अपीलकर्ता यांस माहिती मिळालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांचा मुळ अर्ज हा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 प्रमाणे असल्यामुळे सदरच्या अर्जाच्या संदभामध्ये पुढील सर्व कार्यवाही ही महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या अंतर्गत व्हावयास पाहिजे होती. परंतु जे प्रथम अपील हे दि. 12.10.2005 च्या नंतर दाखल झालेले आहे ते माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी अन्वये दाखल केलेले आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 हा दि. 11.10.2005 रोजी निरसीत झालेला असल्यामुळे त्या अधिनियमाखाली दाखल केलेल्या अर्जाच्या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत अपील दाखल करता येत नाही. ते महाराष्ट्राच्या निरसीत झालेल्या कायद्या प्रमाणे दाखल करुन घेवून त्या प्रथम अपीलाचा निर्णय त्या कायद्याप्रमाणे द्यावयास

पाहिजे होता. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय त्या कायद्याप्रमाणे दिला असता तर द्वितीय अपील मा. लोक आयुक्त यांचेकडे दाखल करावयास पाहिजे होते. पण तसे न होता नंतरची कार्यवाही ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये झालेली असल्यामुळे व हे सदरचे द्वितीय अपीलसुध्दा केंद्रीय अधिनियमाप्रमाणे दाखल झालेले असल्यामुळे वैधानिक तांत्रिक कारणामुळे सदरच्या अपीलाचे बाबतीत गुणवत्तेवर निर्णय देता येणार नाही.

4. असे असले तरी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 या दोनही अधिनियमाचा उद्येश हा अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देणे असल्यामुळे अपीलकर्ता यास त्यांनी मागितलेली माहिती ही उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर–2 यांनी सदरच्या सहकारी संस्थेकडून उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता याना पुरविल्यास हेतु सफल होईल. सहकारी संस्था, सहकारी गृह निर्माण संस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम हा लागू होत नाही असे आयुक्त सहकार यांचे जरी परिपत्रक असले तरी सदरची गृह निर्माण सहकारी संस्था यांना शासनाने जागा वाजवी किंमतीमध्ये उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अप्रत्यक्षपणे शासनाची मदत सहकारी संस्थांनी घेतलेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यास पुन्हा अर्ज करावयास न सांगता सदरच्या सहकारी संस्थेकडून ही सदरची माहिती त्याना उपलब्ध करुन द्यावी. सदरचा हा आदेश हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये नाही त्याप्रमाणे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 प्रमाणे सुध्दा नाही तरी सुध्दा माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज हा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या अन्वये असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये द्वितीय अपील हे कायदेशीर नसल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) वर नमुद केल्याप्रमाणे तांत्रिक बाबीचा विचार न करता अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 10.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 300/2007.**

1) श्री जोगेश रामाजी राहुलकर (राऊत)
वल्लभभई वार्ड, रेलटोली, गोंदिया सिटी 441614
जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया

2) जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 17.6.2006 रोजी दिनांक 11 जुन 2006 रोजी दिलेल्या लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकेची झेरॉक्स आसन क्र. अे 063450 उमेदवाराला किती मार्क मिळाले व वर्ग 4 पदासाठी झालेल्या कार्यक्रमाची नोटींग, टिप्पन व निकष निवडीचे संपूर्ण माहिती पुरविण्याबाबत अशी माहिती मागितली होती. परंतु सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यास संपूर्ण माहिती मिळालेली दिसून येत आहे. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेल्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत साक्षांकीत करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले.

3. सदरच्या अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांनी सुरुवातीला सांगितले की मला माहिती मिळाली आहे परंतु उत्तरपत्रिकेची मिळालेली प्रत ही साक्षांकित करुन मिळालेली नाही. ती साक्षांकित करुन पाहिजे. उत्तरवादी यांना विचारले असता त्यांनी सांगितले की साक्षांकित करुन द्यायला कोणत्याही प्रकारची अडचण नाही.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांना मिळालेली माहितीची प्रत ही उत्तरवादी यांनी साक्षांकित करुन द्यावी
2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 10.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 190/2007.**

1) श्री वसंत लक्ष्मणराव निखारे
वसंतविहार, प्लॉट नं. 68, डायमंड नगर,
नागपूर – 440 009 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – 32

2) जन माहिती अधिकारी तथा
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – 32 ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 6/8/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. दि. 5.7.2006 रोजी माहिती अधिकारी हे हजर होते. व त्यावेळेस माहिती अधिकारी यांचेकडून सदरच्या प्रकरणी म्हणणे ऐकुन घेतले आहे व त्यामुळे आज हजर नाहीत. माहिती अधिकारी यांनी त्यांचे म्हणणेसुध्दा लेखी सादर केलेले आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे आज ऐकुन घेतले.

2. अपिलकर्ता यांनी दि. 30.1.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केला होता. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 13.3.2006 रोजी माहिती

अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 10.4.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी ही अपीलकर्ता हे गैरहजर राहिल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी न घेता त्यांचे प्रथम अपील हे नस्तीबध्द करुन टाकरण्यात आले.

3. द्वितीय अपीलाच्या संदर्भात वर नमुद केल्याप्रमाणे माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जाच्याप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. सदरच्या खुलाशाची प्रत ही अपीलकर्ता यांनी दिल्यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की श्री हिप्पलगावकर यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कोणतीही कार्यवाही शासन स्तरावर सुरु नव्हती हे माहिती अधिकारी यांचे म्हणणे बरोबर नसून त्यांचे माहिती प्रमाणे अशा प्रकारची शिस्तभंगाची कार्यवाही श्री हिप्पलगावकर यांचे विरुध्द सुरु होती व त्यामुळे त्यांना त्यांचे कागदपत्र उपलब्ध करुन देण्यास कोणतीही अडचण असू नये. श्री आर. सी. मेहरा यांचे प्रकरण सुध्दा 2003 पर्यंत सुरु होते. व त्यामुळे त्यांचेबाबतचे कागदपत्रे नष्ट झालेले आहेत हे म्हणणे बरोबर नसून सदरची कागदपत्रे उपलब्ध असलेच पाहिजे व त्यामुळे सदरची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यास कोणतीही अडचण असू नये. डॉ. कमलाकर पटवारी व श्री आचार्य याचे विरुध्द सेवानिवृत्तीच्या दिनांकाच्या पूर्वीच शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु होती व त्यामुळे त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनाच्या संदर्भातील कागदपत्रे ही उपलब्ध करुन देण्यास अडचण असू नये. फौजदारी गुन्हयाच्या अनुषंगाने विभागानी तक्रार केल्या शिवाय फौजदारी गुन्हा दाखल होवू शकला नसेल व त्यामुळे त्याबाबतची कागदपत्रे ही विभागाकडेच असावयास पाहिजे व ती माहिती अधिकारी यांनीच उपलब्ध करुन देण्यास हरकत असू नये. त्याचप्रमाणे श्री गोहणे वरिष्ठ लेखा परिक्षक यांचे आस्थापना विभाग बाबी संचालक लेखा व कोषागार यांचे अखत्यारीत येत असले तरी त्यांच्या निवृत्ती वेतन संदर्भातील आदेश हे शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पूणे यांनी दिनांक 16.6.2001 रोजी काढलेले आहे त्यामुळे सदरची माहिती ही शिक्षण विभागाने देण्यास

काही हरकत नाही. माहितीच्या अधिकाराच्या तरतुदी हया शिक्षण विभागाच्या अधिका–यांनी वाचाव्यात. माहिती ही विभागात उपलब्ध नसेल तर माहितीचा अर्ज ज्या सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असेल त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतर करुन तसे अर्जदारास कळविण्याचे असते व कोणताही अपील किंवा अर्ज हा नस्तीबध्द करता येत नाही. थोडासा अभ्यास केल्यास माहितीचे अर्ज योग्यरित्या निकाली काढता येतील.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांना शोध घेवून उपलब्ध करुन द्यावी.
2) उत्तरवादी यांना तातडीने मंत्रालयात निर्णयाच्या प्रती पाठवाव्यात.
3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 13.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 305/2007.**

1) श्री संजय दाजीबा मेश्राम
रा. स्वप्ननगरी एम पी डी 1 कॅम्प जवळ,
मौजा सुर्ला पो. आनंदवन ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद चंद्रपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 6/6/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी यांचे प्रतिनिधी म्हणून श्री आर. डी. पाटील उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 2.2.2006 रोजी सन 1996–97 ते 2004–05 प्राथमिक शिक्षकांची वरिष्ठ वेतनश्रेणी पंचायत समिती वरोरा बद्यल माहिती मगितली होती. त्यानंतर अपीलकर्ता यानी दि. 17.3.2006 रोजी संपूर्ण जिल्हयातील प्राथमिक शिक्षकांची

माहिती नको असून फक्त पंचायत समिती वरोरातील प्राथमिक शिक्षकांची वरिष्ठ वेतनश्रेणीच्या बद्यलची माहिती पाहिजे म्हणून अर्ज केल्यामुळे दि. 12.4.2006 रोजी त्यास माहिती देण्यात आलेली आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 27.2.2006 प्रमाणे प्रतिपेज रु. 2 प्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत कळविले होते. त्या अनुषंगाने दि. 25.3.2006 रोजी स्वतः प्रत्यक्ष माहिती तयार करुन घेतलेली आहे तसेच पुन्हा दिनांक 12.4.2006 अन्वये माहिती सादर करण्यात आलेली आहे. असे असले तरी दि. 20.4.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. माहिती पुरविलेली असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसत नाही. तरीसुध्दा अपीलकर्ता यानी द्वितीय अपील दि. 6.6.2006 रोजी दाखल केलेला आहे.

3. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादीनी अपीलकर्ता यास दोन वेळा माहिती पुरविलेली आहे व ती त्यास मिळालेली आहे. त्याबद्यलचा पुरावासुध्दा दाखल केलेला आहे. त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती मिळालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांस त्याच्या दि. 3.2.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती ही उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 13.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 306/2007.**

1) श्री अशोक किसनराव कोंडावार
रा. प्लॉट नं. 7 मिलींद सोसायटी,
नरेंद्र नगर नागपूर – 15 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार हिंगणा
2) जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 6/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. माहिती अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा गैरहजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 22.11.2006 रोजी माहिती अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा यांचेकडे माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. माहितीच्या अर्जामध्ये बक्षिसपत्राची रजिस्टर नोंद करता येईल काय, त्यास लागणारी स्टॅम्प फी किती लागेल, त्यास लागणारी नोंदणी फी किती लागेल बक्षिसपत्र नोंदणी कामासाठी इतर आवश्यक माहिती व कागदपत्रे याबाबतची माहिती मिळण्यात यावी व त्याकरीता मालमत्ता मौजा

संगम सा. क्र. 50 तालुका हिंगणा जिल्हा नागपूर भू. क्र. 142/2 मधील जागा शेती 0.61 हे. आर. आहे. त्यापैकी 0.26 आर. जागा अर्जदारास पत्नीचे नावे बक्षिसपत्राची नोंद करावयाचे आहे असा तपशिल दिलेला आहे. सदरच्या अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 3.1.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतर सदरचे अर्जाच्या संदर्भामध्ये तहसिलदार हिंगणा यांचे कार्यालयातील जा. क्र. नंबर नाही, दिनांक नाही, कार्यालयाचा शिक्का नाही अशाप्रकारच्या को–या कागदावरील पत्राच्या माध्यमातून तिन मुद्यावर माहिती दिलेली आहे व चवथ्या मुद्याबद्यल बक्षिसपत्र नोंदणी कामासाठी दुय्यम निबंधक अधिकारी हिंगणा यांचेकडे रजिष्ट्रची कामे असल्यामुळे त्यांचेकडे संपर्क साधल्यास माहिती उपलब्ध होईल असे कळविले व सदरचे पत्र हे दि. 20.1.2006 रोजी प्राप्त झाले असे अपीलकर्ता यांनी दाखल केले आहे. सदरच्या उत्तराने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील सादर केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 22.11.2006 रोजी माहिती अधिकारी म्हणून तहसिलदार हिंगणा यांचेकडे जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती असलेले कार्यालय दुय्यम निबंधकाचे आहे व त्यामुळे सदरचा अर्ज हा दुय्यम निबंधकाकडे हस्तांतरण करुन तसे अर्जदारास कळवावयास पाहिजे होते. परंतु तसे न करता अर्जदारास उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे व पुन्हा उर्वरीत माहिती करीता दुय्यम निबंधक हिंगणा यांचेकडे संपर्क साधावयास कळविले आहे. परंतु असे कळवितांना त्यावर तहसिल कार्यालयाचे अधिकृत सिल असावयास पाहिजे होते व जा. क्र. व दिनांक असावयास पाहिजे होते व त्यामुळेच अपीलकर्ता यांना पुरविलेल्या माहिती बद्यल खात्री वाटली नसल्यामुळे त्यांना द्वितीय अपीलात यावे लागले हा एकुणच तहसिल कार्यालयाचा भोंगळ कारभार व बेजबाबदारपणा दिसून येतो. दि. 22.11.2006 पर्यंत सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींची माहिती ही तहसिलदार

हिंगणा यांना किंवा तहसिल कार्यालयात अजूनही माहिती नाही यावरुन त्यांचा उदासीनपणा दिसून येतो. व याबाबत तहसिलदार हिंगणा व तहसिल कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी यांना समज देणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांनी जरी तहसिल कार्यालयामध्ये अर्ज केला होता तरी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना योग्य ते मार्गदर्शन करावयास पाहिजे होते. दिलेल्या उत्तराच्या बाबत सुध्दा तहसिलदार म्हणून सही आहे किंवा नाही असेही संशयास्पद आहे याबाबतची चौकशी जिल्हाधिकारी स्तरावरुन करणे आवश्यक आहे. आज सुध्दा सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात तहसिलदार हिंगणा किंवा नायब तहसिलदार हिंगणा हे परवानगीशिवाय गैरहजर आहेत. याबाबतची दखल सुध्दा जिल्हाधिकारी यांनी घेवून त्यांचेबाबत योग्य ती कारवाई करावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

4. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारात ज्या प्रश्नाच्या माध्यमातून माहिती मागितलेली आहे त्याबाबतची माहिती ही माहितीच्या अधिकारामध्ये अपेक्षित नाही. प्रश्न काढून अभिप्राय काढून मागणे हे अपेक्षित नाही माहितीच्या अधिकारामध्ये कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती ही पुरविणे अपेक्षित आहे. बक्षिसपत्र नोंदणीच्या संदर्भामध्ये नियमाची प्रत मागणे व त्यातून आवश्यक ती कार्यवाही करणे हे अपेक्षित आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी दुय्यम निबंधक हिंगणा यांचेकडे माहितीकरता अर्ज करुन त्यांना माहिती उपलब्ध होवू शकेल. माहिती अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा आज जरी उपस्थित असते तरी सुध्दा नोंदणीच्या संदर्भामध्ये माहिती हे तहसिलदार उपलब्ध करुन देवू शकत नाहीत. परंतु कोणत्याही प्रकारचा माहितीचा अर्ज हाताळणे हे अधिनियमाच्या नियमाप्रमाणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे तहसिलदार हिंगणा व त्यांचे कार्यालय याबाबत वर म्हटल्याप्रमाणे जिल्हाधिकारी यांनी कारवाई करणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांनी त्यांना सदरची माहिती हवी असल्यास दुय्यम निबंधक हिंगणा यांचेकडे पुन्हा माहितीच्या अधिकाराचा अर्ज करावा म्हणून त्यांन ती माहिती उपलब्ध होवू शकेल.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) सदरच्या निर्णयाची प्रत जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे तहसिलदार हिंगणा व कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्या करीता पोष्टाने पाठविण्यात यावी. अपीलकर्ता यांनी सदरची माहिती मिळण्या करीता दुय्यम निबंधक हिंगणा यांचेकडे माहितीच्या अधिकारामध्ये नविन अर्ज करावा.

3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 14.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 111 / 2007.**

1) श्री रामदास तेजरामजी भोयर

मु. पो. कोहळी ता. कळमेश्वर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

कृष्णराव वानखेडे विद्यालय कोहळी

ता. कळमेश्वर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 3 / 1 / 2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 30.10.2006 रोजी माहितीच्या अधिकारीचा रु. 5 चा स्टॅम्प लावून माहिती अधिकारी यांचेकडे दिला होता. दि. 8.11.2006 रोजी स्मरणपत्र दिले होते. दि. 11.11.2006 रोजी सचिव संस्था यांचेकडे प्रथम अपील सादर केले होते. पुन्हा दिनांक 22.11.2006 रोजी 28.11.2006 रोजी माहितीच्या संदर्भात अर्ज दाखल केता होता. परंतु सदरच्या अर्जाच्या व प्रथम अपीलाच्या संदर्भात निरनिराळया त्रुटी असल्यामुळे सदरच्या अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही माहिती अधिकारी यांना न

करता वेळोवेळी सदरच्या त्रुटया हया अपीलकर्ता यांचे निदर्शनास आल्या होत्या. व त्यामुळे दि. 13.12.2006 रोजी पुन्हा माहिती मिळण्याचा अर्ज अपीलकर्ता यांनी सादर केला होता. तत्पूर्वी माहिती मिळण्यासाठी रु. 50 हे शुल्क त्यांनी भरले होते परंतु पुन्हा अर्ज विहीत नमुन्यात नसल्यामुळे त्याना माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे दिसते. व त्यामुळे सदरचे अपील त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे सदर केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी ज्या पध्दतीने अर्ज सादर केलेले आहेत त्यामुळे त्याना मुळात माहिती मिळणेसाठी विलंब झालेला आहे. दि. 13.12.2006 च्या अर्जामध्ये त्यांनी माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमुद केले असल्यामुळे त्यांना त्याबद्यलचे उत्तर उपलब्ध करुन देता आले नाही असे उत्तरवादी यांचे वकीलाने सांगितले. त्याचप्रमाणे उत्तरवादी यांनी अपीलकर्ता यांनी विचारलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये ज्या व्यक्तीची माहिती विचारलेली होती त्याच्या संदर्भामध्ये त्यानी दि. 18.11.2006 रोजी जा. क्र. 912 अे व जा. क्रच 912 बी प्रमाणे माहिती द्यावी किंवा नाही हे विचारलेले दिसून येते व त्यावर त्याच्याबद्यलची माहिती देण्यात यावू नये असे दि. 21.12.2006 रोजीच्या पत्राच्या प्रती सुध्दा दाखल केलेल्या आहेत परंतु ही बाब अपीलकर्ता यांना कळविले नाही. परंतु दि. 22.12.2006 जा. क्र. 914 प्रमाणे अपीलकर्ता याना कळविण्यासाठी पत्र तयार करुन ठेवले होते परंतु व्यक्तीशः अपीलकर्ता घेण्यास आले नाही म्हणून त्याना पत्र निर्गमीत केलेले नाही व ते द्वितीय अपीलाच्या संदर्भात पुरावा म्हणून दाखल केलेले दिसून येते. याबाबतच्या गुणवत्तेत न जाता अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत त्याना माहिती मिळाली नाही व त्यांचेकडून शुल्क भरुन घेतले होते त्याविरुध्द त्यांना संस्थेचे सचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील सादर करावयास पाहिजे होते तसे ते न करता त्यानी सदरचे द्वितीय अपील सादर केले आहे. कारण शिक्षण संस्थेच्या बाबत मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी असून संस्थेचे सचिव हे प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. व संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचारी बद्यलचे अधिकार हे संस्थेचे आहेत.

त्यामुळे कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देणे हे संस्थेचे सचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाच्या संदर्भात व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) च्या संदर्भात आवश्यक ठरते. द्वितीय अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णयाविरुध्दच करावयाचे असते त्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचे पालन करुन संस्थेचे सचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील सादर करणे संयुक्तिक राहिल.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे फेटाळण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांना विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही व रु. 50 हे शुल्क त्यांचेकडून भरुन घेतले असल्यामुळे संस्थेचे सचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथत अपील दाखल करावे व प्रथम अपीलाच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यास द्वितीय अपील आयोगाकडे दाखल करावे.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 14.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 258 / 2007.**

1) श्री विजय राजाभाऊ चिंचोळकर
17 विद्याविहार, प्रतापनगर नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री म. वि. पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्यअभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती.

2) श्री च. आ. देशमुख
जन माहिती अधिकारी तथा
सहा. मुख्यअभियंता (2), जलसंपदा विभाग,
अमरावती. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 21 / 1 / 2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दि. 11.9.2006 रोजी माहिती अधिकारी म्हणून मुख्य अभियंता यांचे कार्यालयातील सहा. मुख्य अभियंता यांना माहिती मिळणेसाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जामध्ये तत्कालीन अधिक्षक अभियंता यवतमाळ पाटबंधारे मंडळ यवतमाळ

यांचे 2000–02 हया काळात शासन व्यवहार स्वमर्जीने नियमबाहयतेने चालविण्याबद्यल माहिती देण्याबाबत सु प्र मा चे नियमांचे प्रकाशात खालील माहिती पुरविण्यात यावी.

अ) मंजूरी नसतांना, बांधकामाची निविदा काढणे, बांधकाम सुरु करणे ही कृती शिस्तभंग व नियमबाहयतेची असल्याची कल्पना असूनही, अंदाजपत्रकास सु. प्र. मा. न देता निर्देशीत केलेली, य.पा.मं.ची कार्यवाही योग्य होती काय.

ब) महा. सार्व. बांध. पुस्तिका 1978 चे नियम 313, 314, 315 चे संदर्भात, अधि. अभियंता हयांनी सुचविलेली किंवा कार्य. अभियंता यांनी प्रस्तावित केलेली हयापैकी कोणती कार्यवाही नियमानुसार होती.

क) अधि. अभियंता हयांची कार्यवाही योग्य असल्याचा निर्णय झाल्यास, त्याचा आधार दर्शविणारे नियमांची कागदपत्रे पुरविण्यात यावीत.

ड) अधि. अभियंता हयांची कार्यवाही अनुचित ठरल्याचे प्रसंगी, बांधकामाच्या सामान्य नियमांचे पालनात झालेल्या चुकीबाबत होवू शकणा–या कार्यवाहीचे स्वरुप कळवावे.

ई) नियमबाहय पध्दतीने, स्वमर्जीने, पदाचा दुरुपयोग करीत शासन व्यवहार करणा–या अधिका–यानी केलेल्या अधिका–यानी केलेल्या इतर शासन व्यवहाराची वैधता, कोणत्या आधारावर ठरविली जाते व त्यामुळे मंडळ कार्यालया अंतर्गत अधिका–याचे, अधि. अभियंत्यानी केलेल्या मुल्यमापन तपासणीचे आधार कोणते व त्याबाबत असलेल्या शासन नियमांची माहिती.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.10.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये शुल्क भरण्याकरीता अपीलकर्ता यास पत्राने कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे दि. 6.11.2006 रोजी रु. 12 शुल्क भरले व उर्वरीत माहिती ही शिपायाबरोबर पाठवावे असे कळविले होते. त्याप्रमाणे दि. 23.11.2006 रोजी अपीलकर्ता यांस माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे परंतु सदरचे पत्र हे दि. 8.12.2006 ला पोष्टाने

पाठविण्यात आले आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून दि. 12.12.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 12.1.2007 रोजी देण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यानी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

3. अपीलकर्ता हे स्वतः कार्यकारी अभियंता राहिलेले आहेत. उत्तरवादी यांनी खुलासा केल्याप्रमाणे अपीलकर्ता यानी अर्जात नमुद केलेली माहिती अधिक्षक अभियंता यवतमाळ पाटबंधारे मंडळ यवतमाळ या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्याना माहिती सादर करण्याकरीता पत्राने कळविले होते. त्यानंतर दि. 10.10.2006 रोजीच स्मरणपत्र सुध्दा देण्यात आलेले होते व त्याप्रमाणे अधिक्षक अभियंता यवतमाळ पाटबंधारे मंडळ यवतमाळ यांनी त्यांच्या पत्र क्र. 4600 दि. 12.10.2006 अन्वये आवश्यक माहिती प्रादेशिक कार्यालयास सादर केली. सदरची माहिती ही आवश्यक शुल्क रु. 12 व त्याकरीता लागणारा टपाल खर्च रु. 30 ची चालान भरण्याचे निर्देश दि. 26.10.2006 रोजी अपीलकर्ता यांना देण्यात आले होते. सदरचे माहिती करीता आवश्यक शुल्क रु. 12 ची चालान कार्यालयास पाठवून टपालाकरीता लागणारी रक्कम भरण्याचे नाकारुन सदर दस्तऐवज नागपूर येथे शिपाया मार्फत पाठविण्याबाबत त्यांचे पत्र दि. 6.11.2006 अन्वये प्रादेशिक कार्यालयास विनंती केली त्यांचे विनंतीनुसार शासकीय कामाकरीता नागपूर येथे जाणा–या शिपायासोबत माहिती पाठविण्यात आली परंतु श्री चिंचोळकर हे विदर्भ पाटबंधारे महामंडळ नागपूर कार्यालयात उपलब्ध नसल्याने सदर माहिती या कार्यालयात परत आली व त्यामुळे त्यांना आवश्यक असलेली माहिती या कार्यालयाचे पत्र क्र. दक्षता/यपाम/माअ/2006/3642 दि. 23.11.2006 अन्वये टपालाने पंजीबध्द डाकेने पाठविण्यात आली. अपीलकर्ता त्याना उपलब्ध करुन दिलेल्या माहिती सोबत

त्यानी विचारलेल्या प्रश्नाच्या स्वरुपात अभिप्राय न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी मुख्य अभियंता यांचेकडे अपीलीय अर्ज केला होता. त्याबाबत निर्णय देतांना उपलब्ध माहिती देण्याबाबतच माहितीच्या अधिकारात तरतुद असल्याने व भूतकाळातील घडलेल्या घटनांची माहिती व अभिप्राय देण्याचे कोठेही निर्देश नसल्याने त्याना तसे या कार्यालयाचे पत्र दि. 12.1.2007 अन्वये कळविण्यात आले. त्यामुळे या कार्यालयाने

केलेली कारवाई नियमानुसार असून अर्जदाराने अर्जात नमुद केल्याप्रमाणे माहितीच्या अधिकाराचे कोणतेही उल्लंघन झाले नाही अशा प्रकारचा खुलासा करण्यात आलेला आहे. उत्तरवादी यांचे खुलाशामध्ये सदरची माहिती ही यवतमाळ पाटबंधारे मंडळ यवतमाळ या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्या कार्यालयातून मागितली असे नमुद केलेले असल्यामुळे उत्तरवादी याना असे विचारले की यवतमाळ पाटबंधारे मंडळ या कार्यालयामध्ये माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे नियुक्त झाले आहेत किंवा नाही. त्यानुसार त्याना यावतमाळ पाटबंधारे मंडळ या कार्यालयात सहा. अधिक्षक अभियंता हे माहिती अधिकारी असून अधिक्षक अभियंता हे प्रथम अपिलीय अधिकारी आहेत असे सांगितले. अपीलकर्ता हे स्वतः कार्यकारी अभियंता राहिल्यामुळे त्यांना माहिती कोणत्या कार्यालयात उपलब्ध असेल याची माहिती असल्यामुळे त्याना विचारले की त्यांनी माहिती ज्या कार्यालयात उपलब्ध आहे त्या कार्यालयात माहिती कां मागितली नाही. त्यावर त्यांनी असे सांगितले की त्यांच्या संदर्भामध्ये ज्या दोन अधिका–याचे मतभेद झालेले आहेत त्याच्या पेक्षा वरिष्ठ अधिका–याचे मत किंवा अभिप्राय मिळावे म्हणून मुख्य अभियंता यांचे कार्यालयात त्यांनी माहिती मागितली. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त करण्याची तरतुद आहे. व त्या तरतुदीप्रमाणे जर माहिती अधिकारी नियुक्त झालेले असतील तर त्याच सार्वजनिक

प्राधिकरणाच्या कार्यालयामध्ये माहितीचा अर्ज माहिती मिळण्यासाठी अर्ज करणे अपेक्षीत आहे. अन्यथा प्रत्येक अर्जदार आपापल्या सोयीनुसार व समजुतीनुसार कोणत्याही कार्यालयात अर्ज सादर करीत राहिल्यास सदरच्या तरतुदींच्या बाबत किंवा नियुक्तीच्या बाबतीत मुदतीस कोणताही अर्थ राहणार नाही व पुन्हा माहिती उपलब्ध होण्यास विलंब हा होतच राहणार. कोणत्याही अधिनियमाची सोयीनुसार एक तरतुदीचे पालन करावयाचे व दुस–या तरदुतीचे पालन करावयाचे नाही हे कायदेशीर नाही. कोणत्याही अधिनियमाची अंमलबजावणी करतांना त्या अधिनियमाच्या तरतुदीचे पालन झाल्यास गोंधळसदृष्य परिस्थिती निर्माण होत नाही. व नियमाप्रमाणे त्या तरतुदीबद्यल त्यातील तरतुदींचे काटेकोर अंमलबजावणी करणे सोयीचे होते. अपीलकर्ता यांनी त्यांना सोयीचे वाटले म्हणून माहिती ज्या कार्यालयात उपलब्ध आहे त्या कार्यालयात माहिती न मागता मुख्य अभियंता यांचे कार्यालयात मागितली व पुन्हा विलंब झाला म्हणून कायद्याच्या तरतुदींकडे बोट दाखवितात हे विसंगत आहे. त्यातही अपीलकर्ता याना त्यांच्या माहितीच्या अर्जाच्या माध्यमातून अभिप्राय द्यावे लागतील अशा प्रकारचे प्रश्न विचारले आहे जे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षीत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) प्रमाणे ''माहिती'' व (त्र) ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके, आदेश, नोंदवहया, संविधान, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल) कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधार सामुग्री इत्यादींचा समावेश होतो. तसेच (त्र) ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेले किंवा त्याच्या अंतर्गत असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे व त्यात काही (एक) एखादे काम, दस्तऐवज,

अभिलेखे याची पाहाणी करणे (दोन) दस्तऐवज किंवा अभिलेखाच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रति घेणे (तिन) सामुग्रीचे प्रमाणित नमुने घेणे (चार) डिस्ट्रेस, फ्लॉपी, टेप, व्हिडीयो कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही ईलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबत मुद्रित प्रती मार्फत माहिती मिळविली याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो.

यावरुन माहितीच्या अधिका–याच्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात कोणत्याही प्रकारचे अभिप्राय घेणे हे अपेक्षीत नाही. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की अधिनियमाच्या कलम 4 मधील पोटकलम 17 मधीत (घ) प्रमाणे आपल्या प्रशासनिक किंवा न्यायीक निर्णयाबाबतची कारणे बाधीत व्यक्तीना कळविणे अशी तरतुद असल्याने त्यानी वरिष्ठ अधिका–याच्या त्यांच्या बाबतीत झालेल्या निर्णयाबाबत अभिप्राय किंवा मताची अपेक्षा केली होती. (घ) मधील तरतुदीचा अर्थ असा आहे की बाधीत व्यक्तीच्या संदर्भामध्ये जो काही प्रशासनिक किंवा न्यायीकात निर्णय झालेला आहे त्या निर्णया बद्यलची कारणे कळविणे अपेक्षीत आहे. परंतु तो निर्णय बरोबर किंवा चुक याबाबतचा अभिप्राय मात्र अपेक्षीत नाही. तोच नेमका अपीलकर्ता यांना अपेक्षीत आहे व म्हणून त्यांनी माहिती दिली नाही असे द्वितीय अपीलात म्हटलेले आहे. परंतु वरीत विवेचना वरुन कोणत्याही प्रकारचे अभिप्राय हे माहितीच्या अधिकारामध्ये अपेक्षीत नाही हे पुन्हा एकवार स्पष्ट करणे जरुरीचे आहे कारण माहिती अधिकारी हा फक्त त्या सार्वजनिक प्राधिकरणातील अभिलेख्याचा किंवा माहितीचा हा परिरक्षक आहे व त्यामुळे माहिती अधिका–याकडून कोणत्याही प्रकारच्या अभिप्रायाची अपेक्षा ठेवता येत नसल्यामुळे तशी तरतुद पण अधिनियमामध्ये करण्यात आली नाही. अर्जदाराने अर्ज केलेल्या तारखेस ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल त्याच स्वरुपात ती माहिती उपलब्ध करुन देणे हे माहिती अधिका–याकडून अपेक्षीत आहे. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली नाही हा

मुद्या निकालात निघतो. दुसरा मुद्या विलंबाचा जी माहिती उपलब्ध करुन दिली ती विलंबाने करुन दिली असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे त्याबाबतीत वर केलेल्या विवेचनात हे निष्पन्न झालेले आहे की ज्या सार्वजनिक प्राधिकरणात माहिती उपलब्ध नाही त्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अपीलकर्ता यांनी माहिती मागितली. माहिती कोणत्या सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध आहे ही त्याना कल्पना असूनसुध्दा व त्यामुळे उत्तरवादी यांनी माहिती उपलब्ध असलेल्या माहिती अधिका–याकडे माहिती मागितली व त्यामुळे हा विलंब झालेला आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांच्या प्रकरणात दोन अधिका–यांचे वेगवेगळे मत होते म्हणून त्यांनी त्यापेक्षा वरिष्ठ अधिका–याकडे अभिप्रायासाठी माहितीचा अर्ज दाखल केला होता. माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता त्यानी वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला आहे व तो पत्रव्यवहार दाखल करण्यात आलेला आहे त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास मुद्याम टाळाटाळ करण्यात आलेली आहे किंवा विलंब करण्यात आलेला आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. पुन्हा अपीलकर्ता याना त्याच्या दि. 11.9.2006 च्या अर्जामध्ये टपालाद्वारे माहिती घेणार असे नमुद केले असून सुध्दा दिनांक 6.11.2006 च्या पत्राप्रमाणे शिपाया मार्फत व्यक्तीशः माहिती पाठवावी असे कळविले व तीपण ते उपस्थित नसल्यामुळे त्याना पुरवता आली नाही म्हणून उत्तरवादी यांनी ती दि. 8.12.2006 रोजी टपालाद्वारे अपीलकर्ता यांना पाठविली आहे. त्यामुळे उत्तरवादी यांचा विलंबाचा मुद्यासुध्दा निकाली निघतो.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जामध्ये अभिप्राय मागितलेले असल्यामुळे व सदरचे अभिप्राय हे माहितीच्या अधिकारात अपेक्षीत नसल्यामुळे त्याना माहिती उपलब्ध करुन दिली नाही हे त्यांचे म्हणणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील हे निकाली

काढण्यात येत आहे. तसेच विलंबाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनीच माहिती उपलब्ध असलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयात माहिती मागण्याचा अर्ज केलेला नसल्यामुळे व उत्तरवादी यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्यामुळे माहिती मागवून पुरविण्यास विलंब झालेला असल्यामुळे तोही मुद्या ग्राहय नसून त्या करणावरुन सुध्दा सदरचे अपील हे फेटाळण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 16.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 260/2007 व 351/2007.**

1) श्री विजय राजाभाऊ चिंचोळकर
17 विद्याविहार, प्रतापनगर नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्रीमती ज्योती पोद्यार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव, जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई 32.

2) श्रीमती स्मिती रानडे
जन माहिती अधिकारी तथा
अवरसचिव, जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई 32. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 28/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 20/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

3. अपिलकर्ता यांनी दि. 11.2.2006 रोजी त्यांच्या 1995–96, 1997–98 व 2000–01 सालच्या गोननिय अहवालाचे संस्करण त्यावरील अभिवेदनाच्या छाननी कार्यवाहीत या दोहोत शासन स्तरावरील कार्यवाहीच्या कागदपत्राच्या प्रती पुरविण्याबाबत.

अ) 1995–96 च्या गोपनिय अहवालाचे संस्करण व दि. 11.12.01 चे अभिवेदनाची छाननी

ब) 1997–98 च्या गोपनिय अहवालाचे संस्करण व दि. 11.12.01 तसेच दि. 18.2.2006 चे अभिवेदनाची छाननी

क) 2000–01 च्या गोपनिय अहवालाचे संस्करण व दि. 15.5.02 च्या अभिवेदनाची छाननी

अ) 1995–96 च्या गोपनिय अहवालाचे संस्करण व दि. 11.12.01 चे अभिवेदनाची छाननी

ब) 1997–98 च्या गोपनिय अहवालाचे संस्करण व दि. 11.12.01, 4.8.2005 तसेच दि. 18.2.2006 चे अभिवेदनाची छाननी

क) 2000–01 च्या गोपनिय अहवालाचे संस्करण व दि. 15.5.02 च्या अभिवेदनाची छाननी. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेतील असे नमुद केले आहे.

सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 9.10.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे. सन 1995–96 व 1996–97 च्या गोपनिय अहवालातील प्रतिकुल शे–या विरुध्द दाखल केलेल्या अभिवेदनाच्या संदर्भात सर्व कागदपत्रे दि. 26.9.2006 रोजी पुरविण्यात आली आहे. तसेच सन 1997–98 व 2000–01 या वर्षाच्या गोपनिय अहवाल संस्करण व अभिवादनाच्या छाननीच्या कागदपत्राच्या संदर्भात त्या घटनेतील टिपणी व पत्रव्यवहार (प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिका–यांचे अभिप्राय) इत्यादी सर्व कागदपत्रे आपल्या विनंतीनुसार सोबत पाठविण्यात येत आहे. सहपत्रामध्ये 1997–98 अभिवेदनाच्या छाननीच्या धारीकेतील टिपणी श्री भिंगारे यांच्या 12.3.2003 च्या पत्राची प्रत सन 2000–01 अभिवेदनाच्या छाननीच्या धारीकेतील टिपणी श्री गेडाम यांच्या 12.3.2003 च्या पत्राची व श्री जवळेकर यांच्या दि. 23.12.2002 च्या पत्राची सहपत्रासह प्रत पाठविण्यात

आली आहे असे कळविण्यात आले आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 14.12.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 2.2.2007 रोजी देण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल करण्यात आले आहे.

4. अपील क्र. 351/2007 मध्ये सुध्दा 11.9.2006 चाच माहितीच्या अधिकाराच्या अर्जाच्या प्रमाणे दाखल केलेली आहे. त्याचप्रमाणे दि. 14.12.2006 रोजी दाखल केलेल्या प्रथम अपीलाची प्रत दाखल केलेली आहे.

5. दि. 14.12.2006 च्या प्रथम अपीलाच्या निर्णयापूर्वीच अपील क्र. 260/2007 मध्ये द्वितीय अपील दि. 28.1.2007 रोजी दाखल करण्यात आले. व त्याच दि. 14.12.2006 च्या प्रथम अपीलाच्या दि. 2.2.2007 च्या निर्णया विरुध्द दि. 20.2.2007 रोजी पुन्हा जे द्वितीय अपील दाखल करण्यात आले आहे ते अपील क्र. 351. थोडक्यात एकाच माहितीच्या अर्जाच्या विरुध्द दोन द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे दाखल करण्यात आलेली आहेत. हा आयोगाससुध्दा वेठीस धरण्याचा प्रकार असून माहिती अधिकार अधिनियमातील अर्जदारास कोणत्याही प्रकारे बंधन नसल्याचा परिणाम आहे. अपीलकर्ता यांनी अपील क्र. 351 मध्ये प्रथम अपीलाच्या दि. 2.2.2007 च्या निर्णयामध्ये संदर्भामध्ये आक्षेप घेवून सा.प्र.वि. शा. नि. दि. 1.2.1996 च्या नियम 38 प्रमाणे शासकीय कर्मचा–याच्या गोपनिय अहवालाची जपणूक सेवानिवृत्ती झालेल्या नंतर 5 वर्षापर्यंत करणे आवश्यक आहे असे नियम केले आहे. तसेच मॅट येथे केस सुरु असतांना 1996–97 चे गोपनिय अहवाल संस्करण कोर्ट कार्यवाही सुरु असतांना त्या प्रकरणाची धारीका कशी नष्ट होते अशा शक्यतेबाबतचे आक्षेप घेवून खोटी व बनावट माहिती दिली असे म्हटले आहे. अपील क्र. 260 मधील द्वितीय अपील हे प्रथम अपीलाच्या निर्णयास विलंब झाला म्हणून दाखल करण्यात आले आहे.

6. थोडक्यात अपीलकर्ता यांना सन 1995–96, 1996–97, 1997–98 व 2000–01 या कालावधीतील त्यांच्या गोपनिय अहवालाच्या प्रती त्या वरील संस्करणाच्या प्रती अभिवेदनाच्या प्रती व झालेली कारवाई ही माहिती अपेक्षीत आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक 29.7.2006 रोजी तसेच 28.7.2006 रोजी तीच माहिती मागण्याकरीता माहितीच्या अधिकारात वेळोवेळी अर्ज केलेले होते. त्यावेळेस त्यांना दि. 1.9.2006 रोजी उत्तर देण्यात आले होते. त्यावर प्रथम अपील दि. 11.9.2006 व 21.9.2006 रोजी दाखल केले होते व त्याचा निर्णय दि. 26.9.2006 रोजी देण्यात आलेला होता. पुन्हा त्याच संदर्भामध्ये त्यांनी माहिती दि. 11.9.2006 रोजी मागितलेली होती. व त्याविरुध्दची दोनही अपीले आहेत. अपीलकर्त्याच्या प्रत्येक अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती दिल्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान होत नाही याबद्यल माहिती अधिकारी यांना विचारले असता गोपनिय अहवालाच्या संदर्भामध्ये त्यांनी स्पष्टीकरणात असे सांगितले की गोपनिय अहवालाच्या संदर्भात तिन भाग असतात 1) मुळ गोपनिय अहवाल 2) त्यावरील संस्करणामध्ये त्या प्रतिकुल शे–याच्या बद्यल कळविण्याचा पत्रव्यवहार असतो. 3) प्रतिकुल शे–याच्या विरुध्द जे अभिवेदन दाखल केले जाते तो पत्रव्यवहार हा अभिवेदनामध्ये गोपनिय अहवाल हे जपून ठेवले जातात व संस्करणातील पत्रव्यवहार पाच वर्षानंतर नष्ट केला जातो व निर्णय झाल्यानंतर अभिवेदनातील पत्रव्यवहार सुध्दा हा 5 वर्षानंतर नष्ट केला जातो. कारण संस्करण व अभिवेदन अभिलेखे नष्ट करण्याच्या ‘‘क’’ वर्गात येतात व प्रत्येक वेळेस अपीलकर्ता याना त्या त्याप्रमाणे उत्तर देण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये फक्त शक्यता वर्तविली आहे परंतु उत्तरवादी यांनी दि. 29.7.2006 पासून तर दि. 2.2.2007 पर्यंत या सर्व अर्जाच्या आणि अपीलाच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यावरुन त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती

लपवून ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे असे वाटत नाही. मुळातच अपीलकर्त्यानी माहिती जी मागितलेली आहे ती माहिती ही फार गुंतागुंतीची आहे असे नाही व अपीलकर्ता यांनी जी माहिती त्यांच्या गोपनिय अहवालाबद्यल माहिती मागितली आहे ती जुनी असून माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचा दुरान्वयेसुध्दा संबंध येत नाही तसेच गोपनिय अहवाल हे अपीलकर्त्याच्या वरिष्ठानी लिहिले आहे त्यामुळे माहिती अधिकारी यांनी खोटीच माहिती लपून ठेवणे असे म्हणणे योग्य होणार नाही. परंतु तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी वेळोवेळी वेगवेगळे अर्ज त्या माहिती करीता केलेले आहेत. व त्या अर्जाप्रमाणे माहिती पुरविण्याचा प्रयत्न दिसतो. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की दि. 14.12.2006 च्या अपीलाचा निर्णय हा दि. 2.2.2007 रोजी म्हणजे 30 दिवसाच्या पेक्षा जास्त विलंबानी देण्यात आलेला आहे व त्यावर त्यांनी वारंवार भर दिलेला आहे. यावर सुध्दा अपीलकर्ता हे आयोगाचा निर्णय देत असतांना मधूनमधून त्यांचे म्हणणे वारंवार सांगत असतात. त्यांचा उद्येश काय आहे हे सांगता येणार नाही. त्याचा उद्येश विचारल्यावर त्यांचा काहीही उद्येश नाही असे ते सांगतात. वरील सर्व विवेचनावरुन असे दिसून येते की माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या सर्व अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे टाळाटाळ केलेली आहे असा निष्कष्र काढता येत नाही. किंवा माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिलेली नाही. अपीलीय अधिका—यानी विलंबाने निर्णय दिला असला तरी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मध्ये त्या उल्लंघनाच्या संदर्भात कोणत्याही तरतुदी नाहीत. सबब अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे दोनही अपीले ही त्यांना दि. 28.7.2006 पासून ते 2.2.2007 पर्यंत त्याच त्याच मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे दोनही अपीले ही खारीज करण्यात येत आहेत.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 16.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 89/2007.**

1) श्री विलास वामनराव लोहोटे
बी–3/112, बजरंग कॉम्प्लेक्स,
सिरसपेठ, नागपूर–9. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2) जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1/5/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 15/15/2006 रोजी माहिती अधिकार यांचेकडे गुन्हा क. 3176/01 मधील श्री संदिप गुप्ता यांनी मा. लोक आयुक्तांना केलेली तकारीची सत्यप्रत तसेच दि. 22.1.2003 रोजी किमिनल रिट पिटीशन नं. 6/2003 मध्ये पान नं. 2 वरील पत्र क. ईएलअे/8/एनजीपी/2001–697 दि. 27.7.2001 ची सत्यप्रत मागितलेली होती व माहिती स्वतः घेवून जाणार असे नमूद केलेले होते. सदरच्या

अर्जाच्या अनुषंगाने दि. 5.1.2006 रोजी माहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त यांनी ''माहितीच्या'' अर्जाच्या अनुषंगाने विषयांकित प्रकरणी आपणास कळविण्यात येते की गु. अ.क्र. 3176/01/(एसीबी भंडारा) मध्ये आपण आरोपी असून सदर प्रकरणा बाबतची कागदपत्रे दोषारोप दाखल करण्यास मंजुरी मिळण्याकरीता सक्षम प्राधिकाराकडे प्रलंबित आहे. दोषारोपपत्र दाखल करण्यास मंजुरी प्राप्त झाल्यास दोषापपत्र न्यायालयात दाखल करतेवेळी आरोपीस त्याच्याशी संबंधित प्रकरणातील कागदपत्राच्या प्रतींचा संपूर्ण संच देण्यात येतो. सद्यस्थितीत सदर प्रकरण सक्षम प्राधिकारीकडे मंजुरीकरीता प्रलंबीत असल्यामुळे सदर प्रकरणातील कोणतीही कागदपत्रे उपलब्ध करुन देणे गोपनियतेच्या दृष्टीने योग्य होणार नाही. तसेच दोषारोपपत्र दाखल करण्यास मंजुरी मिळण्यापूर्वीच अशी कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्यास त्याचा शासनाचा खटला दाखल करण्याच्या बाजुवर विपरीत परिणाम व्हायची दाट शक्यता असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मध्ये कलम 8 (एच) नुसार विषयांकित कागदपत्राच्या सत्यप्रती मिळण्याबाबतची आपली मागणी फेटाळण्यात येत आहे असा निर्णय देवून कळविण्यात आले होते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 7.1.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर नव्हते परंतु दि. 13.1.2006 रोजी प्रथम अपीलामध्ये माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला आहे. सदर निर्णयाने व्यथित होवून पुन्हा अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. माहिती अधिकारी यांनी दि. 5.1.2006 रोजी जो निर्णय दिलेला आहे तो अतिशय स्वयंस्पष्ट आहे. कोणत्याही फौजदारी प्रक्रियेतील चौकशीच्या संदर्भामध्ये कोणतीही बाब ही प्रकट करणे हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (एच) मध्ये अपवाद म्हणून दिलेले आहे. अपीलकर्ता यांच्या विरुध्द ॲन्टी करप्शनचा जो गुन्हा क्र.

3176/1 हा ज्या तक्रारीमुळे दाखल झालेला होता ती तक्रार श्रीयुत संदिप गुप्ता यांनी मा. लोक आयुक्त यांचेकडे केली होती असे दिसून येते व त्या तक्रारीवरुनच अपीलकर्ता यांची चौकशी सुरु होवून गुन्हा दाखल करण्यात आलेला दिसतो. अशा परिस्थितीमध्ये त्या तक्रारीच्या संदर्भात गुन्हा दाखल झालेला आहे परंतु तक्रारीमध्ये जी काही कारणे दिलेली असतील त्यावरुनच तपासाची चक्र सुरु होते व त्यामुळे मुळ तक्रार ही पुढील चौकशीचाच भाग होता. मुळ तक्रारीमध्ये जी माहिती दिलेली असते ती माहिती जर प्रकट केली तर तपासाची दिशा आरोपीकडून बदलण्याची शक्यता निर्माण होवू शकते तसेच फौजदारी याचीका क्र. 6/2003 मध्ये पान क्र. 2 वरील पत्र क्र. ईएएलअे/8/नाग/2001–697 दि. 27.7.2001 हे पत्रसुध्दा सदरच्या गुन्हयाच्या चौकशीच्या संदर्भात शासनाचे निर्देश असल्यामुळे गुन्हयाच्या चौकशीचा जो भाग होता व त्यामुळे वर विवेचन केलेल्या करणास्तव सदरचे पत्र सुध्दा प्रकट करणे हे चौकशीमध्ये अडथळा आणण्याची शक्यता निर्माण करते व त्यामुळे माहिती अधिकारी यांनी सदरच्या दोनही बाबींमधील पत्रे ही चौकशीचा भाग आहे व त्यामुळे गोपनिय आहे व अधिनियमाच्या कलम 8 (एच) प्रमाणे प्रकट करणे योग्य होणार नाही हा दिलेला निर्णय हा योग्य होता. तसेच दि. 13.1.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तोपर्यंत चौकशी पूर्ण झालेली नसल्यामुळे व मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झालेले असल्यामुळे सदरची कागदपत्रे प्रकट करता येणार नाही हा माहिती अधिका–याचा कायम केलेला निर्णय योग्य होता.

4. अपीलकर्ता यांचे वकील यांनी असे सांगितले की फौजदारी प्रक्रियेप्रमाणे चौकशीचा जो भाग आहे तो माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे त्यासंदर्भात विचार करणे हे संबंधित नाही. माहितीच्या अधिकारामध्ये माहिती ही विहीत मुदतीत दिली किंवा नाही व ती माहिती अधिकाराच्या नियमाच्या तरतुदीप्रमाणे दिली किंवा नाही

एवढेच तपासणे आवश्यक असते. व त्यामुळे अपीलकर्ता यास त्यांनी मागितलेली जी माहिती आहे ती विहीत मुदतीत दिलेली असून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (एच) प्रमाणे माहिती प्रकट करण्यास अपवाद म्हणून जी कारणे दिलेली आहे त्या कारणाच्या संदर्भात योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे त्यासंदर्भात खारीज करण्यास पात्र आहे.

5. परंतु आज दि. 17.8.2007 रोजी अपीलकर्ता यांचे विरुध्द असलेल्या गुन्हयाचा तपास हा पूर्ण झालेला असून मा. न्यायालयामध्ये दोषारोपपत्र सुध्दा दाखल झालेले आहे. दोषारोपपत्र दाखल करतांना ज्या ज्या कागदपत्रावर अवलंबून दोषारोपपत्र दाखल केलेले असते ही सर्व कागदपत्रे आरोपीला उपलब्ध करुन देण्यात येते व त्यामुळे आरोपींनी माहितीच्या अर्जावर मागितलेली कागदपत्रे ही त्यांना दोषारोपपत्रात मिळालेली असावयास पाहिजे. परंतू तरीसुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये त्यांना सदरच्या कागदपत्राच्या छायांकित प्रती ही उपलब्ध करुन द्यावयास कोणताही प्रत्यावद नाही. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना साक्षांकित प्रत हवी आहे त्यावर मुळ प्रती हया दोषारोपपत्रा बरोबर न्यायालयात दाखल असल्यामुळे त्यातील छायांकित सांक्षांकित करुन देता येणार नाही मात्र त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या छायांकित प्रतीची छायांकित प्रत उपलब्ध करुन देता येईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो निर्णय योग्य असल्यामुळे त्या संदर्भात फेटाळण्यात येत आहे.

2) परंतु आज दि. 17.8.2007 रोजी संपूर्ण गुन्हयाची चौकशी ही संपून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले असल्याने अपीलकर्त्यास माहिती अधिकारी यांचेकडे असलेल्या कागदपत्राच्या छांयांकित प्रती उपलब्ध करुन द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 17.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 90/2007.**

1) श्री विलास वामनराव लोहोटे
बी–3/112, बजरंग कॉम्प्लेक्स,
सिरसपेठ, नागपूर–9. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2) जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर. ..... **उत्तरवादी**

वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 1/5/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 24/11/2005 रोजी माहितीचा अर्ज दाखल केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाची प्रत ही अपीलकर्ता यांनी दाखल केलेली नाही परंतु दिनांक 21.12.205 रोजी माहिती अधिकारी यांनी सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला असून तो कळविण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाची प्रत

दाखल केलेली नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 13.1.2006 रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत असून त्यामध्ये माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला असल्यामुळे व्यथित होवून अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांनी केलेला माहितीचा अर्ज हा अपीलाच्या कामकाजाच्या संदर्भात दाखल केलेला नसल्यामुळे त्यांनी कोणत्या तारखेला अर्ज केला व काय माहिती मागितली याबद्यल कोणतेही भाष्य करता येणार नाही. परंतु माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कळविण्याच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे अर्जाचा दि. 24.11.2005 प्राप्त 25.11.2005 असा संदर्भ दिलेला आहे. त्यामुळे माहिती अधिकारी यांनी दिनांक 21.12.2005 रोजी दिलेला निर्णय हा विहीत मुदतीत दिलेला आहे. आता प्रश्न उरतो निर्णय कोणता दिलेला आहे. पत्रावरुन असे कळते की अपीलकर्ता यांनी त्यांच्याविरुध्द असलेला गुन्हा क्र. 3176/2001 मधील केस डायरीच्या प्रती मागितलेल्या असाव्यात व त्यानुसार माहिती अधिकारी यांनी असे कळविलेले दिसते की विषयांकित प्रकरणात आपण आरोपी असल्यामुळे व आपणास केस डायरीच्या प्रती उपलब्ध करुन दिल्यास संबंधित प्रकरणात खटला दाखल करण्यास शासनाच्या बाजूवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्यामुळे आपण माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार दि. 23.11.2005 रोजी या कार्यालयास केस डायरीच्या प्रती मिळण्याबाबत केलेली विनंती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 8 (एच) नुसार या कार्यालयाचे पत्र दि. 23.11.2005 नुसार नाकारण्यात आलेले आहे. तदनंतर संदर्भाधीन पत्रानुसार सदर प्रकरणी फेरविचार करण्याबाबत आपण या कार्यालयास केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की सी. आर. पी. सी. मधील तरतूदीनुसार देखील आरोपीस केस डायरीच्या प्रती देता येत नसल्यामुळे उपरोक्त परिच्छेद एक मधील या कार्यालयाचा निर्णय कायम ठेवून आपली सदर प्रकरणी फेरविचार करण्याची

विनंती देखील फेटाळण्यात येत आहे असे कळविले. प्रथम अपीलातसुध्दा माहिती अधिका–याचा निर्णय हा कायम करण्यात आलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (एच) प्रमाणे अपराधाच्या संदर्भात ज्या अपराध्याचा तपास करणे किंवा त्याना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियांमध्ये अडथळा येईल अशी माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद केलेला आहे. सदरच्या तरतुदी प्रमाणे गुन्हयाच्या संदर्भातील केस डायरीची माहिती उपलब्ध करुन दिल्यास आरोपीस गुन्हयाच्या तपासातील माहिती उपलब्ध करुन देणे सारखे होईल व त्यातील आरोपी हे सदरच्या तपासाची दिशा बदलण्याची शक्यता असते याचा आधार घेवून केस डायरीच्या प्रती उपलब्ध करुन देण्याबद्यल जो निर्णय माहिती अधिकारी यांनी घेतलेला आहे तो योग्य आहे. अपीलकर्ता यांनी मा. सर्वोच्च न्यायालय यांचे A.I.R. 1989 Suprene Court 144 M. P. Thakkar and B. C. Ray JJ मधील फौजदारी प्रक्रिया संहिता 1978 च्या कलम 172 (3) च्या संदर्भात दिलेला निर्णय हा दाखल केलेला आहे व त्या संदर्भामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश हे निदर्शनास आणले आहे. परंतु सदरचा निर्णय हा दि. 14.10.88 चा व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा 12.10.2005 रोजी अंमलात आलेला आहे. माहितीच्या अधिकाराखाली अतिशय मर्यादित मुद्ये हे विचारार्थ येतात व ते मुद्ये तपासतांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींच्या अनुषंगाने तपासावे लागते त्यामुळे अधिनियमाच्या कलम 8 (ज) मध्ये माहिती प्रकट करण्यासाठी हे अपवाद दिलेले आहे त्या अपवादाच्या अनुषंगाने माहिती अधिका–याने निर्णय दिलेला आहे किंवा नाही हे तपासून पाहावे लागते व या प्रकरणात माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 17.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 311/2007.**

1) श्री महारुद्र भगवानदास बिराजदार
म्हारुद्र मेडीकल स्टोअर्स, जाजू हॉस्पीटल समोर
औस रोड लातूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, जिल्हा कार्यालय अमरावती

2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा निवड समिती, जिल्हा परिषद अमरावती. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 15/3/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे उपस्थित राहू शकत नाही म्हणून त्यांनी पत्र दिलेले आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता हे लातूर येथील रहिवाशी असल्यामुळे दि. 6.1.2007 रोजी राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद यांचेकडे सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतू राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद यांनी सदरची अपीलाची सुनावणी नागपूर/अमरावती या क्षेत्रातील जिल्हा निवड समिती जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती असल्यामुळे सुनावणी घेण्यात आली नव्हती व त्या कारणास्तव राज्य माहिती आयोगानी सदरचे द्वितीय अपील हे नागपूर/अमरावती राज्य माहिती आयुक्त यांचेकडे हस्तांतर केले.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 22/12/2005 रोजी जिल्हा निवड समिती अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांचेकडे दि. 20.11.2005 रोजी औषधी निर्माता पदासाठी घेतलेल्या लेखी परिक्षेची मेरीट लिस्ट (मुलाखतीसाठी पात्र उमेदवाराची लिस्ट) कॅटेगरी मार्क सहितची एक झेरॉक्स प्रत व रोल नं. 1088/ओपनची उत्तरपत्रिका झेरॉक्स प्रत माहिती मागितली होती व त्याकरीता रु. 65 चा डी.डी. पाठविला होता. माहिती रजिस्टर पोष्टाने पाठवावी असे नमुद केले. दि. 30.11.2005 रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा निवड समिती अधिकारी यांनी निवासी उपजिल्हाधिकारी अमरावती यांनी अर्जदाराने मागितलेली माहिती सदस्य सचिव, जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अमरावती या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे सदर कार्यालयात रितसर अर्ज करुन माहिती मिळवावी सदर विषयाबाबतचा कोणताही पत्रव्यवहार या कार्यालयाशी करु नये व रु. 65 धनादेश यासोबत परत पाठविण्यात येत आहे असे कळविले होते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे प्रथम अपील दि. 6.2.2006 रोजी दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 20.2.2006 रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी जि. प. अमरावती यांना अपीलकर्ता यांचा माहितीच्या अर्जासंदर्भात माहिती कळविली. त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविले होते. तसेच अपीलकर्ता यांनासुध्दा सदरची माहिती या कार्यालयामध्ये उपलब्ध नसून ती जिल्हा आरोग्य अधिकारी जि. प. शी संबंधित आहे तरी याबाबतची माहिती संबंधित कार्यालयामधून प्राप्त करुन घ्यावी असे प्रतिलिपीनी कळविले होते. त्याप्रमाणे दि. 23.3.2006 रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.अमरावती यांनी मागितलेल्या माहिती करीता रु. 12 चलानद्वारे जमा करावी व मुलाखतीसाठी पात्र उमेदवाराची मेरीट लिस्ट कॅटेगरी मार्क्ससहीत पाठविण्यात येईल असे कळवून अपीलकर्ता यास कळविले होते. दि. 29.3.2006 रोजी अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी

जि. प. (आरोग्य विभाग) असे संबोधुन व 23.3.2006 च्या पत्राचा संदर्भ देवून त्यांना डी. डी. परत मिळाला नाही व पुन्हा त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविले होते. त्यानंतर दि. 22 मे 2006 रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी जि. प. अमरावती यांनी पुन्हा रु. 12 हे शुल्क भरावे परंतु उत्तरपत्रिकांची झेरॉक्स प्रतीचा समावेश नाही. माहिती अधिका–याच्या द्यावयाच्या माहिती मध्ये उत्तररत्रिकाचा समावेश नाही त्यामुळे आपणास उत्तरपत्रिका देता येणार नाही असे कळविले होते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी आज पर्यंत रु. 12 शुल्क भरलेले नसल्यामुळे त्याना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे सांगितले.

3. उत्तरवादी यांनी अपीलकर्ता यास माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचेबरोबर पत्रव्यवहार केलेला आढळून येते. माहिती सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती यांचेकडे उपलब्ध आहे असे सुध्दा कळविले आहे. त्याप्रमाणे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी माहिती करीता शुल्क भरावे हे सुध्दा कळविले आहे. मात्र उत्तरपत्रिकेची प्रत मिळणार नाही कारण त्याचा माहितीच्या अधिकारामध्ये समावेश होत नाही. यावरुन माहिती नाकारली आहे किंवा उपलब्ध करुन दिली नाही किंवा माहिती देण्याची टाळाटाळ केली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यास माहिती दिली गेली नाही हे अपीलकर्ता यांचे म्हणणे बरोबर नाही. मात्र अपीलकर्ता यांनी माहितीच्या करीता रु. 12 शुल्क हे जर आता भरले नसेल तर सदरचे अपील सुनावणीच्या वेळेपर्यंत विलंब झालेला असल्यामुळे सदरची माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देणे योग्य होईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दिनांक 22 मे 2006 रोजी कळविलेल्या प्रमाणे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व रजिस्टर पोष्टाने पाठविण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 21.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 312/2007.**

1) श्री विठ्ठल महादेव जगताप
रा. छत्रपतीनगर दे. गो. तुकूम वार्ड क्र. 2
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
विभाग नियंत्रक यांचे कार्यालय दे. गो. तुकुम,
ताडोबा रोड चंद्रपूर जि. चंद्रपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
विभागीय वाहतुक अधिकारी
राज्य परिवहन चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 5/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 8/12/2006 रोजी दि. 4.12.2006 रोजी आगार प्रमुख श्री चिंतावार यांनी दिलेल्या अपघात प्रथम वृत्ताची वणी येथे दिलेली मुळ हस्तलिखीत प्रतीची छायांकित प्रत मागितलेली होती. परंतु माहिती अधिकारी यांनी त्यांना टायपिंग

केलेली व विभाग नियंत्रक यवतमाळ यांच्या सहीची प्रत पुरविभ्यामुळे व्यथित होवून प्रथम अपील दि. 18.12.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलात दि. 18.1.2007 रोजी अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यात यावी तसेच आगार प्रमुख यांची हस्तलिखीत प्रत यवतमाळ विभाग नियंत्रक यांचेकडून मागवून त्यांना देण्यात यावे असे कळविले. त्यानुसार विभाग नियंत्रक चंद्रपूर यांनी वणी आगाराची प्रथम वृत्ताची मागणी करणारे विभाग नियंत्रक यांना पत्र लिहिले. सदरच्या पत्रानुसार अपघाताशी संबंधित चालकाने अपघाताचे प्रथम वृत्ताची मागणी केली असता उपरोक्त झेरॉक्स प्रत त्यांना दिली असता त्यांनी दि. 12.4.2005 श्री चिंतावार आगार प्रमुख यांच्या सहयाची प्रथम वृत्ताची मागणी केलेली आहे. सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत मागितल्यामुळे ठरावीक मुदतीचे आत त्यांना द्यावयाची असल्याने पत्र क्र. 34 दि. 12.4. 2005 ची झेरॉक्स प्रत उलटटपाली या कार्यालयास पाठविण्यात यावे असे कळविले आहे. त्यामुळे दि. 27.1.2007 रोजी यवतमाळ विभागीय नियंत्रक यांनी सदरची झेरॉक्स प्रत पाठविलेली दिसते. परंतु सदरची प्रत कार्यालयानी अपीलकर्ता यास पुरविण्याच्या आधी अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील सादर केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 8.12.2006 रोजी यात मागितलेल्या दि. 12.4.2005 ची प्रत ही पूर्वीच मागितलेली होती व प्रथमच दि. 8.12.2006 च्या अर्जामध्ये दि. 12.4.2005 ची मुळ प्रत दिली नाही अशी तक्रार करुन अर्ज सादर केलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 12.4.2005 ची प्रत ही माहितीच्या अधिकारामध्ये मागितलेली नव्हती असे दिसते. त्यामुळे जी प्रत दि. 4.12.2006 ला त्यांना पुरविण्यात आलेली आहे ती सुध्दा माहितीच्या अधिकारात पुरविण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांनी कोणती प्रत पूर्वीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली होती हे तपासता येत नाही. मात्र माहिती अधिका–यांनी दिनांक 12.12.2006 रोजी प्रत पुरविण्यात आली ती टायपिंग करुन दिलेली नसून मुळ

दस्तऐवजाची झेरॉक्स प्रत आहे. तसेच खातेनिहाय चौकशी सुरु असल्याने व चौकशी दरम्यान मागणी केलेली कागदपत्रे पुरविलेली असल्याने काही कागदपत्रात शंका असतील तर सदर बाब चौकशी दरम्यान त्या अनुषंगाने खुलासा करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येईल व त्याचप्रमाणे माहितीच्या अधिकारात महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक दि. 22.12.2004 प्रमाणे अर्जाद्वारे मागितलेली माहिती स्वतंत्रपणे देण्याची गरज नाही असे कळविले. माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यास 4.12.2006 प्रमाणे दिनांक 12.4.2006 ची पुरविलेल्या प्रतीबद्यल विचारले असता त्यांनी असा खुलासा केला आहे की मुळ 12.4.2006 मध्ये असलेल्या घटनेचा तपशील ही प्रत यवतमाळ डेपोकडे होती. त्यावरुन सदरच्या मुळ अपघाताचे प्रथम वृत्ताच्या प्रती हया टाईप करुन यवतमाळ डेपोकडून ती चंद्रपूर डेपोकडे पाठविण्यात आली.व त्यामुळे अपीलकर्ता यांनी विभाग नियंत्रक चंद्रपूर यांचेकडे माहिती मागितली असता त्याप्रमाणे त्या टाईप प्रतीची झेरॉक्स प्रत पुरविण्यात आली. त्यामुळे अपीलकर्ता यास खोटी माहिती पुरविली असे म्हणता येणार नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु असे असले तरी अपीलकर्ता यांनी मात्र त्यांना मुळ प्रतीची छायांकित प्रत मागवून देण्यात यावी असे आदेश दिल्यामुळे अपीलकर्ता यास यावतमाळ डेपोकडे असलेली मुळ प्रतीची छायांकित प्रत मागवून पुरविण्यात आली आहे. थोडक्यात अर्जदार हे चंद्रपूर आगार येथील चालक आहे. अपघात हा यवतमाळ विभागाच्या हद्यीत झाला. त्यामुळे श्रीयूत चिंतावार यांनी अपघाताचे वृत्त हे विभाग नियंत्रक यवतमाळ यांचेकडे दाखल केले होते. अपीलकर्ता यांनी माहिती ही मुळातच विभाग नियंत्रक यवतमाळ यांचेकडे मागितली असती तर त्यांना त्याचवेळेस आगार व्यवस्थापकाच्या सहीची प्रत मिळाली असती असे दिसते. परंतु माहिती मागीतली चंद्रपूर विभागाकडे ती ही माहितीच्या अधिकारात मागितलेली नाही. त्यामुळे चंद्रपूर

विभागाकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी दिली. त्यावर पुन्हा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ती जी दिली ती खोटी दिली. जी पुरविली ती सुध्दा बरोबर नाही. त्याचेकडे मुळ प्रत आहे असे त्यांचे म्हणणे आहे. चंद्रपूर विभागाकडून दिलेली प्रत व यवतमाळ विभागाकडून हस्तलिखीत प्रतीची छायांकित प्रत तपासून पाहिली असता त्यात कोणत्याही प्रकारचा फरक नाही फक्त आगार प्रमुख व विभाग नियंत्रक यांचे सही सोडल्यास. त्यामुळे अपीलकर्ता यांची दिशाभूल केली असा निष्कर्ष काढता येत नाही. अपीलकर्त्याची माहितीच्या अर्जातच मुळ तक्रार आहे. ती त्याच्या साध्या अर्जातून मागितलेल्या माहिती बद्यल.त्यानंतर वेगाच्या बद्यल सुध्दा त्यांनी तक्रार केली. टायपिंग केलेल्या प्रतीमध्ये वेगाचा उल्लेख नाही व हसतलिखीत प्रतीमध्ये आहे असे त्यांचे म्हणणे आहे ते तपासून पाहिले असता दोनही प्रतीत वेगाचा उल्लेख नाही असे दिसून येते. फक्त विभाग नियंत्रक व आगार प्रमुख एवढी बाब सोडली तर पुरविलेल्या माहितीत कोठेही तफावत दिसून येत नाही व त्यामुळे माहिती अधिकारी यांनी दिलेले 12.12.2004 चे उत्तर हे दिशाभूल करणारे आहे असे म्हणता येत नाही. परंतु प्रथम अपीलामध्ये एफ. आय.आर. आगार व्यवस्थापकाचा असल्यामुळे तो पुरविण्यात यावा व त्यामुळेच ती यवतमाळ विभागाकडून मागवून पुरविण्यात आलेली दिसते. थोडक्यात अपीलकर्ता यांना आतापर्यंत त्यांना माहितीच्या अधिकाराच्या अर्जाच्या पूर्वी मागितलेल्या माहितीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या तक्रारीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 21.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 315/2007.**

1) श्री कपील नारायणराव राजूरकर
प्लॉट नं. 53, वकीलपेठ हनुमान मंदिरजवळ
नगपूर – 440009 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद नागपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद नागपूर. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 31/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. सहाय्यक माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. माहिती अधिकारी यांनी गैरहजर राहण्याकरीता कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 24/7/2006 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे 4 मुद्यांवर माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. जिल्हा निवड समिती नागपूर कडून औषध निर्माता पदाकरीता घेण्यात आलेल्या दि. 16 जुलै 2006 रोजी परिक्षेच्या

निकालाबाबत व या पदाकरीता करण्यात आलेल्या नियुक्त्याबाबत माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 3.8.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु ती अपूर्ण आहे या कारणास्तव अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दि. 30.8.2006 रोजी दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार दि. 18.9.2006 रोजी अपीलकर्ता यास पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी ज्या चार मुद्यांवर माहिती मागितलेली होती त्यापैकी तिन मुद्यांवरची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्या संदर्भात पुन्हा प्रथम अपील करावे लागलेले दिसत आहे. तसेच अपीलकर्ता यांनी पुन्हा दि. 26.10.2006 रोजी कलम 19 (3) प्रमाणे आणखी एक अपील दाखल केलेले दिसते. त्यात पुन्हा दि. 6.11.2006 रोजी उत्तर देण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनीसुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचे काटेकार पालन केलेले नाही. व त्यामुळे प्रत्येक वेळेस त्यांना विसंगत माहिती मिळालेली दिसते. असे असले तरी सहा. माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना विसंगत माहितीबद्यल विचारले असता त्यांनी असे सांगितले की जे घडले त्याप्रमाणे माहिती त्यांना कळविली. म्हणून झालेली विसंगती त्यांना मान्य आहे असा तो प्रकार आहे. व त्यामुळे त्यांनी माहिती ही ज्याप्रमाणे उपलब्ध आहे त्याप्रमाणे पुरविलेली आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे माहिती विसंगत आहे व चुकीची आहे हे जरी खरे असले तरी प्रत्यक्षात घडलेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. उत्तरपत्रिकेच्या संदर्भामध्ये ग्राम विकास विभागाने जे परिपत्रक काढलेले आहे व त्याची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्या

परिपत्रकाप्रमाणे त्यांना उत्तर पत्रिकेच्या प्रती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले असल्यामुळे माहिती अधिकारी यांनी त्याबाबतीत अपूर्ण माहिती दिली असे म्हणता येत नाही.

4. अपीलकर्ता हे अपंग आहेत व मुळातच जाहिरात व प्रत्यक्ष निवड प्रक्रिया या मधील तफावतीमुळे त्यांची जरी दिशाभूल झालेली असेल त्याकरीता मात्र माहितीच्या अधिकारामध्ये कोणत्याही प्रकारची कारवाई करता येत नाही. पुन्हा अपीलकर्ता यांनी सांगितले की मा. उच्च न्यायालयामध्ये सदरच्या बाबत प्रकरण प्रलंबित आहे. अर्थातच उपलब्ध असलेल्या माहितीचा त्यांना मा. उच्च न्यायालयामध्ये उपयोग करुन घेता येईल व त्या आधारेच त्यांना मा. न्यायालयात त्यांचे म्हणणे मांडता येईल. त्यामुळे माहिती ही त्यांना उपलब्ध करुन दिली नाही किंवा अपूर्ण माहिती दिली असे म्हणता येत नाही व त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती ही विहीत मुदतीत दि. 3.8.2006 रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली असून त्या माहितीच्या संदर्भात पुन्हा दिनांक 18.9.2006 व दि. 6.11.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता यांनी निवड झालेल्या अपंगाच्या संदर्भामध्ये अपंगत्वाच्या वैद्यकीय दाखल्याबाबत प्रत मागितलेली असल्यामुळे ती उत्तरवादी यांचेकडे उपलब्ध असल्यास 15 दिवसात पोष्टाने पाठविण्यात यावे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 22.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 317/2007.**

1) श्री श्रीहरी सदाशिव पाऊलबुधे
राममंदिर जवळ वार्ड नं. 2
मु.पो.ता. चामोर्शी जि. गडचिरोली. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जन माहिती अधिकारी
अधिक्षक अभियंता
पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय चंद्रपूर
जिल्हा चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 17/8/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवदी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 24/5/2006 रोजी श्री मृत्युंजय नारायण गायकवाड उपविभाग दिनाप्रकल्प सिंचाई उपविभाग कार्यालय चामोर्शी येथे मागील 20 वर्षापासून एकाच ठिकाणी कार्यरत राहून लाभाच्या पदावर कार्यरत असल्याने तक्रारी चौकशी अहवालाची प्रत मिळणेबाबत. 2) तक्रारी अहवालावरुन मा. अधिक्षक अभियंता प्रकल्प मंडळ चंद्रपूर यांनी केलेल्या कार्यवाहीची जनहितास कार्यवाहीची माहिती प्रत

मिळण्याबाबत. रजिस्टर नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली होती. सदरच्या माहितीच्या अर्जा संदर्भात दि. 7.6.2006 रोजी विषयांकित प्रकरणी मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नियम 8 (च) अन्वये देता येणे शक्य होत नाही तथापी माहिती करीता श्री मृत्युंजय नारायण गायकवाड, मजुर (रु.अ.आ.) यांचे सावली येथे स्थानांतर विषयीची कार्यवाही करण्यात आलेली आहे, याची कृपया नोंद घ्यावी असे अपीलकर्ता यास कळविण्यात आले. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले परंतु पुन्हा ते अधिक्षक अभियंता यांचेकडेच दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 11.6.2006 रोजी मागितलेली माहिती देण्यात आलेली आहे. तसेच माहितीचा अधिकारी अधिनियम 2005 कलम 19 (1) अन्वये वरिष्ठ दर्जाच्या अधिका–याकडे अपील दाखल करावे असे कळविले असल्यामुळे व्यथित होवून द्वितीय अपील अपीलकर्ता यांनी दाखल केले. पुन्हा दि. 21.7.2006 रोजी प्रथम अपील अधिक्षक अभियंता यांचेकडेच दाखल केलेले आहे व त्याचेही उत्तर दि. 2.8.2006 रोजी पूर्वी प्रमाणेच देण्यात आलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये अधिक्षक अभियंता यांनी खुलासा दाखल केलेला आहे. सदरच्या खुलाशामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या नियम 8 (1) मधील (छ) अन्वये माहिती देता येणे शक्य नाही कारण जी माहिती प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जिवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल अशी माहिती देण्याबाबत अपवाद देण्यात आलेला आहे. त्याशिवाय तक्रारकर्त्यांनी चौकशी अधिका–यांनी जेव्हा त्यांना प्रत्यक्ष साक्षीकरीता मोकास्थळी बोलावले तेव्हा आमच्या जिवाला धोका आहे या सबबीखाली हजर राहण्याचे टाळलेले

आहे. तक्रारकर्त्यास अध्यक्ष मार्कंडेश्वर देवस्थान यांनी नोकरीवरुन काढून टाकले असल्याने व झालेल्या पोलीस तक्रारी लक्षात घेता चौकशी अहवाल तक्रारकर्त्यांना न देण्याबाबत अध्यक्ष मार्कंडेश्वर देवस्थान यांनी विनंती केल्या नुसार व या सर्व बाबींची सत्यता पडताळून पाहिल्यानंतर कायदा व सुव्यवस्था यावर फरक पडू शकतो या निष्कर्षाप्रत अपीलीय अधिकारी पोहोचलेले आहे व तदनुसार चौकशी अहवाल प्रत देण्याचे स्पष्ट नाकारलेले आहे. व अशाप्रकारे अपीलकर्ता अर्जदार यांनी दि. 7.6.2006 नोंदणी डाकेने माहिती कळविली होती. सदर पत्र त्यांना दि. 13.6.2006 ला प्राप्त झाले. सदरच्या निर्णयावर जे प्रथम अपील केले होते त्या प्रथम अपीलाच्या संदर्भात वरिष्ठ अधिका–याकडे अपील करावे असे कळविण्याचे कारण असे की अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी म्हणून निर्णय हा अधिक्षक अभियंता यांचा असल्यामुळे तसे कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांनी दोन प्रथम अपीले दाखल केली होती ती पुन्हा अधिक्षक अभियंता यांचेकडे दाखल केल्यामुळे त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. तसेच सदर अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे गोपनिय पत्र दि. 2.1.2007 अन्वये अपीलकर्ता यास कळविले की माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य व समर्पक असून सदर माहितीस या कार्यालयाची सहमती आहे तसेच वारंवार पत्रव्यवहार करुन ती माहिती मागणे योग्य होत नाही किंबहुना संबंधीत कर्मचा–या विषयी आपले वैयक्तीक द्वेषाची त्यामुळे पुष्टी होवून माहितीचा अधिकार याचा माहिती प्राप्त करण्याचा आपला उद्येश महत्वाचा दिसत नसून केवळ संबंधीतावर कार्यवाही होणे हा एकमेव उद्येश प्रषित होतो. तसेच याबाबत असेही निदर्शनास येते की या कार्यालयास प्रकरणी कार्यकारी अभियंता यास सादर केलेल्या प्राथमिक चौकशी अहवालातील अभिप्रायावरुन तक्रारकर्ता अर्जदार एक बडतर्फ कर्मचारी व एक जिल्हा परिषद चामोर्शी येथे शिक्षक वा मुख्याध्यापक या पदावर निमशासकीय सेवक म्हणून कार्यरत आहे. कार्यकारी अभियंता

यांनी सादर केल्याप्रमाणे अर्जदार नेहमीच विनाकरण तक्रारी करुन इतरांना अडचणी निर्माण करतात असे केलेले विधान सत्य असल्याचे वरील विवेचनावरुन निदर्शनास येते. एक बडतर्फ व दुस–या निमशासकीय कर्मचा–याने दुस–या शासकीय कर्मचा–या विरुध्द केवळ वैयक्तिक आकसापोटी माहितीच्या अधिकारा अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा गैरउपयोग या प्रकरणी निदर्शनास येतो. पुन्हा आयोगाच्या असेही निदर्शनास आले आहे की तक्रारकर्ता अर्जदाराने नुकताच 17.7.2007 अन्वये या कार्यालयास वकीला मार्फत कलम 80 सी.पी.सी. अंतर्गत नोटीस पाठवून श्री मृत्युंजय ना. गायकवाड, मजूर यांचे स्थानांतर झालेल्या ठिकाणी कार्यमुक्त कां केले नाही याबाबत विचारणा करुन फौजदारी कार्यवाही करण्याबाबत परवानगी मागितलेली आहे. एखाद्या नोंदणीकृत संस्थानातील कथीत गैरकारभार वा भ्रष्टाचार प्रकरणी सहनिबंधक हे सक्षम प्राधिकारी ठरत असून त्यांचेकडे हे प्रकरण सादर करण्याबाबत तक्रारकर्त्यास सुचविलेले आहे. परंतू तसे न करता केवळ चौकशी अहवाल प्रत मागून नामांकीत संस्थानाचे नांव खराब करण्याचा उद्येश तक्रारकत्याचा स्पष्ट होतो व त्या कारणाखाली नियम 8 (1) (छ) नुसार माहितीचा दुरुपयोग निदर्शनास आल्यामुळे माहिती नाकारलेली आहे असे स्पष्टिकरण माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांनी दिलेले आहे.

4. सदरच्या स्पष्टिकरणाच्या मागे कारण जाणून घेणे आवश्यक आहे व त्याकरीता अपीलकर्ता यांनी केलेले तक्रार अर्जाचे अवलोकन केले त्यानंतर चौकशी अहवालाचे अवलोकन केले. वास्तविक अपीलकर्त्यानी देवस्थानच्या संदर्भात केलेल्या तक्रारीबद्यल चौकशी करण्याचे काहीही कारण नव्हते व स्थानांतराच्या बद्यल प्रशासकीय नियमाप्रमाणे निर्णय द्यावयास पाहिजे होता. असे असले तरी स्थानिक परिस्थिती नुसार ही चौकशी करण्यात आलेली दिसून येते. स्थानिक परिस्थितीवरुन व चौकशी अहवालातील सदरच्या गावातील सरपंचापासून ते गावक–यांनी दिलेल्या बयानापर्यंत व देवस्थानच्या

अधिका—याने दिलेल्या बयानाचा संदर्भ व पूर्वी झालेल्या पोलीस तक्रारीचा संदर्भ स्थानिक शांताता भंग पावू नये या स्थानिकांच्या विनंतीस मान देवून हया अहवालाची प्रत देण्यात आलेली नाही त्यामुळे माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती ही जाणूनबुजुन दिलेली नाही किंवा माहिती देण्याचे टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. त्या त्या स्थानिक परिस्थितीमध्ये त्यांनी निर्णय घेवून माहितीचा अधिकार अधिनियम कलम 8 (1) (छ) चा आधार घेवून माहिती देण्याचे नाकारलेले आहे ते कारण संयुक्तीक वाटते.

5. असे असले तरी अपीलकर्त्यानी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात वर नमुद केल्याप्रमाणे छाननी करुन निर्णय देणे योग्य झाले असते. तसेच चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता अपीलकर्त्याच्या विरुध्दच सर्व साक्षीदाराचे बयाण आहे व त्यामुळे अपीलकर्त्यास स्वतःचे स्थान कळणे तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्त्यास त्यांनी केलेल्या तक्रारीच्या चौकशीच्या अहवालाची प्रत देण्यास हरकत असू नये.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून त्यांनी दि. 28.9.2004 रोजी अधिक्षक अभियंता यांचेकडे केलेल्या तक्रारीचा दि. 8.12.2004 चा चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन द्यावी. सदरच्या चौकशीच्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन घेतल्यावर अपीलकर्ता यांनी त्याबाबतची पोच ही उत्तरवादी यांना द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 22.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 358/2007.**

1) श्री नागो पुंडलीकराव गाणार
रा. सिरसपेठ मठठीपूरा, आशा भवन मागे
नागपूर – 440 009. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद नागपूर.

2) जन माहिती अधिकारी
शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद नागपूर ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 21/8/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवदी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 21/11/2006 व 28.11.2006 रोजी अनुक्रमे 19.3.97 च्या कालावधीतील कोलबास्वामी उच्च प्राथमिक शाळा प्रेमनगर नागपूर या कालावधीतील शिक्षकाचे नेमणूकीस मान्यता मिळण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे सादर केलेले पूर्ण दस्तऐवज ठराव व कार्यालयीन टिप्पणीसह प्रमाणित प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत व तसेच 28.11.2006 च्या अर्जामध्ये त्यात शाळेतील केपीएस 83/10/10/1997 पूर्ण दस्तऐवज व ठराव कार्यालयीन टिपणीसह

प्रमाणित प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत माहिती मागितलेली आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 12.12.2006 रोजी दोन पत्रांच्या अन्वये त्या कालवधीचा रेकॉर्ड कार्यालयात उपलब्ध नाही त्यामुळे केलेली विनंती मान्य करता येत नाही असे उत्तर दिलेले आहेत. सदरच्या उत्तराने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2006 रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलीत व दोनही प्रथत अपीलामध्ये दि. 22.1.2007 रोजी निर्णय देण्यात येवून पूर्ण दस्तऐवजाच्या ठरावासह मागितलेली माहिती कार्यालयास उपलब्ध नसून रेकॉर्डला स्थलांतरीत करण्यात आले. रेकॉर्ड उपलब्ध झाल्यावर आपणास दस्तऐवज पुरविण्यात येईल असा निर्णय देण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील सादर केलेले आहे.

3. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये एका माहितीच्या अर्जाच्या विरुध्द व एका प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द एक द्वितीय अपील दाखल करता येते. दोन माहितीच्या अधिकाराच्या अर्जाच्या निर्णया विरुध्द एक द्वितीय अपील दाखल करता येत नाही. त्यामुळे अपीलकर्त्याच्या द्वितीय अपीलाचा विचार करतांना कलम 20 च्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचा निर्णय देता येणार नाही.

4. माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सद्यस्थितीत रेकॉर्ड उपलब्ध नसल्याने माहिती पुरवता येणार नाही असे निर्णय दिलेला असल्यामुळे माहितीच्या अधिकारात विहीत मुदतीत माहिती दिलेली आहे असे म्हणता येते. परंतु रेकॉर्ड स्थलांतरीत झालेले असल्यामुळे व उपलब्ध झाल्यावर माहिती कळविण्यात येईल असे कळविल्यामुळे माहिती अधिकारी यांनी सदरच्या रेकॉर्डचा शोध घ्यावा. ज्या ठिकाणी स्थलांतरीत झालेले असेल त्या ठिकाणी सुध्दा शोध घेण्यात यावा व त्यानंतर रेकॉर्ड उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास माहिती देणे संयुक्तिक राहिल. मात्र एक महिन्यामध्ये शोध घेण्याचा अहवाल या कार्यालयास सादर करणे संयुक्तिक राहिल.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही 9 वर्षाची जुनी असली तरी व रेकॉर्ड हे स्थलांतरीत झालेले असले तरी त्या रेकॉर्डचा शोध घेण्यात यावा व त्याप्रमाणे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करुन अहवाल 1 महिन्यात आयोगास सादर करावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 22.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 334/2007.**

1) श्री रामभाऊ पंचम तासकर
मु. पो. ता. भिवापूर, वार्ड नं. 3
जिल्हा नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री टिंगरे, खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती भिवापूर ता. भिवापूर जिल्हा नागपूर.

2) जन माहिती अधिकारी
श्री यु. जे. वसु, सचिव,
ग्रामपंचायत भिवापूर ता. भिवापूर
जिल्हा नागपूर. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 12/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवदी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 14/8/2006 सचिव ग्रामपंचायत कार्यालय भिवापूर यांचेकडे 9 मुद्यांवर माहिती मिळणेसाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जामध्ये नागभीड हायवे व धर्मापुर आंभोरा रोड या चौकात श्री कृष्णगोपाल गुप्ता यांनी सन 2002–2003

मध्ये केलेल्या बांधकामाच्या बद्यल माहिती विचारली होती. सदरची माहिती विहीत मुदतीत न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 25.9.2006 रोजी प्रथम अपील सादर केले होते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 6.11.2006 रोजी देण्यात आला असून 15 दिवसामध्ये पूर्ण माहिती देण्यात यावी असा निर्णय दिलेला होता. सदरची माहिती अपीलकर्ता यांना दि. 21.11.2006 रोजी उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु सदरच्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी 12.2.2007 रोजी सदरचे व्दितीय अपील सादर केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी व्दितीय अपीलामध्ये माहिती उशिरा व चुकीची दिल्याबाबत दंडात्मक व प्रशासकीय कारवाई करण्याबाबत विनंती केलेली आहे. परंतु मिळालेली माहिती ही कशाप्रकारे चुकीची आहे याबद्यल कोणत्याही प्रकारचा खुलासा अपीलकर्ता यांनी दाखल केलेला नाही. त्याकरीता त्यांना विचारले असता व प्रत्येक मुद्याबाबत माहिती तपासून त्यांना विचारले असता त्यांचे एवढेच म्हणणे आहे की त्यांच्या मते गुप्ता यांनी प्लॉटचे बांधकाम नियमानुसार केलेले नाही त्यामुळे त्याबद्यल माहितीमध्ये कोणत्याही प्रकारचा उल्लेख नाही. अपीलकर्ता यांनी 1 ते 9 मुद्यांमध्ये मंजुरी नियमानुसार दिली होती काय याबद्यल माहिती विचारली आहे व तशा प्रकारची माहिती ही त्यांना उपलब्ध करुन दिली. त्यामुळे नियमानुसार आहे किंवा नाही याबद्यलचा प्रश्न हा माहितीच्या अधिकारात उपस्थित होत नाही. व त्यामुळे त्यांना माहिती चुकीची दिली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. तसेच सदरची माहिती ही त्यांना उशिरा देण्यात आली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही हे दिसून येत आहे त्याकरीता माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की माहिती ही जुनी असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास उशीर झालेला आहे. सदरच्या बांधकामाची मंजुरी ही त्यांच्या कालावधीतच दिली गेली आहे. असे असतांना

त्यांनी ती माहीती ही विहीत मुदतीत उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती. परंतु त्या करीता त्यांना विचारले असता ग्रामपंचायतीचे कर्मचारी हे माहिती काढून देतात व त्यानंतर ती उपलब्ध करुन दिली. तसेच कामाचा व्याप जास्त असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला असे त्यांनी खुलाशात म्हटले आहे. खंड विकास अधिकारी यांना सुध्दा त्याबद्यल विचारले असता त्यांनी असे सांगितले की भिवापूर ग्रामपंचायत ही मोठी ग्रामपंचायत आहे व कामाचा व्याप जास्त आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास त्यांना विलंब होणे शक्य आहे. परंतु असे असले तरी ही माहिती त्यांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती हे मात्र निश्चित. त्याकरीता सचिव ग्रामपंचात यांचे बाबत त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे त्यांची विभागीय चौकशी खंड विकास अधिकारी यांनी करणे आवश्यक राहिल. व त्याप्रमाणे त्यांची विभागीय चौकशी केल्याच्या नंतर त्यात योग्य ती नियमाप्रमाणे कारवाई केल्यानंतर सदरच्या कारवाईचा अहवाल या आयोगाच्या कार्यालयास कळविणे संयुक्तिक राहिल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

2) सचिव, ग्रामपंचायत यांनी माहिती देण्यास विलंब केलेला असल्यामुळे त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे त्यांची विभागीय चौकशी ही खंड विकास अधिकारी यांनी करावी व त्याप्रमाणे अहवाल आयोगास सादर करण्यात यावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 28.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 336/2007.**

1) श्री नारायण अंतू साखरे
अध्यक्ष पुतळा समिती चंद्रपूरटोली वार्ड नं. 1 गोरेगाव
मु. पो. ता. गोरेगाव जिल्हा गोंदिया 441801. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा पोलीस अधिक्षक, गोंदिया

2) जन माहिती अधिकारी
श्री श्रीकृष्ण दत्तात्रय कोकाटे
पोलीस उपविभागीय अधिकारी
आमगाव जिल्हा गोंदिया ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 20/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अनुपस्थित राहण्याकरीता अनुमती मागितलेली आहे ती मान्य केलेली आहे.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 14/7/2006 रोजी पोलीस अधिक्षक गोंदिया जिल्हा गोंदिया यांचेकडे दि. 17.6.2006 शनीवार मौजा चंद्रपूरटोली गोरेगावची रिपोर्ट दिनांक 19.6.2006 गैरअर्जदार यावर काय कार्यवाही केली, नसल्यास कारण काय ? ही माहिती व्यक्तिशः उपस्थित राहून घेणार म्हणून मागितली होती. सदरची माहिती ही अर्जदारास

दि. 10.8.2006 रोजी ठाणेदार गोरेगाव मार्फतीने रवाना केली होती. परंतु दि. 11.8.2006 रोजी अर्जदारानी घेण्यास नकार दिला म्हणून दि. 14.8.2006 रोजी परत आली. परंतु अर्जदार यांनी दि. 16.8.2006 रोजी प्रथम अपील पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यालय आमगाव जिल्हा गोंदिया यांचेकडे दाखल केला. दि. 2.10.2006 रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी आमगाव हे प्रथम अपीलीय अधिकारी नसल्याने तक्रारीचे निवारण करु शकत नाही व प्रथम अपील हे जिल्हा पोलीस अधिक्षक गोंदिया यांचेकडे दाखल करावे असे कळविले होते. प्रथम अपील हे जिल्हा पोलीस अधिक्षक गोंदिया यांचे कडे दाखल केले किंवा नाही हे अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. परंतु द्वितीय अपील मात्र सादर केले आहे.

3. अपीलकर्ता यांचा अर्ज हा 15.7.2006 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतर होवून आला. त्याप्रमाणे दि. 17.6.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी संबंधित पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे गोरेगाव यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पाठविला. त्याप्रमाणे दि. 31.7.2006 रोजी संबंधित पोलीस निरीक्षक यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे रिपोर्ट पाठविला. सदरचा रिपोर्ट हा अपीलकर्ता हे व्यक्तीशः घेणार होते परंतु ते उपस्थित न झाल्यामुळे 10.8.2006 रोजी ठाणेदार गोरेगाव मार्फत रवाना केला परंतु 11.8.2006 ला अर्जदाने घेण्यास नकार दिल्यामुळे दि. 14.8.2006 रोजी रिपोर्टसह माहिती घेवून जाण्याविषयी कळविले. दि. 2.10.2006 वर नमुद केल्याप्रमाणे प्रथम अपील दाखल केले होते ते उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे. या ठिकाणी विशेष नमुद करावेसे वाटते की अर्जदाराने प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस उपअधिक्षक यांचेकडे गोरेगाव पोलीस ठाणे येथे माहिती मिळण्याकरीता अर्ज केला होता मात्र प्रथम अपील हे जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेपेक्षा कनिष्ठ उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे दाखल केले. त्यामुळे त्यांना प्रथम अपील हे जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडे दाखल करण्यास कळविले. असे असले तरी दि. 6.10.2006 रोजी अर्जदार कार्यालयात येवून माहिती घेवून गेलेले आहेत व त्याबद्यलचा पुरावा माहिती`

अधिकारी यांनी जोडलेला आहे व ही बाब अपीलकर्ता यांनासुध्दा मान्य आहे.

4. अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती विहीत मुदतीत मिळाली असे असतांनासुध्दा त्यांनी द्वितीय अपील कां दाखल केले असे त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की जी माहिती उपलब्ध झाली आहे ती त्यांचेविरुध्द असून गैरअर्जदाराचे बाजूने आहे व त्यामुळे द्वितीय अपील दाखल केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती ही ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे एवढेच अपेक्षित आहे. अर्जदाराने केलेल्या अर्जाच्या संदर्भात केलेली कार्यवाहीचा रिपोर्ट हा त्यांना उपलब्ध करुन दिलेला आहे. अर्जदाराने केलेल्या तक्रारीप्रमाणेच कारवाईचा निष्कर्ष अपेक्षित असेल असे नाही. चौकशीअंती जो निष्कर्ष असेल त्याचाच अहवाल हा उपलब्ध करुन दिला जावू शकतो व त्याप्रमाणे अपीलकर्त्यास अहवाल उपलब्ध करुन दिला आहे ही बाब वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास मान्य आहे. उपलब्ध अहवालाच्या निष्कर्षा वरुन अपीलकर्ता यास काही तक्रार असेल तर ती त्यांनी स्वतंत्रपणे जिल्हा अधिक्षक किंवा त्यांचेपेक्षा वरिष्ठ अधिकारी यांचेकडे स्वतंत्रपणे करावे. एकुणच अपीलकर्त्याचा माहितीच्या अर्जाप्रमाणे विहीत मुदतीत त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे त्यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 28.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 367/2007 आणि 368/2007.**

1) श्री रामाजी कवडूजी भेंडे
मु. पो. वडधामना ता. हिंगणा
जिल्हा नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर

2) जन माहिती अधिकारी
मुख्याध्यापिका,
स्वामी विवेकानंद हायस्कूल, वडधामना
ता. हिंगणा जिल्हा नागपूर. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 21/7/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवदी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 23/3/2006 रोजी एकुण खालील 14 मुद्यांवर माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता.

1) वर्ग 5 ते 8 च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सावित्री बाई फुले यांजने अंतर्गत समाज कल्याण विभाग मार्फत शिष्यवृत्ती योजना 1995–1996 पासून सुरु करण्यात आलेली आहे. त्यापैकी 1995–1996 ते 2006 पर्यंतच्या किती विद्यार्थ्यांनी किती रुपये शिष्यवृत्ती मिळाली ते वर्ष, वर्ग आणि विद्यार्थीनींचे नांव.

2) वर्ग 8 ते 10 च्या विद्यार्थ्यांना 2005–2006 पर्यंत समाज कल्याण विभागा तर्फे मिळालेली शिष्यवृत्ती किती रुपये आणि विद्यार्थ्यांची नावे वर्ग वाईज व मिळालेली शिष्यवृत्ती वितरीत केल्याचा दिनांक तसेच समारंभ घेवून वितरीत केले काय ?

3) वर्ग 5 ते 10 मध्ये शिकणा–या विद्यार्थ्यांना मागास वर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती 1995 ते 06 पर्यंत किती मिळाली. प्रथम व द्वितीय क्रमांकाने मध्ये येणा–या विद्यार्थ्यांची नावे व मिळालेले रुपये व वर्ष

4) वरील क्र. 1 ते 3 च्या माहितीमध्ये आपणास समाज कल्याण विभागाकडून किती तारखेला चेक प्राप्त झाला व तो चेक आपण कोणत्या बॅकेत, कोणत्या खात्यामध्ये जमा केला तसेच ते पैसे कोणत्या तारखेला बॅकेतून काढले व विद्यार्थ्यांना कोणत्या तारखेला वाटप केले.

5) शाळा विना अनुदानावर असतांना शिक्षक कर्मचा–यांना नियमाप्रमाणे वेतन दिले काय ? दिले असल्यास 1989 पासून 1997 पर्यंत कोणत्या कर्मचा–यांना किती वेतन मिळाले व प्रत्येक वर्षात वेतनासाठी पैसा कशा पध्दतीने जमा केला. आलेला पैसा कोणत्या बॅकेत जमा केला बॅकेचे नाव व खाते नंबर द्यावे.

6) आपली नियुक्ती करतेवेळी 1991 ला जाहिरात दिली होती का. 1989 पासून आजपर्यंत नियुक्त केलेल्या कर्मचा–यांची रोस्टर बिंदू नामावली.

7) 1995 पासून मा. शिक्षणाधिकारी (माध्य) नागपूर यांच्याकडे मान्यता मिळविण्यासाठी सादर करण्यात आलेला प्रस्ताव/ठराव कव्हरींग लेटर सहित सर्व कर्मचा–यांची सादर केलेल्या ठरावाची प्रत. कामावर असलेले व नसलेल्यांची.

8) दोन वेळा किंवा त्यापेक्षा अधिक पाठविला असल्यास ते सुध्दा देण्यात यावे.

9) 1991 पासून 2006 पर्यंत नियुक्त केलेल्या कर्मचा–यांचे नियुक्ती आदेश

10) 2005 ची सेवाजेष्ठता यादी प्रशिक्षणाचे वर्ष नमुद करुन

11) 1991, 1992, 1993, 1994, 1995, 1996, 1997, 1998 व 2005, 2006 ची सेवाजेष्ठता यादी, प्रशिक्षणाचे वर्ष व नियुक्तीच्या दिनांकासहित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–यांची यादी.

12) अ) 2000–2001 मध्ये क्रिडा अधिकारी नागपूर यांच्याकडून व्यायाम शाळेकरीता व क्रिडांगण समपातळी करिता किती अनुदान प्राप्त झाले.

ब) जर व्यायाम शाळा बांधली असेल तर व्यायामशाळा चालम राहण्याची वेळ

क) व्यायामशाळेत, व्यायामशाळेसंबंधी कोणकोणते साहित्य आहे

ड) मिळालेल्या अनुदानाचा कोणकोणत्या बाबीवर किती खर्च झालेल्याचा संपर्ण तपशिल

इ) व्यायाम शाळेचा लाभ घेणा–या विद्यार्थ्यांची नोंद घेतली आहे काय ?

13) 1989 ते 2006 पर्यंत शाळेला किती वेतनेत्तर अनूदान मिळाले. अनुदान मिळण्याचे वर्ष व त्या त्या वर्षात त्या वेतनेत्तर अनुदानाचा कसा विनीयोग केला? त्याचे कॅशबुक, लेजर बुक व ऑडिट बुकच्या छायांकित प्रती.

14) सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत आज पर्यंत मिळालेल्या पैशातून खरेदी केलेल्या साहित्याच्या दुकानातून घेतलेल्या बिलाच्या छायांकित प्रती.

सदरच्या संदर्भामध्ये दि. 1.4.2006 रोजी शुभम बहुउद्येशीय संस्था यांचे अध्यक्ष यांनी अपीलकर्ता यांना उत्तर देतांना अपीलकर्ता यांचे सभासदत्व संस्थेनी दि. 21.11. 1993 च्या सभेत कायमचे रद्य केलेले आहे असे कळविले व त्याचप्रमाणे त्यांच्या संदर्भात सहधर्मदाय आयुक्त नंतर न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याचे कळविले दिसून येते. व ती माहिती आपणास पाठवावयाची असल्यास आपण प्रत्यक्ष शुभम बहुउद्येशीय संस्था वडधामना या संस्थेच्या कार्यालयात दि. 5.4.2006 ला सकाळी 11.00 वाजता प्रत्यक्ष न चुकता उपस्थित राहावे व उपस्थित राहिले नाही तर पुढील उजर एकुन घेण्यास बंधनकारक राहणार नाही. व प्रतिलीपी मुख्याध्यापिका, शिक्षणाधिकारी यांना दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी दि. 10.4.2006 रोजी प्रथम अपील अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केले. परंतु अपीलकर्त्याची मागणी शाळा स्तरावरील असल्याने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत मुख्याध्यापिका स्वामी विवेकानंद हायस्कूल यांना दि. 24.4.2006 नुसार निर्देश देण्यात आले होते. अपीलकर्त्यानी माहितीसाठी रु. 250 मनिऑर्डर संबंधित शाळेत पाठविले. परंतु शाळेनी मनिऑर्डर नाकारली. अपीलकर्त्याच्या

अपीलाच्या अनुषंगाने दि. 10.7.2006 व 7.8.2006 रोजी सुनावणी घेण्यात आली होती. मुख्याध्यापिका यांनी दि. 19.8.2006 रोजी अपीलकर्त्याचे मागणीनुसार एकुण 1 ते 14 मुद्यावरची माहिती शिक्षणाधिकारी कार्यालयास सादर केली त्यानुसार दि. 21.8.2006 रोजी माहिती घेवून जाण्यास कळविण्यात आले. दि. 11.9.2006 रोजी अपीलकर्ता समक्ष शिक्षणाधिकारी कार्यालयात हजर झालेत. व अपीलातील मुद्यानुसार एकुण 117 प्रती प्राप्त केल्यात तशी पोच दिलेली दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील सादर केले.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका हया असल्यामुळे संस्थेच्या अध्यक्षानी अपीलकर्त्यास उत्तर कसे दिले याबद्यल विचारले असता अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संस्थेशी सुध्दा संबंधित होती व त्यामुळे संस्थेची परवानगी परवानगी घेणे आवश्यक होते असे मुख्याध्यापिका यांनी सांगितले. असे असले तरी त्यांना प्रत्यक्ष शाळेत येवून माहिती घेवून जाण्याबद्यल कळविले होते. परंतु ते शाळेत उपस्थित झाले नाही. व मुदतीच्या आधीच प्रथम अपील सादर केले असल्यामुळे शिक्षणाधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पुरविण्यात आली. यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते शाळेत गेले होते परंतु त्यांना माहिती देण्यास नकार दिला व मनिऑर्डरसुध्दा घेतली नव्हती असे त्यांनी सांगितले व म्हणून त्यांनी प्रथम अपील सादर केले होते. या संपूर्ण प्रकरणा मध्ये असे दिसून येते की अपीलकर्ता व संस्था यामध्ये वाद आहे व त्यांच्या मध्ये न्यायालयीन प्रकरणे सुध्दा सुरु आहे. व त्यामुळेच अशा प्रकारची 1995 पासूनची व्यापक माहिती ही अपीलकर्ता यांनी मागितलेली दिसून येते. असे असले तरी त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे नाकारलेले नाही हे पत्रावरुन स्पष्ट दिसून येते व तीच माहिती पुन्हा मुदतीच्या आधी प्रथम अपील केलेले असल्यामुळे शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेली दिसून येते परंतु यावरुनही त्यांना माहिती देण्याचे नाकारलेले आहे असे दिसून येत नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना मुद्या क्र. 7, 8,

9 या संदर्भातील माहिती ही उपलब्ध करुन दिलेली नाही यावर 7 आणि 8 याचा विचार केल्यास ती एकत्रच माहिती असावी असे दिसते. यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांना विचारले असता त्यांनी सांगितले की माहिती ही जुनी 1995 पासूनची असल्यामुळे ती उपलब्ध असेलच असे नाही त्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करणे हा एवढाच मार्ग उरतो. सदरची माहिती शाळा स्तरावर जरी असली तरी एकुणच संस्था व अपीलकर्ता यांचे मधील वादाचे स्वरुप पाहता सदरची तिन मुद्याची माहिती ही अपीलकर्त्यास शिक्षणाधिकारी यांनी शाळा स्तरावरुन उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहिल. वास्तविक संस्थाचालकाच्या मध्ये वाद झाल्यानंतर अशा प्रकारच्या माहिती मागण्याच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराच्या तरतुदीचा वापर करुन शाळेचे मुख्याध्यापिका तथा माहिती अधिकारी यांना त्रस्थ करुन माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीचा गैरवापर करणे योग्य नाही. हा माहितीच्या अधिकाराच्या तरतुदीचा उघड उघड दुरुपयोग आहे. मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहिले असता यात कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक हित आढळुन येत नाही. वैयक्तिक हेवेदावे यातून ही माहिती मागण्याचे स्वरुप दिसून येते. असे असले तरी वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यास माहिती उपलब्ध करुन दिलेलीच असल्यामुळे मुद्या क. 7 ते 9 ची माहिती ही उपलब्ध असल्यास पुरविणेस योग्य राहिल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात असून त्यांचे दि. 23.3.2006 च्या अर्जामधील मुद्या क. 7,8,9 यातील माहिती ही प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचे कडून घेवून अपीलकर्ता यास उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांचे अपील क. 368/2007 हे सारखेच असल्यामुळे ते फेटाळण्यात येत आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 28.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 339/2007.**

1) कु. वैशाली भाऊराव साबळे
ई/64/04 विद्युत विहार कॉलनी
कोराडी, नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर.

2) जन माहिती अधिकारी
वरिष्ठ लेखा अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ती हिने दिनांक 14/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या बद्यल मुख्याधिकारी जिल्हा परिषद यांनी अनुपस्थित राहण्याच्या बद्यल कारण कळविले आहे.

2. अपीलकर्ती हिने दिनांक 24/11/2006 रोजी दि. 30 जुलै 2006 रोजी जिल्हा परिषद नागपूर तर्फे वरिष्ठ सहाय्यक (लेखा) या परिक्षेबाबत व दि. 1 ऑगष्ट 2006 रोजीच्या मुलाखतीबाबत 1) निवड झालेल्या उमेदवाराच्या (शुभा भांडे) अर्जाची प्रत. 2) शुभा भांडे व माझ्या उत्तर पत्रिकेची झेरॉक्स प्रत 3) मुलाखतीच्या वेळेस निवड समितीतील सदस्यांनी दिलेल्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत 4) निवड झालेल्या

उमेदवाराच्या (शुभा भांडे) नेमणुकीच्या आदेशाची प्रत. ही माहिती टपालाद्वारे (नोंदणीकृत) मागितली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.11.2006 रोजी माहिती अधिकारी तथा मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांनी 3 मुद्यांवर उत्तर दिलेले आहेत. सदरच्या उत्तराने व्यथित होवून दि. 9.1.2007 रोजी अपीलकर्ती हिने प्रथम अपील मुख्याधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले होते. सदरच्या अपीलाचा निर्णय दि. 3.2.2007 रोजी दिलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ती हिने द्वितीय अपील सादर केले.

3. अपीलकर्ती हिने माहितीच्या अर्जामध्ये उल्लेख केलेल्या परिक्षेच्या बद्यल दिनांक 11.8.2006 रोजी माहिती मागितलेली होती. त्या संदर्भात दि. 17.8.2006 रोजी उत्तर देण्यात आलेले आहे. पुन्हा 11.10.2006 रोजी माहिती मागितली होती. परंतु अर्जाचे उत्तर दि. 26.10.2006 रोजी देण्यात आलेले आहे. व त्याबद्यल दि. 24.11.2006 ला वर नमुद केल्याप्रमाणे अर्ज हा अपीलकर्ती हिने दाखल केला होता.

4. अपीलकर्ती हिने दि. 24.11.2006 रोजीच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये दिलेले उत्तर हे योग्य असून शासन परिपत्रक दि. 23.6.2006 च्या प्रमाणे असल्यामुळे उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन दिलेले नाही. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेले आहे असे म्हणता येत नाही. मुलाखतीमध्ये निवड समितीच्या सदस्यांनी दिलेले गुण कळविता येतील शुभा भांडे यांचे नियुक्ती आदेशाची छायांकित प्रत देता येईल त्याकरीता रु. 2 प्रती पेज प्रमाणे झेरॉक्स अधिक टपाल खर्चाची रक्कम चलानाद्वारे बॅंकेत भरावी लागेल असेसुध्दा कळविले आहे. सदरची माहिती जरी कळविलेली असली तरी भरणा कसा करावा हे कळविले नसल्यामुळे भरणा केला नाही असे अपीलकर्ती हिने सांगितले. म्हणून प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलात मात्र अपीलकर्ती हिने मागितलेले माहितीच्या संदर्भात निर्णय देवून मुद्या क्र. 1 व 2 चे उत्तर कायम ठेवले आहे. मुद्या क्र. 3 मध्ये पुन्हा कळविले आहे. व पुन्हा मुद्या

क्र. 4 मध्ये माहितीच्या करीता व टपाल खर्च भरणा करावा म्हणून कळविले. प्रथम अपीलाचा निर्णय मिळाला त्यावेळेस द्वितीय अपील दाखल केले त्यामुळे पुढील खर्चाचा भरणा हा केला नाही.

5. द्वितीय अपीलामध्ये पुन्हा अपीलकर्ती हिने निवड झालेल्या उमेदवाराच्या (शुभा भांडे) अर्जाची प्रत तसेच शुभा भांडे व अपीलकर्ती हयांच्या उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत मुलाखतीच्या वेळेस निवड समितीच्या सदस्यानी दिलेल्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत निवड झालेल्या उमेदवाराच्या नेमणुकीच्या आदेशाची प्रत मिळाली नाही म्हणून मागितली आहे. शुभा भांडे यांच्या अर्जाच्या प्रती बद्यल तो कार्यालयीन दस्तऐवज असल्यामुळे देण्यास हरकत नसावी असा युक्तीवाद केला आहे. त्यावर माहिती अधिकारी यांनी तो कार्यालयीन दस्तऐवज असला तरी त्यामध्ये अर्जदाराची वैयक्तिक माहिती असते व त्यामुळे अधिनियमाच्या कलम 8 (त्र) प्रमाणे उपलब्ध करुन देणे योग्य होणार नाही असे सांगितले. उत्तरपत्रिकेच्या प्रतिबाबत उत्तरपत्रिकेत दिलेल्या मुदतीच्या संदर्भात नाकारले असे सांगितले. मुलाखतीच्या वेळेस निवड समितीच्या दिलेल्या गुणपत्रिकेच्या संदर्भामध्ये झेरॉक्स प्रत पाठविली नसली तरी गुण कळविले असल्यामुळे लेखी परिक्षेतील गुणपत्रिकेची प्रत व मुलाखतीतील गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देण्यास हरकत असू नये. द्वितीय अपीलाच्या विनंतीमध्ये कलम 20 च्या तरतूदीप्रमाणे शास्तीची विनंती केलेली असून अप्राप्त माहिती मिळवून देण्याची विनंती केलेली आहे.

5. माहितीच्या अधिकाराच्या अर्जाचे उत्तर प्रथम अपीलाचा निर्णय यांचा एकुण विचार केल्यास माहिती देण्याचे नाकारले नाही किंवा टाळाटाळ करण्यात आलेली नाही. व त्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे शास्ती लादण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. अप्राप्त माहितीपैकी शुभा भांडे यांच्या अर्जाची प्रत ही कशा करीता पाहिजे याकरीता विचारले असता शैक्षणिक पात्रतेच्या संदर्भामध्ये जाणून घ्यावयाचे आहे त्याकरीता हवी आहे असे अपीलकर्ती हिने सांगितले. अपीलकर्ती ही वाणिज्य पदवीधर व शुभा भांडे ही कला पदवीधर आहे व घेतलेली परिक्षा ही लेखा संबंधात असल्यामुळे वाणीज्य

पदवीधरांना प्राधान्य दिला पाहिजे असे जाहिरातीत म्हटलेले आहे. व त्यामुळे शुभा भांडे यांच्या अर्जाची प्रत अपीलकर्ती हिला हवी असे सांगितले. परंतु जाहिरातीचे अवलोकन केले असता त्यात शैक्षणिक पात्रतेच्या बद्यल वाणिज्य पदवीधर अथवा सर्वसाधारण पदवीधर अथवा तिन वर्षाचा लेखा अनुभव अशा प्रकारे अर्हता दिलेली असल्यामुळे कोणताही पदवीधर हा परिक्षेस बसण्यास पात्र होतो असा त्याचा अर्थ होतो. मात्र जाहिरातीत दिलेल्या अटी त्यांनी पूर्ण केलेल्या असल्या पाहिजे. व त्याच्या अर्जामध्ये दिलेली माहिती ही वैयक्तिक माहितीसुध्दा असते व त्यामुळे त्या अर्जाची प्रत देण्यास नकार दिलेला आहे ते योग्य आहे. लेखी परिक्षेतील व मुलाखतीतील दिलेले गुण याबाबतची झेरॉक्स प्रत वर नमुद केल्याप्रमाणे देण्यास हरकत नाही. अपीलकर्ती हिची उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत आता उपलब्ध करुन देणे योग्य नाही परंतु सदरच्या उत्तरपत्रिकेची अवलोकन करु देण्यास हरकत असू नये. शुभा भांडे ही त्रयस्थ्स असल्यामुळे त्यांच्या उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत किंवा अवलोकन करण्यास परवानगी देणे योग्य होणार नाही.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ती हिचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले निर्णय योग्य असले तरी अपीलकर्ती हिस व इतर उमेदवारांना परिक्षेत व मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या संदर्भातील झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ती हिस तिने दिलेल्या लेखी परिक्षेतील उत्तरपत्रिका अवलोकन करण्यास द्यावी. तसेच शुभा भांडे यांच्या नियुक्तीच्या आदेशाची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन द्यावी.

3) वरील निर्णयातील क्र. 1 व 2 मधिल माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी तसेच उत्तरपत्रिकेचे अवलोकन करण्यासाठी अपीलकर्ती हिने माहिती अधिकारी यांना लेखी तारीख कळवावी व विनामुल्य अवलोकन द्यावे.

4) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 29.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 342/2007.**

1) श्री उत्तम नारायण बाहुरे
आठवडी बाजार जवळ मुलचेरा
तह. मुलचेरा जि. गडचिरोली 442707 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग नागपूर

2) जन माहिती अधिकारी
शिक्षणाधिकारी (माध्य.) कार्यालय
जिल्हा परिषद गडचिरोली ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 26/9/2005 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 10/12/2005 रोजी माहितीचा अर्ज हा शिक्षणाधिकारी (माध्य.) गडचिरोली यांच्याकडे करुन खालील 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितली.

1) नेताजी सुभाषचंद्र माध्यमिक विद्यालय, सुंदरनगर येथील मुख्याध्यापक, पर्यवेखक यांनी आपले कार्यालयाला सादर केलेल्या वेळापत्रकानुसार तासीका घेतात किंवा नाही

हयाची आपण तपासणी केली आहे काय? नसल्यास शिक्षण संचालकाचे पत्र क्र. अगाााा/41200/65854/क दि. 3.11.2000 अन्वये सदर कर्तव्यात कसुर करणा–या मुख्याध्यापक/पर्यवेक्षकावर नियमानुसार कारवाई करण्याच्या सुचना संस्थाचालकांना दिल्या आहेत काय? असल्यास आपल्या कार्यालयीन आदेशाच्या सांक्षांकीत प्रती देण्याची कृपा करावी.

2) शासनाने शिक्षणाधिका–याना शाळा भेटीच्या दिलेल्या कार्यक्रमानुसार आपण भेट दिलेल्या शाळांमधून किती शाळांमध्ये मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक अध्यापनाचे कार्य करतात व किंती मुख्याध्यापक हे करीत नाहीत व त्यांच्यावर आपण का कारवाई केली याची माहिती आदेशाच्या संदर्भांकित प्रतिसह दयावी.

3) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयांचे पत्र क्र. अगाशा/422001/6821 दि. 27.7.2001 अन्वये इयत्ता 8 वी ते 10 वी वरील पदवीधर शिक्षकांची जागा रिक्त असल्यास म. खा. बा. कर्मचारी सेवेच्या शर्तीमधील नियमावली 1981/9 प्रमाणे ज्या जागा भरताना इयत्ता 5 वी ते 7 वी वरील कार्यरत शिक्षकाचा विचार करावा. अशा सुचना वन वैभव शिक्षण मंडळास दिल्या आहेत काय? तसेच पदवीधर शिक्षकांना पदोन्नती देतांना, 8 ते 10 वर नवीन शिक्षकांच्या नियुक्तीला करतांना संस्थेने सदर नियमानुसार निवड व नियुक्ती केलेली नाही असे निदर्शनास आलेले आहे. आपण केलेल्या कारवाई बाबत कृपया माहिती द्यावी.

4) सुंदरनगर येथील सहा. शिक्षक जी. ए. हकीम यांना मुख्याध्यापक म्हणून आपल्या कार्यालयाने मान्यता दिलेली आहे. सदर सहा. शिक्षकाला 60 पेक्षा जास्त जेष्ठ सहा. शिक्षकांना डावलून पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदर आदेशाच्या सांक्षांकित प्रती तसेच महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवा शर्ती) यामधील कोणत्या नियमानुसार मान्यता देण्यात आलेली आहे. याबाबतची साक्षांकीत माहितीची प्रत देण्याची कृपा करावी. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे लिहुन दिलेले आहे.

तसेच दि. 10.1.2006 रोजी पुन्हा एक अर्ज करुन माहिती ही खालीलप्रमाणे 11 मुद्यांवर मागितलेली आ

1) महोदय, मी आपल्याकडे नोंदडाकद्वारे एडीआरएच नं.—— दिनांक नुसार नेताजी सुभाषचंद्र महाविद्यालय सुंदरनगर येथील मुख्याध्यापक मा. एस.एम.खराती यांचा आर्थिक गैरव्यवहाराबाबतचे निवेदन सादर केले होते. सदर वृत्त देशोन्नत्ती वृत्तपत्र, तरुणभारत, नवराष्ट्र या वृत्तपत्रातसुध्दा दिनांक अनुक्रमे 11.11.2005, 11.11.2005 व 16.11.2005 ला प्रकाशीत झाालेले होते. सदर आर्थीक गैरव्यवहाराची आपण चौकशी केली असेलच या अपेक्षेने तेथील कर्मचा—यांना न्याय मिळावा.

2) वनवैभव शिक्षण संस्थेच्या अधिनस्त सर्व विद्यालयातील मुख्याध्यापकांना पदोन्नती देतांना लावलेले निकष व संस्थेला मा. शिक्षणाधिकारी (माध्य) गडचिरोली यांनी दिलेल्या मंजूरी आदेशाच्या साक्षांकित प्रती, तसेच मंजूर आदेश ज्या शासन निर्णयाच्या आधारे काढण्यात आला त्या आदेशाच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्यात.

3) नेताची सुभाषचंद्र माध्य. विद्यालय सुंदरनगर येथील मुख्याध्यापकाने आपल्या कार्यालयात सादर केलेल्या (1997 ते 2005) पर्यंतच्या दैनंदिन वेळापत्रकाच्या साक्षांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात.

4) वनवैभव शिक्षण संस्थेअंतर्गत येणा—या पदवीधर शिक्षकांची यादी उपलब्ध करुन द्यावीत.

5) वनवैभव शिक्षण संस्थेअंतर्गत येणा—या विनाअनुदानीत विद्यालयातील प्रभारी मुख्याध्यापकांची यादी मंजूरी आदेशाच्या साक्षांकीत प्रतीसह उपलब्ध करुन द्याल.

6) बी. एड. पदवीका धारण केलेल्या परंतु प्राथमिक शिक्षकांच्या कार्यरत असणा—या ( वनवैभव शिक्षण संस्थेतील सर्व शिक्षकांची यादी त्यांच्या मंजूरी आदेशाच्या सांक्षांकित प्रतीसह उपलब्ध करुन देण्याची कृपा कराल.

7) संस्थाअंतर्गत, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे स्थानांतरण (2000 ते

2005) या कालावधीत कुठे बदली झाली याबाबतची वर्षनिहाय माहीती आपण दिलेल्या मंजूरी आदेशाच्या प्रतिसह (सांक्षांकित) उपलब्ध करुन द्यावी.

8) केंद्र शासनाचा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश 2005 अन्वये माहिती अधिकारी नें. सु. च. विद्यालय सुंदरनगर यांच्याकडे माहिती मागण्याबाबतचे किती अर्ज प्राप्त झाले व त्यांनी किती अर्जाचा माहिती देवून निपटारा केला. याबाबतची माहिती अपीलीय अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन द्यावीत.

9) तसेच मा. मुख्याध्यापक ने.सु.च.माध्य. विद्यालय यांनी आपल्या कार्यालयात सादर केलेल्या माहितीनुसार सन 2001 ते 2005 पर्यंत  एकूण शिक्षण घेणारे (एस.सी कोटयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी) यांची फक्त वर्षनिहाय संस्थेची माहिती प्राप्त करुन द्यावीत.

10) तसेच मा. मुख्याध्यापक ने.सु.च. माध्य. विद्यालय संदरनगर यांनी आतपर्यंत (सन 2000 पासून) एकून घरभाडे भत्याची किती रक्क्म उचल केलेली आहे. याची माहिती पुरविण्याची कृपा करावी.

11) मा. मुख्याध्यापक ने.सु.च.माध्य. विद्यालय सुंदरनगर हे आपल्या कार्यालयात सन 2001, 2002, 2003, 2004, 2005 या वर्षामध्ये ऑन डयुटीवर किती वेळा उपस्थित झाले याची माहिती उपलब्ध करुन दयावीत. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे लिहुन दिलेले आहे.

3. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 7.3.2006 रोजी अर्जदाराचा अर्ज दि. 17.12. 2005, 10.1.2006, 3.2.2006, अपील अर्ज दि. 4.3.2006, कार्यालयीन पत्र दि. 16.2.2006 व कार्यालयीन तार संदेश दि. 20.2.2006 या सर्वांचा संदर्भ देवून पत्र क्र. 5 अन्वये ज्या माहितीची मागणी केली ती नेमकी कोणत्या स्वरुपाची आहे याचा अर्थबोध होवू शकला नाही व ती मोघम स्वरुपाची असल्याचे आपणास कळविण्यात आले. तसेच सदर माहिती ही शाळा स्तरावरील असल्यामुळे आपण ही माहिती संबंधित मुख्याध्यापकाकडून मागवावी असे कळविण्यात आले. आपण पत्र क्र. 1 व 2 अन्वये मागितलेली माहिती ही

शाळा स्तरावरील असल्यामुळे माहितीच्या अधिकारा अंतर्गत आपण शाळेच्या माहिती अधिका–यानी ही माहिती मागविणे आवश्यक आहे. शाळा ही स्वतंत्र घटक असून खाजगी शाळेकरीता सहाय्यक माहिती अधिकारी/माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी हे शाळा संस्था स्तरावर नियुक्त करण्यात आलेले आहे. आपणास सदर माहिती शाळा स्तरावरील माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त करणे आवश्यक आहे माहिती अधिकारी मुख्याध्यापक यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्यास अपीलीय अधिकारी संस्था सचिव/अध्यक्ष यांचेकडे अपील करावे. आपले संदर्भिय पत्र दिनांक 17. 12.2005 अन्वये आपण क्र. 1 ते 3 मुद्याबाबत शिक्षणाधिकारी यांना प्रश्न विचारुन शिक्षणाधिका–यानी कोणती कारवाई केली अशी विचारणा केलेली आहे. तसेच संदर्भिय पत्र क्र. 10.1.2006 अन्वये मागितलेली माहिती ही पूर्णपणे शाळा संस्था स्तरावरील आहे त्यामुळे आपण सदर मुख्याध्यापक माहिती अधिकारी यांचेकडून मागवणे अपेक्षित आहे. त्यानुसार आपणास या कार्यालयाचे दि. 16.2.2006 चे पत्रानुसार कळविण्यात आलेले आहे. तथापी आपण माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहा असे दि. 3.2.2006 चे पत्रा नुसार कळविले आहे व दि. 3.2.2006 ला या कार्यालयास अपील अर्ज दाखल केला आहे. अपीलाबाबत संस्था सचिव यांना करणे आवश्यक आहे सबब आपणास कळविण्यात येत आहे. आपणास पुनश्च कळविण्यात येते की या कार्यालयाशी संबंधित माहिती आवश्यक असल्यास त्यानुसार आपण अर्ज करावा त्यानुसार आपणास माहिती पुरविण्यात येईल. शाळेच्या स्तरावरील माहिती करीता मुख्याध्यापक/माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले होते.

4. सदरच्या पत्राच्या पुर्वी कळवून सुध्दा दि. 6.3.2006 रोजी शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 29 मार्च 2006 रोजी दिनांक 3.4.2006 ला सुनावणी ठेवण्यात आली होती. पुन्हा दि. 8.5.2006 रोजी ठेवण्यात आली होती. सुनावणीस अपीलकर्ता हजर होते. सुनावणीस

शिक्षणाधिकारी हजर नव्हते. नियमानुसार तात्काळ माहिती पुरविण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा असे शिक्षणाधिकारी यांना कळवून प्रतिलिपी अपीलकर्ता यांना पाठविलेली दिसून येत आहे. दि. 1.12.2006 रोजी शिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापक नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कुल यांना त्यांनी केलेले माहितीच्या अर्जाच्या संदर्भात पत्र लिहिलेले दिसून येते. त्याची प्रतिलिपी अपीलकर्ता व सौ. शशिकला उत्तम बाहुरे यांना दिलेली दिसून येते. सदरचे पत्र हे अपीलकर्त्यानी दि. 18.9.2006 व 25.10.2006 रोजी केलेल्या अर्ज किंवा अपील यांच्या संदर्भात दिसून येते. पुन्हा राज्य माहिती आयोगाकडील अपील क्र. 2006/213/02 यामध्ये सुध्दा दि. 26.12. 2005 च्या अर्जाच्या संदर्भात द्वितीय अपीलाची सुनावणी होवून मुख्याध्यापक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार योग्य ती माहिती द्यावी असा निर्णय झालेला दिसून येतो. तसेच पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र. 2006/526/02, 2006/527/02, 2006/528/02 व 2006/529/02 अपीलकर्ता उत्तर नारायण बाहुरे विरुध्द 1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर विभाग नागपूर

2) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी माध्य. जिल्हा परिषद गडचिरोली

3) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक महात्मा ज्योतिबा फुले माध्य. विद्यालय आष्टी

4) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक रविंद्रनाथ टागोर माध्यमिक विद्यालय, भवनीपूर ता. मुलचेरा

5) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक शहिद बाबुराव शेडमाके माध्यमिक विद्यालय, मुलचेरा

6) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य नेताजी सुभाषचंद्र बोस विज्ञान महाविद्यालय मुलचेरा यांचेकडे केलेल्या अर्जातील संदर्भात निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या

निर्णयामध्ये संस्थेचे सचिव तसेच मुख्याध्यापक यांचे म्हणण्यानुसार अपीलकर्ते हे त्यांचे शाळेतील निलंबित शिक्षक असल्याने माहितीचा अधिकार अधिनियमाबद्यल आवश्यक व अनावश्यक अशी माहिती मागित राहून त्रास देण्याचा प्रयत्न करतात. माहिती मागतांना हक्काच्या जाणीवबाबत विवके व संयम हवाच अशा प्रकारचा निर्णय देवून पुढील आठवडयातील अर्जातील प्रत्येक शाळेतील रेकॉर्ड पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याच्या तारखा ठेवण्यात आल्या व त्यानुसार अर्जदाराला शाळेमध्ये ज्या पध्दतीने रेकॉर्ड ठेवला जात असे त्या पध्दतीप्रमाणे त्यातील माहितीच्या प्रती लगेच अर्जदारास त्याच दिवशी उपलब्ध करुन देण्यात याव्या असे ठरविण्यात आले व अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला आहे. सदरचा निर्णय दि. 11.12.2006 रोजी देण्यात आलेला आहे.

5. अर्जदाराने जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांचेकडे जी माहिती मागितली होती ती माहिती शाळा स्तरावरील आहे असे कळवूनसुध्दा व तशाच प्रकारची माहिती ही थोडयाफार फरकानी मुख्य माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग यांनी निकाली काढलेल्या अपीलामध्ये होती व त्या निर्णयातसुध्दा माहिती शाळा स्तरावरुन उपलब्ध करुन घ्यावी असे निर्णय दिलेले असूनसुध्दा अपीलकर्त्यांनी पुन्हा शिक्षणाधिकारी व उपसंचालक यांचेकडे अर्ज व अपील केलेले दिसून येतात. शाळा स्तरावरील माहिती असूनसुध्दा व तशी जाणीव त्यांना करुन दिली असतांनासुध्दा त्यांनी पुन्हा शाळा स्तरावर माहिती न मागता राज्य माहिती आयोगाकडे पुन्हा द्वितीय अपील सादर केले. आजच अपीलकर्ता यांचे चार अपीले राज्य माहिती आयोगाकडे सुनावणीकरीता आहे. सर्व चारही अपीलांमध्ये थोडयाफार फरकानी अशा प्रकारची वस्तस्थिती आहे. यावरुन राज्य माहिती आयोगानी दि. 11.12.2006 रोजी दिलेल्या निर्णयामध्ये जी वस्तुस्थिती नमुद केलेली आहे ती संस्थेचे सचिव तसेच मुख्याध्यापक यांच्या म्हणण्यानुसार अपीलकर्ते हे निलंबित शिक्षक असल्याने माहितीचा अधिकार

अधिनियमाबद्यल आवश्यक अनावश्यक अशी माहिती मागत राहून त्रास देण्याचा प्रयत्न करतात. यास पुष्टी मिळते. अपीलकर्ता यांचे म्हणण्यानुसार अन्याय झालाही असेल परंतु त्यांचेवर झालेल्या अन्यायाच्या परिमार्जनार्थ माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे अनेक वेगवेगळया प्रकारचे अर्ज करुन अन्यायाशी संबंधित नसलेलीसुध्दा माहिती मागणे हा मार्ग नाही. आणि अशा प्रकारे माहितीच्या अधिकाराच्या तरतुदींचा वापर करणे हे गैर आहे व तसे अपेक्षितसुध्दा नाही. त्यामुळे सदरच्या अपीलाच्या संदर्भातसुध्दा ही माहिती शाळास्तरावर आहे ती संपूर्ण माहिती त्यांनी शाळा स्तरावरच शाळेचे माहिती अधिकारी मुख्याध्यापक व प्रथम अपीलीय अधिकारी संस्थेचे सचिव यांचेकडे मागणे नियमानुसार राहिल. ज्या सार्वजनिक प्राधिकरणात माहिती उपलब्ध नाही व ती जाणीव करुन देवून सुध्दा पुन्हा तीच माहिती त्याच त्याच सार्वजनिक प्राधिकरणाकडे मागणे हासुध्दा माहितीच्या अधिकाराच्या तरतुदींचा गैरवापर आहे त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांनी दि. 7.3.2006 च्या सविस्तर उत्तरामध्ये कळविल्याप्रमाणे माहिती ही शाळा स्तरावरुन उपलब्ध करुन घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 29.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 344/2007.**

1) श्री रामराव भुराजी ठाकरे
रा. प्लॉट नं. 11, राधाकृष्ण मंदिराच्या मागे,
हुडकेश्वर रोड, पो. म्हाळणीनगर, नागपूर 24 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री पी. डी. करवंदे, अपर जिल्हाधिकारी,
नागपूर

2) जन माहिती अधिकारी
श्री एम. आर. चव्हाण तहसीलदार काटोल ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 9/8/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलामध्ये ''प्रथम अपीलाचा दिनांक 9.6.2006 असल्यामुळे सुनावणीस 45 दिवस दि. 23.6.2006 व 23.7.2006 ते 21.8.2006 याप्रमाणे 90 दिवस वरील अनु. क्र. 4 मध्ये नमुद केल्याप्रमाणे अपीलीय अधिकारी श्री पी. डी. करवंदे अपर जिल्हाधिकारी नागपूर उक्त अपीलात कोणतीही सुनावणी केली नाही. उक्त निर्देशीत अपील अर्ज प्रत सोबत यासाठी सलग्न करण्यात आली आहे. आपणाद्वारे या प्रकरणाची रितसर सुनावणी करण्यासाठी व अर्जदाराचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत माहिती प्राप्त करण्या हेतू व उद्येश सफल व्हावा.

सहपत्र – 1) मुळ अर्ज, 2) तहसिलदार यांचे उत्तर 3) प्रथम अपील प्रपत्र 4) दैनीक लोकमत 6 सोमवार दि. 17 जुलै 2006 चे कात्रण 5) महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक दि. 16 जुन 2006 चे. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार. हव्या असलेल्या माहितीचे स्वरुप आणि विषय – शेतीविषयी व त्या संबंधाने. माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित आहे त्याचे नाव – तहसिल कार्यालय काटोल जि. नागपूर. प्रत 1) मा. ॲड. राम आकरे भ्रष्टाचार निर्मुलन समिती नागपूर. अपील मेमोसोबत सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दि. 16 जुन 2005 चे जोडलेले आहे. लोकमत 6 सोमवार दि. 17 जुलै 2006 कात्रण जोडलेले आहे. प्रथम अपील दि. 20.4.2006 चे जोडलेले आहे. त्यात दि. 9.3.2006 चा अर्ज विचारलेली माहिती अजुन पर्यंत मिळाली नाही असे लिहिलेले आहे. 9.3.2006 चा अर्ज जोडलेला आहे. सुनावणीस सुरुवात करतांना त्या अर्जाच्या संदर्भात माहिती विचारली असता ती माहिती अपीलकर्ता यास मिळाली असे त्यांनी सांगितले. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सदरचे अपील हे वेगळया अर्जाच्या संदर्भात आहे व तो अर्ज त्यांच्या फाईल मध्ये आहे. अपीलकर्ता यांस दिनांक 31.7.2007 रोजी सदरच्या अर्जाची सुनावणीची नोटिस काढली होती. आज अपीलाच्या सुनावणीपूर्वी किंवा दि. 31.7.2007 च्या दरम्यान अपीलकर्ता यांनी नोटिसीच्या पृष्ठभागावरती दिलेल्या सुचनांप्रमाणे अपील मेमोसोबत कागदपत्र व्यवस्थित दाखल केले आहेत किंवा नाही याचीसुध्दा खातरजमा करुन तपासणी केली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना कोणत्या अर्जाच्या/अपीलाच्या निर्णयाच्या विरुध्द प्रथम अपील दाखल केले आहे व द्वितीय अपील दाखल केले आहे हे शोधुन काढायला आयोगाला अर्धा तास लागला. तरीही आकलन झाले नाही, अपीलकर्ता हे उशिरा आले. अपीलकर्ता जोपर्यंत आले नाही तोपर्यंत कोणत्याही प्रकारचा संदर्भ लागत नव्हता. अशा प्रकारे द्वितीय अपीले जर अपीलकर्ता दाखल करीत असतील तर त्याकरीता माहितीच्या अधिकारातील चळवळीतील कार्यकर्त्यांनी सदरचे अपीलांचे निर्णय कशा प्रकारे द्यावे याबद्यलचे मार्गदर्शन करणे योग्य राहिल. हा निर्णय देईपर्यंत सुध्दा माहिती अधिकारी व प्रथम

अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या कोणत्या अर्जाच्या संदर्भामध्ये द्वितीय अपील दाखल केलेले आहे त्यांची माहिती होवू शकत नाही. माहिती अधिकारी हे काटोल वरुन आलेले आहेत. अपीलकर्ता अनेक अर्ज नेहमीच करीत असतात. अपीलकर्ता यांचे अर्ज शोधायचे म्हटले तर त्यांना पुन्हा काटोलला जावे लागेल. आयोगानी काढलेल्या द्वितीय अपीलाच्या नोटिसप्रमाणे उत्तरवादी यांना अपील मेमोची प्रत पाठविली आणि ती सुध्दा अपीलकर्ता करीत नाहीत तर ती आयोगाच्या कार्यालयाला झेरॉक्स करुन पाठवावी लागते. त्यातही कोणत्याच प्रकारच्या माहितीच्या अर्जाचा/प्रथम अपीलाच्या निर्णयाचा उल्लेख नसल्यामुळे कोणताही संदर्भ लागू शकत नाही. आज अपीलकर्ता म्हणतात त्या अर्जाच्या संदर्भात सुनावणी घ्यावयाची असली तरी माहिती अधिकारी यांच्याकडे सदरचा अर्ज या ठिकाणी या वेळेस उपलब्ध नाही प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे माहिती अथवा कागदपत्रे नाहीत व त्यामुळे त्याबाबत काय कार्यवाही झाली याबद्यलची माहिती ते सांगू शकणार नाही. अपीलकर्त्यास मुदत देणे योगय होणार नाही कारण प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांना पुन्हा अपीलकर्त्याच्या बेजबाबदारपणा मुळे पुन्हा कार्यालयानी कामे सोडून प्रकरणाकरीता मागे लागणार. अशाप्रकारे अनेक अर्ज करणारे अपीलकर्ते हे कोणत्याही अपीलमेमो बरोबर कोणतेही कागदपत्रे जोडत असतात व हा अनुभव पुर्वीसुध्दा अने अपीलांमध्ये आलेला आहे व त्यामुळे आयोगाचा सुध्दा विनाकारण वेळ हा कागदपत्रांची छाननी करण्यात आत असतो. अशा परिस्थितीत अपीलकर्ता यांचे अपील क. 344/2007 हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता यांच्या अपील मेमोमध्ये माहितीच्या अर्जाचा प्रथम अपीलाच्या निर्णयाचा कोणताही उल्लेख नसल्यामुळे व अपील मेमोसोबत दाखल केलेले माहितीचा अर्ज हा सदरच्या अपील मेमोच्या संदर्भात नाही असे अपीलकर्ता यांनीच सांगितल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 30.8.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 370/2007 व 371/2007.**

1) श्री ज्ञानेश्वर जानबाजी वांढरे
मु. पो. अजनी ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यपालन अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर

2) जन माहिती अधिकारी
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती कामठी ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17/8/2006 रोजी कक्ष अधिकारी सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत द्वितीय अपील सादर केले होते. त्याचप्रमाणे दि. 4.10.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे तेच द्वितीय अपील पुन्हा दाखल केले आहे. सदरच्या दोनही अपीला मधिल मागणी व विनंती एकच आहे. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 31/3/2006 रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केला हाता. सदरच्या अर्जामध्ये 3 मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. विहीत मुदतीत सदरची माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. 25.4.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलामध्ये पुन्हा 3 मुद्ये नमुद करुन माहिती मागितलेली होती. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय दि. 15.6.2006 रोजी देण्यात आलेला असून सदरचा

निर्णय हा खालीलप्रमाणे आहे.

आज दि. 15.6.2006 ला अपील सुनावणी घेण्यात आली. अर्जदार : श्री ज्ञानेश्वर वांढरे हजर होते. प्रथम माहिती अधिकारी श्री इंगळे ग्रामसेवक हजर होते. प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री तडस खंड विकास अधिकारी हजर होते.

अर्जदाराने मागितलेल्या 5 मुद्यावरील चर्चा करुन कागदपत्राची व अभिलेखाची तपासणी करण्यात आली.

अर्जदाराने मागितलेल्या 4 मुद्यावरील माहिती यापूर्वीच माहिती अधिकारी श्री इंगळे यांनी पुरविलेली आहे. मुद्या क्र. 5 – 4 अ मधील प्लॉट धारकाची यादी अर्जदारास मिळालेली नाही. करीता श्री इंगळे ग्रा. से. माहिती अधिकारी यांनी प्लॉट धारकाची यादी मिळण्याबाबत चक्रेश हाउसिंग सोसायटीला 7 दिवसाचे आंत मागविण्याबाबत कळवावे.

असे सर्वानुमते ठरले.

खाली अपीलकर्ता व सर्व अधिका–यांच्या मान्यतेच्या सहया आहेत.

3. सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी सदरची दोनही द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता यांनी दि. 31.3.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. परंतु सदरच्या संदर्भातील माहिती उपलब्ध कां करुन दिली नाही असे माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या अन्वये सदरची माहिती मागितलेली होती व त्यांना सदरची माहिती ही दि. 6.6.2005 रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून त्यांची विनंती मान्य करण्यात आली होती. तसेच पुन्हा दि. 3. 8.2005 रोजी संबंधित माहिती अपीलाच्या माहितीची पूर्तता झाल्यामुळे अपील प्रकरण नस्तीबध्द करण्यात येत आहे असा निर्णय दिला होता. व त्यामुळे त्यांचे दि. 31.3.2006 च्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती पुन्हा देण्याचे कारण नाही असे सांगितले. त्यातही

सदरच्या अर्जातील मुद्यांचे अवलोकन केले असता उत्तरवादी यांच्या कडून असे सांगण्यात आले की त्यांनी ज्या स्वरुपात माहिती मागितलेली आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे अपेक्षित नाही. असे असले तरी प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अर्जदार हे हजर होते. वर प्रथम अपीलाचा निर्णय नमुद केला आहे. त्यात अपीलकर्ता यांना सुध्दा तो निर्णय मान्य असल्यामुळे त्यांनी त्या वरती सही केलेली आहे. आता मात्र सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये त्यांना तो निर्णय मान्य नाही असे कथन त्यांनी केले. जर त्यांना तो निर्णय मान्य नव्हता तर त्यांनी सही करावयास नको होती. सदरच्या अर्जातील मुद्यांमध्ये इंगळे ग्रामसेवक अजनी यांच्या बद्यल सुध्दा त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये ग्रामसेवक अजनी श्री इंगळे यांची सुध्दा सही आहे. याचा अर्थ ते अपीलाच्या सुनावणीस हजर होते व त्याच वेळेस अपीलकर्ता यांनी हरकत घेवून वर नमुद केल्याप्रमाणे प्रथम अपीलाच्या त्या निर्णयास हरकत घ्यावयास पाहिजे होती. त्याप्रमाणे दि. 17.6.2006 रोजी ग्रामपंचायत अजनी पंचायत समिती कामठी चक्रेश हाउसिंग एजन्सी यांना पत्र लिहुन प्लाटधारकांची माहिती मागितली. ती प्लॉटधारकांची माहिती दि. 26.6.2006 रोजी चक्रेश हाउसिंग एजन्सी यांनी अपीलीय अधिकारी व माहिती अधिकारी यांना कळविले व त्याप्रमाणे सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना पुरविण्यात आली आहे. सदरच्या माहिती पुरवण्याच्या संदर्भामध्ये स्पिड पोष्टनी कळविण्यात आलेली आहे.

4. माहितीच्या अधिकाराच्या अर्जाच्या संदर्भामध्ये प्रथम अपील केल्याच्या नंतर त्या प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये जरी आदेश झालेला असेल आणि तो आदेश जर अपीलकर्ता यांना मान्य असला तर द्वितीय अपील करण्याचे कारण उरत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मध्ये जे न्याय मिळवून घेण्याकरीता स्तर करण्यात आलेले आहे त्याचा उद्येश हा अपीलकर्त्यास साधारण त्याच सार्वजनिक प्राधिकरणामध्ये माहिती उपलब्ध व्हावी या उद्येशानेच तयार करण्यात आलेले आहे त्यामुळे माहिती

मिळाली नाही तर त्या माहिती अधिका–याच्या वरिष्ठ अधिका–याकडे प्रथम अपील करुन माहिती मिळवून घेणे जेणेकरुन आयोगाकडे द्वितीय अपील सादर करण्याचा प्रसंग येणार नाही. सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांना महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002च्या अंतर्गत माहिती मिळालेलीच होती. मिळालेल्या माहितीतूनच ते नविन नविन प्रश्न उपस्थित करुन माहिती मागतात असे दिसते. त्यामुळे त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांना संपूर्ण माहिती आता पर्यंत मिळालेली असल्यामुळे व प्रथम अपीलामध्येच त्यांनी हे सर्व मान्य केलेले असल्यामुळे सदरची द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलाप्रमाणे पुन्हा पुन्हा त्यांनी अपीले त्याच त्याच मुद्यांवर आयोगाकडे दाखल केले नाही तर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचे पालन होईल असे म्हणयला हरकत नाही. त्यामुळे त्यांचे दुसरे अपील क्र. 371/2007 हे सुध्दा खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस दि. 15.6.2006 रोजी संपूर्ण माहिती मिळालेली आहे हे त्यांनी मान्य केलेले असल्यामुळे व त्यांची दोनही अपीले ही एकाच अर्जाच्या संदर्भात असल्यामुळे दोनही अपीले निकाली काढयात येत आहेत.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 30.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 348/2007.**

1) श्री वामण शंकर राणे
मु. पो. हरणखेड ता. मलकापूर
जि. बुलढाणा 443101 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी, मलकापूर
ता. मलकापूर जि. बुलडाणा

2) जन माहिती अधिकारी
तालुका कृषी अधिकारी, मलकापूर
ता. मलकापूर जि. बुलडाणा ..... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27/1/2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत द्वितीय अपील सादर केले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. तालुका कृषी अधिकारी मलकापूर या कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. आयोगाच्या कार्यालयाची नोटिस दि. 31.7.2007 रोजी काढण्यात आली होती. ज्याअर्थी अपीलकर्ता यांना नोटिस मिळाली होती त्याअर्थी उत्तरवादी यांना सुध्दा नोटिस मिळाली असावी असे गृहित धरण्यास हरकत नाही. परंतु कोणत्याही प्रकारचे अनुमतीविना ते आज गैरहजर आहते हा आयोगाचा अवमान आहे व त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 3/11/2006 रोजी माहितीच्या अर्जामध्ये खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

(अ) 1) विषयानुसार तालुक्यात यावर्षी नुकसान झालेल्या शेतीसंबंधी प्राप्त अनुदान रुपये (रक्कम) 2) 21 ऑक्टोबर 2006 पर्यंत वाटप करण्यात आलेली रक्कम रुपये (प्राप्त रक्कम व वाटप करण्यात आलेली रक्कम हयाचा प्रतिशत) प्रत्यक्ष लाभार्थ्यांना प्राप्त झालेली रक्कम दर्शविण्यात यावी. कागदावर वाटप करण्यात आलेल्या रकमेचा समावेश नसावा. 3) मौजे हरणखेड मौजे चिंचखेड ''ब'' मौजे वडजी यथील यावर्षी अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेती संबंधी अनुदानाचे वाटप नमुना प्रमाणे. अनु. क्रमांक–लाभार्थीचे नाव व पत्ता–अनुदान/लाभ यांची रक्कम/स्वरुप–निवड पात्रतेचे निकष–अभिप्राय.

(ब) माहितीचा अधिकारचे (कलम 4 (1) (ख) (पंधरा)) मलकापूर येथील तालुका कृषि अधिकारी हयांचे कार्यालयात उपलब्ध सुविधांच्या तक्ता प्रकाशित करणे. उपलब्ध सुविधा 1) भेटण्याच्या वेळा संदर्भात माहिती 2) वेबसाईट विषयी माहिती 3) कॉलसेंटर विषयी माहिती 4) अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध सुविधांची माहिती 5) कामाच्या तपासणीसाठी उपलब्ध सुविधाची माहिती 6) नमुने मिळण्याबाबत उपलब्ध माहिती 7) सूचना फलकाची माहिती 8) ग्रंथलय विषयी माहिती. अनु.क्र. – सुविधेचा प्रकार – वेळ – कार्यपध्दती – ठिकाण – जबाबदार व्यक्ती/कर्मचारी – तक्रार निवारण.

(क) माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे (कलम 4 (1) (ख)) अनुसार प्राप्त निर्देशित केल्याप्रमाणे 17 बाबी (मॅन्युअल्स), अभिलेखे, दस्तऐवज हयांचे मला आपले कार्यालयात निरीक्षण करावयाचे आहे. करिता हयाबाबतचा माझा अधिकार सुसाध्य होणेसाठी संबंधित अधिका–याचे नांव, पत्ता व वेळा टेलीफोन नंबर इत्यादि माझ्या दिलेल्या पत्तयावर मला कळविण्यात यावे ही विनंती. सदरची माहिती ही प्रत्यक्ष घेवून जाण्यास तयार आहे व शुल्क भरण्यास तयार आहे असे अपीलकर्ता यांनी नमुद केलेले होते.

3. असे असले तरी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून दि. 11.12.2006 रोजी अपीलकर्ता यांनी पुन्हा प्रथम अपील तालुका कृषी अधिकारी मलकापूर यांचेकडे दाखल केले होते. सदरच्या अपीलाचीसुध्दा सुनावणी घेतली नाही. व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार त्यांनी केलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती विहीत मुदतीत उपलब्ध करुन न दिल्यामुळे माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे ते शास्तीस पात्र होवू शकतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा कोणत्याही प्रकारचे अपीलाच्या सुनावणीबद्यल पत्रव्यवहार न करता किंवा अपीलाची सुनावणीसुध्दा घेतली नाही त्यामुळे सुध्दा त्यांनी सदरच्या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते. व त्याबाबत ते सुध्दा दोषी आहेत.

## न र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील मंजुर करण्यात येत असून तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथील जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक 3.11.2006 रोजीच्या अर्जात मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्या पासून 15 दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी निकाल मिळाल्यापासून 10 दिवसात करावयाचा आहे.

3) त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये (ब) व (क) मध्ये निदर्शनास आणलेली अधिनियमाच्या कलम 4 प्रमाणे कारवाई तातडीने करण्यात यावे. ती न केल्यास पुन्हा माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे शास्तीस पात्र राहतील.

4) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नसल्यामुळे व निर्णय दिला नसल्यामुळे त्यांनीसुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द त्यांचे सेवानियमा प्रमाणे कारवाई करण्यास जिल्हा कृषि अधिकारी यांचेकडे शिफारस कां करण्यात येवू नये याचा खुलासा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसांत करावा.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 30.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 350/2007.**

1) श्री अशोक शंकरराव मेंढे
''तारामय'' 900 बुध्दनगर, डॉ आंबेडकर मार्ग
नागपूर 440017 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

2) जन माहिती अधिकारी
अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय, मुंबई 32. ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी सदरच्या अपीलाच्या संदर्भात कागदपत्रे दाखल केली असून सुनावणीस हजर राहता येत नाही असे कळवून अपीलाचा निर्णय करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 4.11.2006 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे एकुण 4 मुद्यांवर माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. व ते खालीलप्रमाणे –

(1) दि. 15.4.1994 च्या अधिसूचनेतील नियम 07 मध्ये नमूद करण्यात आलेली 'व्यावसायिक परिक्षा' कोणती.

(2) सार्वजनिक बांधकाम व गृहनिर्माण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी कनिष्ठ लिपीकांकरीता प्रशिक्षण व परिक्षा या विषयाच्या अनुषंगाने दि. 5.11.1979 रोजी टिएसई–1079/32732/(788)/का–19 या क्रमांकाने निर्गमित पत्र शासन निर्णय, शासन आदेश, शासन परिपत्रक, शासकिय अधिसूचना यापैकी कुठल्या प्रकारात मोडते.

(3) कनिष्ठ लिपीकांच्या सेवाप्रवेशोत्तर परिक्षा बाबतचे नियम हे महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिके (सहावी आवृत्ती) सन 1984 तील परिशिष्ट 03 मध्ये नमूद असल्याचे आपण कळविले आहे. त्याचप्रमाणे सार्वजनिक बांधकाम व गृहनिर्माण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क. टिएसई–1079/32732/(788)/का–19 दि. 5.11.1979 चा या नियमावलीत समावेश करण्यात आला आहे का?

(3) (ब) नसल्यास त्याची कारणे कोणती.

(4) उपरोक्त (3) मध्ये नमूद पुस्तिकेतील प्रत्येक बाबींना, परिशिष्टांना परिच्छेदाचा आधार/संदर्भ देण्यात आला आहे. याच पुस्तिकेतील परिशिष्ट 03 ला परिच्छेद 56 चा आधार देण्यात आला आहे. मात्र याच पुस्तिकेतून परिच्छेद 56 हा वगळण्यात आला असून पान क. 25 वर तसा स्पष्ट उल्लेख आहे. हे लक्षात घेता परिशिष्ट 3 ची वैधता ग्राहय ठरत नाही, हे बरोबर आहे काय?

(4) (ब) परिच्छेदाशिवाय परिशिष्ट वैध ठरविण्याचा आधार काय?

सदरची माहिती ही टपालाद्वारे घेणार असेही त्यांनी मान्य केले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी दि. 16 नोव्हेंबर/6.12.2006 स्पिड पोष्टाने अपीलकर्ता यांस चारही मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या उत्तराने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 16.12.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 17.1.2007 रोजी देण्यात आला होता. परंतु या निर्णयाने सुध्दा व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्या प्रमाणे माहितीच्या अर्जामध्ये जी माहिती मागितलेली आहे ती माहिती त्यांनी प्रश्नाच्या स्वरुपामध्ये मागितलेली आहे. तरीसुध्दा माहिती अधिकारी यांनी दि. 6.12.2006 रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती ही अपीलकर्ता यांनी टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे दि. 22.11.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी टपाल खर्चाची रक्कम भरण्या बाबत पत्र अपीलकर्ता यांना दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दि. 6.12.2006 रोजी मनिऑर्डर द्वारे टपाल खर्चाची रक्कमही भरली व त्यामुळे त्यांना दि. 6.12.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे सदरची माहिती त्यांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये द्वितीय अपीलामध्ये पुन्हा प्रश्न विचारुन माहितीत विचारलेल्या परिपत्रकाच्या वैधतेबद्यल माहिती विचारलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) प्रमाणे ''माहिती'' हया संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे माहिती ही असेल त्या स्वरुपामध्ये, अभिलेख्याच्या स्वरुपामध्ये ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकारे अभिप्राय, अभिमत व्यक्त होईल असे प्रश्न विचारुन माहिती पुरविणे अपेक्षित नाही. जी माहिती उपलब्ध होईल त्या माहितीच्या आधारे अपीलकर्त्यास योग्य त्या प्राधिकरणाकडे प्रश्न उपस्थित करुन दाद मागून घेता येईल. त्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील परिच्छेद 56 जरी वगळण्यात आला तरी सुध्दा नियमावली वर किंवा कोणत्याही तरतुदींवर तसा परिणाम होत नसतो. कोणताही नियम, परिच्देद किंवा परिशिष्ट हे सुधारीत करण्याचा अधिकार हा शासनाचा कायम असतो त्यामुळे त्याबाबतचा कोणताही प्रश्न हया माहितीच्या अधिकारात अपेक्षित नाही. प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा विहित मुदतीत दिलेला आहे. अपीलकर्त्यानी विचारलेली माहिती व त्यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती याचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांस योग्य ती माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व ती योग्य व बरोबर असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 31.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 353 / 2007.**

1) श्री राजू रामाजी राहूलकर
शेठ प्रताप वार्ड, गर्ल्स कॉलेज रोड,
गजानन स्टोअर्स के सामने, गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार गोंदिया, ता. जि. गोंदिया

2) जन माहिती अधिकारी
तहसिलदार गोंदिया, ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 14 / 2 / 2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 26.9.2006 रोजी श्रीमती केशरबाई नागपूरे, रेशन दुकानदार यांनी दि. 8.9.2006 रोजी रावणवाडी गोडावून येथून 41 क्वींटल बी.पी.एल.चे तांदूळ उचल करुन रेशन दुकान देवरीला न देता इतर ठिकाणी विक्री केली. दुकानास तहसिलदार, नायब तहसिलदार यांनी 16.9.2006 ला भेट दिली. त्या प्रकरणाचे संपूर्ण केलेली कारवाईचे आदेश, नोटींग अधिकारपत्र, माहिती पुरविण्याबाबद. माहिती व्यक्तीशः घेणार. अशाप्रकारे माहिती मागितली होती. सदरची माहिती विहित मुदतीत न

मिळाल्यामुळे दि. 14.11.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय न झाल्यामुळे द्वितीय अपील अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दि. 26.9.2006 रोजी दाखल केलेल्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही असे उत्तरवादी यांनी सांगितले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतर संबंधित अन्न खात्याकडून श्रीयुत पारधी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने दि. 26.11.2006 रोजी तहसिलदार गोंदिया म्हणून पत्र दिले होते. तसेच दि. 11.12.2006 रोजी पुन्हा पत्र दिलेले होते. पुन्हा दि. 9.4.2007 रोजी पत्र देवून माहिती मागितली होती. पुन्हा दि. 14.5.2007 रोजी पत्र दिले होते. त्याला कारण दि. 7.3.2007 रोजी माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी अपीलकर्ता यास माहिती दिली याबद्यल तहसिलदार यांना कळविले नव्हते. अशा प्रकारे माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी विलंबाचा मुद्या हा कायम राहातो. व त्यामुळे दि. 26.9.2006 च्या अर्जावर तत्कालीन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली दिसून येत नसल्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे दोषी आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ज्या अन्न विभागातील अधिका–याकडून, कर्मचा–याकडून माहिती मागितली व त्यांनी ती वेळेत दिली नाही ते सुध्दा कलम 20 प्रमाणे दोषी आहेत. त्यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे माहिती अधिकारी समजून ते शास्तीस पात्र होवू शकतात.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना माहिती ही मिळालेली असली तरी अंशतः त्यांचे अपील मंजूर करण्यात येत आहे.

2) तत्कालीन माहिती अधिकारी यांनी दि. 26.9.2006 च्या अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे त्यांची विभागीय चौकशी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

3) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांनी ज्या ज्या कर्मचा–याकडून माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सहाय्य घेतले असेल त्या कर्मचा–याना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे माहिती अधिकारी समजून त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे त्यांची विभागीय चौकशी तहसिलदार गोंदिया यांनी करावी व तशा प्रकारचा अहवाल आयोगास सादर करावा. तत्कालीन माहिती अधिकारी यांची बदली झालेली असली तरी त्यांचे बाबत जिल्हाधिकारी गोंदिया यांनी विभागीय चौकशीचा अहवाल हा आयोगास सादर करण्यात यावा. सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी गोंदिया यांना कार्यवाही करीता पोष्टाने पाठविण्यात यावा.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

5) जिल्हाधिकारी गोंदिया यांना सदरचे निर्णयाची प्रत पोष्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

नागपूर

दिनांक 31.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 374/2007.**

1) श्री फैयाद अहमद वल्द मुख्तार अहमद
शिव पंचायत मंदीर रोड, वेलकम टेलर के सामने,
वारिसपूरा, कामठी ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर.

2) जन माहिती अधिकारी
मुख्य अध्यापक,
एम. एम. रब्बानी हायस्कूल कामठी
ता. कामठी जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 6/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 24.5.2006 रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून सचिव, मदरसतुल मुस्लेमिन एम.एम.रब्बानी हायस्कुल यांचेकडे माहिती मागण्याकरीता अर्ज केला होता. सदरच्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती ही अपीलकर्त्यास उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी दि. 4.7.2006 रोजी शिक्षणाधिकारी

(माध्य.) नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 24.7.2006 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य) यांचे कार्यालयाकडून पत्र क्रमांक 4053 प्रमाणे अर्जदारास त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात पत्र जोडले व त्या पत्राच्या प्रती ही मुख्याध्यापक यांना अग्रेषित केल्या. मुख्याध्यापक यांना माहिती देण्या विषयी कळविण्यात आले होते. परंतु सदरची माहिती त्यांनी उपलब्ध करुन न दिल्यामुळे दि. 16.8.2006 रोजी पत्र क्र. 4608 अन्वये ऑगष्ट पासूनचे वेतन अनुदान थांबविण्यात येत आहे असे त्यांना कळवले. दि. 16.9.2006 रोजी संस्थेचे सचिव यांनी शिक्षणाधिकारी यांना पत्र दिलेले दिसते. व त्यानंतर दि. 16.9.2006 रोजी अपीलकर्ता यांस संपूर्ण माहिती देण्याकरीता शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहिती पाठविली व त्या माहितीची प्रत ही अपीलकर्ता यास दिलेली दिसून येते. परंतु त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा संस्थेचा किंवा शाळेचा क्रमांक नाही, तारीख नाही व पोष्टाचा पाठविल्याचा सुध्दा पुरावा नाही. त्यानंतर दि. 18.9.2006 रोजी अपीलकर्ता यास एक पत्र पाठविलेले दिसत आहे व त्यात मात्र म्हटलेले आहे की त्यांना माहितीची प्रत पाठविण्यात आलेली आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराचा अर्ज हा संस्थेचे सचिवाकडे केल्यास व माहिती अधिकारी हे मुख्याध्यापक असल्यामुळे मुख्याध्यापक यांना त्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती नव्हती असे त्यांनी सांगितले. मुख्याध्यापक यांचे वेतन रोखण्यात आल्या नंतर त्यांना त्याबाबतची माहिती झाली. व त्यानंतर त्यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे असे म्हणणे आहे की आतापर्यंत फैयाद अहमद यांनी 13 अर्ज त्यांचेकडे केलेले आहे व सर्व अर्जाच्या बाबत त्यांना माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे अर्जाच्या संदर्भात गोंधळ होत असतो. पुन्हा दि. 11.10.2006 रोजी शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांना एक पत्र दिलेले दिसून येत आहे. त्या पत्रामध्ये फैयाद अहमद यांनी मागितलेल्या पत्रा बद्यल माहिती मागण्याच्या प्रवृत्तीबद्यल तक्रार केलेली दिसून येते. थोडक्यात माहिती

अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे असे म्हणणे आहे की आता पर्यंत आम्ही अपीलकर्ता यास भरपूर माहिती दिलेली आहे त्यामुळे माहिती उपलब्ध करुन न देण्याचा किंवा माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. यावरुन अपीकर्ता यास माहिती मिळाली आहे असे गृहित धरुन सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**नि र्ण य**

1) अपीकर्ता यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे गृहित धरुन सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 31.8.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.